नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर - ४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ / ९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५५ * अंक ८७ * * नागपूर * | बुधवार, दिनांक २५ जून २०२५ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## १२ दिवसांत कोरोना रुग्णांमध्ये ३ हजाराने घट

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २४ :
गेल्या २ आठवड्यांपासून देशभरात कोरोना व्हायरसचे रुग्ण कमी होत आहेत. १२ दिवसांत ३००० हून अधिक सक्रिय रुग्ण कमी झाले आहेत. १२ जून रोजी देशभरात ७१३१ सक्रिय रुग्ण होते, ज्यांची संख्या ४०८९ वर आली आहे. गेल्या २४ तासांत फक्त ७ नवीन रुग्ण आढळले आहेत. ३३६ रुग्ण बरे झाले आहेत.

आरोग्य विभागाच्या माहितीनुसार, जानेवारी २०२५ पासून कोरोनाच्या नवीन प्रकारामुळे १२७ जणांचा मृत्यू झाला आहे. गेल्या २४ तासांत ३ रुग्णांनी आपला जीव गमावला आहे. सर्वाधिक ४० जणांचा मृत्यू केरळमध्ये झाला आहे. तर महाराष्ट्रात ३३ जणांचा मृत्यू झाला आहे.



अग्राग्रलेख

## खरीखरी...

# नकट्यांचा सीझफायर

जगातील सर्वाधिक मानलेला नेत्यान्याहू नावाचा नरपुंगव आणि नोबेलसाठी आसुसलेले भारतद्रोही ट्रम्प या दोघांचेही नाक इराणने छाटून टाकले आहे. इराणने कालपर्यंत जे जे पराक्रम केले. त्याची नक्कीच इतिहासात नोंद होईल. नेत्यान्याहू नावाचा एक हृदयविहीन इसम जो इज्रायलचा प्रधानमंत्री आहे. तो इराणला दूषणे देत होता. मानवतेची आठवण करून देत होता. पण जेव्हा गाझावर याच नेत्यान्याहुने अनेक अमानुष अत्याचार केले. लहान बालकांवरही अनन्वित छळाचार केले. हजारोंना ठार मारले. 'असूनी खास मालक घराचा' असा असणारा गाझा गरज नसताना रक्तबंबाळ झाला. तोपर्यंत सदासर्वदा विजय मिळवणा?या इज्रायलला कुणीही महागुरू मिळाला नव्हता. जो हमासने हल्ला केला तो हमासचा घोर अपराध होता. हे मान्यच करावे लागेल. त्यानंतर इज्रायलने निरपराधांचा जो जीवघेणा संहार केला. त्याला काय म्हणायचे. त्याचाच बदला इराणने घेऊन टाकलेला आहे. अमेरिकेच्या भिकेवर इज्रायल सारख्या कुत्र्याला बैल झाल्याचा भास झाला होता. पण इराणने इज्रायलचा घास आपल्या घशात घालून त्याची अशी काही भंबेरी उडवली आहे की, आता यापुढे दहा हजार वर्षे इज्रायल इराणचा ई सुद्धा तोंडाने उच्चारणार नाही. इज्रायल जवळ बारा दिवस लढण्याची ताकद होती. त्यात इज्रायलला असे वाटले की, दोन ते चार दिवसात इराणला नामोहरम करून आपण विजेता होऊ. त्यांना इराणवर आक्रमणाचे निमित्त हवे होते. म्हणून संयुक्त राष्ट्रसंघाने इराणकडे अणू युद्धाची शक्ती नाही. हे स्पष्ट केल्यावरही इज्रायलने पहिला हल्ला केला. त्यानंतर इराणने केलेले पलटवार इज्रायलने स्वप्नातही कल्पना सारखे नव्हते. असे हल्ले इज्रायलने कधीच पाहिले नव्हते. कोणे एकेकाळी मध्यपूर्वेतील पाच-सहा राष्ट्रांना एकाच वेळी इज्रायलने धूळ चारली होती. त्यावेळी त्यांना चढलेली नशाही इराणने काही झापडीमध्येच खटाखट उतरवून टाकली. दोन-तीन दिवसांपूर्वी इज्रायल नेस्तनाबूत होण्याच्या काठावर आला होता. नंतर त्याने चक्क एका दुसऱ्या नकट्याला म्हणजेच अमेरिकेच्या ट्रम्पला आपल्या नकट्या नाकाने इराणचे नाक कापण्याची विनंती केली. हपापलेल्या ट्रम्पने झपाटलेल्या नेत्यान्याहुचे ऐकून इराणवर हल्ला करण्याची चूक केली. हल्ला करायचा म्हणून, जे नाही ते आहे. अशी हाकाटी पेटवून अणू-अणू करत जणू काय अमेरिकेवरच अणू हल्ला होणार आहे. अशा अविर्भावात तथाकथित शांतिदूत ट्रम्पने आपली अस्त्रे डागली. लगेच त्यानंतर इराण आता शरणागती पत्करणार असे घोषितही करून टाकले. परंतु, इराणला ना याने ओळखले. ना त्याने ओळखले. इराणने त्यांच्या हल्ल्याला जराही धूप न घालता प्रतिहल्ला करण्याची केवळ धमकीच दिली नाही. तर इमानदारीने अमेरिकेला इशारा देऊन कतारच्या अमेरिकी सैनिक तळावर हल्ला केला. इराणला जर मानव संहार करायचा असता. तर त्याने पूर्वसूचना न देताही हल्ला केला असता. पण माणुसकी शाबूत असल्यामुळे अमेरिकेच्या एकाही सैनिकाला ठार केले नाही. तरीही त्या सैनिकी तळाला मारमार मारून अमेरिकेला आपला हिसका दाखवूनच दिला. इराण प्रेमाने ऐकत नाही. धमकीला तो मानत नाही. शरण येण्याचे नाव काढत नाही आणि आपल्या राक्षसपुत्र म्हणजे नेत्यान्याहू व त्याच्या राष्ट्राला आपल्या संहार करण्याच्या अस्त्राने संपवू शकतो. हे ट्रम्पच्या डोक्यात फिट बसल्यामुळे इकडून तिकडून मस्का मारून, आगाऊ पणासाठी प्रसिद्ध असलेल्या ट्रम्पने आपल्या कापलेल्या नाकाला साक्षी ठेवून सीझफायर म्हणजे शस्त्रसंधीची घोषणा करून टाकली. त्याने सीझफायर साठी तीन तासांचा अवधी दिला. तो अगदी संपण्याच्या पाच मिनिटे अगोदर इराणने इज्रायलच्या शहरांवर जबरदस्त मारा करून त्यांचे प्रचंड मोठे नुकसान केले. त्यानंतर नकट्या इज्रायलला आपल्या आकाच्या म्हणजेच ट्रम्पच्या आदेशाचे उल्लंघन करणे शक्य नव्हते. म्हणजे इराणने सीझफायर पूर्वीच्या वेळेचा सदुपयोग करून धूम धडाक्याने केलेला घणाघाती हल्ला मुजोर इज्रायलला मूग गिळून पचवावा लागला.? त्यानंतर इराणने स्पष्टच म्हटले की, सीझफायर नंतर आम्ही हल्ला केलेला नाही. पण इज्रायलने जराही हूं किंवा चूं केले, तर त्याची खैर आम्ही अजिबात करणार नाही. आता ट्रम्पला नोबेलसाठी आपले नामांकन दाखल करायला हरकत नाही. आपण एक नव्हे तर दोन युद्धांमध्ये आगाऊगिरी करून नकट्या नाकाने का होईना, सीझफायर करून टाकले. म्हणूनच आपण नोबेल साठी नोबल मॅन आहोत असे समजून उद्या ट्रम्पने स्वतःलाच नोबेल पुरस्काराची घोषणा केल्यास आम्हाला नवल वाटणार नाही. कसेही असो, या दोन नकट्यांच्या सीझफायरमुळे जगाला दिलासा मिळाला आहे. तिसरे विश्व युद्ध टळले आहे, असे सध्या तरी वाटते. हाच काय तो दिलासा!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## ५ महिन्यांत वाढले ८% मतदार : काही बूथवर २० ते ५०% वाढ

# फडणवीस यांचा विजय संशयास्पद

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :
महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विधानसभा मतदारसंघात अवघ्या 5 महिन्यांत तब्बल 8 टक्के मतदारांची वाढ झाल्याचा गंभीर आरोप काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी मंगळवारी केला.

बीएलओंनी आपल्या रिपोर्टमध्ये या मतदारसंघात अज्ञात व्यक्तींनी मतदान केल्याची नोंद केली. यामुळे हे दुसरे-तिसरे काही नसून, मतांची चोरी आहे, असे ते म्हणालेत.

राहुल गांधी यांनी काही दिवसांपूर्वी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मतांची मोठे हेराफेरी करण्यात आल्याचा आरोप केला होता. या निवडणुकीत भाजपचा विजय निश्चित करण्यासाठी मॅच फिक्सिंग करण्यात आले होते, असे ते म्हणाले होते. त्यानंतर आता पुन्हा एकदा त्यांनी एका पोस्टद्वारे महाराष्ट्रातील भाजपच्या विजयावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. त्यात त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मतदारसंघातील आकडेवारी दिली आहे.

राहुल गांधी म्हणाले की, महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांच्या मतदारसंघात अवघ्या 5 महिन्यांत 8 टक्के मतदारांची वाढ झाली. काही बूथवर तर 20 ते 50 टक्क्यांची वाढ झाली. बीएलओ अर्थात बूथ लेव्हल अधिकाऱ्यांनी या प्रकरणी काही अज्ञात व्यक्तींनी मतदान केल्याची नोंद केली. माध्यमांनीही विना सत्यापित पत्ते असणाऱ्या हजारो मतदारांचा शोध घेतला आणि निवडणूक आयोग? गप्प - की यात सहभागी? ही वेगवेगळी हेराफारी नाही. ही स्पष्ट मतांची चोरी आहे. या प्रकरणी कव्हरअप करणे हाच कबुलीनामा आहे.

त्यामुळेच आम्ही मशीन मशीन-रीडेबल डिजिटल मतदार यादी व सीसीटीव्ही फुटेज त्वरित प्रसिद्ध करण्याची मागणी करत आहोत, असे राहुल गांधी यांनी म्हटले आहे.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनीही या मतदार यादी घोटाळ्याप्रकरणी निवडणूक आयोगावर निशाणा साधला असून, या प्रकरणी कसून चौकशी करण्याची मागणीही हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.



### किती काळ हवेत बाण सोडणार?

राहुल गांधी यांच्या या आरोपाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आकडेवारीसह प्रत्युत्तर दिले आहे. राहुल गांधी यांच्या अपमानास्पद पराभवाचे दुःख वाढले असल्याचे फडणवीस यांनी म्हटले आहे. ते अजून किती काळ हवेत बाण सोडत राहणार? असा प्रश्न देखील त्यांनी उपस्थित केला आहे.

यासंदर्भात फडणवीस यांनी एक पोस्ट केली आहे. त्यात
झूठ बोले कौवा काटे
काले कौवे से डरियो..
महाराष्ट्रातील अपमानास्पद पराभवाचे तुमचे दुःख दिवसेंदिवस वाढत आहे हे मी मान्य करतो.
पण तुम्ही किती काळ हवेत बाण सोडत राहणार आहात?

महाराष्ट्रात 25 पेक्षा जास्त मतदारसंघ आहेत जिथे लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीदरम्यान 8% पेक्षा जास्त मतदार वाढले आहेत आणि अनेक ठिकाणी काँग्रेसने विजय मिळवला आहे.

माझ्या दक्षिण-पश्चिम मतदारसंघाला लागून असलेल्या पश्चिम नागपूर मतदारसंघात 7% मतदार (27,065) वाढले आणि काँग्रेसचे उमेदवार विकास ठाकरे यांनी तेथे निवडणूक जिंकली. उत्तर नागपूरमध्ये 7% (29,348) मतदार वाढले आणि काँग्रेसचे उमेदवार नितीन राऊत यांनी विजय मिळवला. अशी आकडेवारी देत फडणवीसांनी राहुल गांधी यांना प्रत्युत्तर दिले आहे.

# आदिवासी विद्यार्थ्यांच्या भत्त्यांत मोठी वाढ



शक्तिपीठ महामार्गासाठी २० हजार ७८७ कोटी
वस्तू, सेवा कर अधिनियमनात सुधारणा
मंत्रिमंडळ बैठकीमध्ये महत्त्वाचे निर्णय

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २४ :
आदिवासी शासकीय वसतिगृहांमधील विद्यार्थ्यांच्या निर्वाह भत्ता, शैक्षणिक साहित्य खरेदी भत्ता व आहार भत्त्यांमध्ये वाढ करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये घेण्यात आला आहे.

या बरोबरच महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा विकास कर्ज योजनेंतर्गत हडको संस्थेकडून घेण्यात येणाऱ्या २ हजार कोटींच्या कर्जास शासन हमी देण्याचा निर्णय देखील घेण्यात आला आहे. यात संभाजीनगर महानगर पालिकेच्या पाणी पुरवठा प्रकल्पासाठी 822 कोटींचा देखील समावेश आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. महाराष्ट्र शक्तिपीठ महामार्ग प्रकल्पाच्या आखणीस तसेच भूसंपादनासाठी 20 हजार कोटी रुपयांच्या तरतुदीस मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे आता या कामाला देखील गती मिळणार आहे.

महाराष्ट्र वस्तू, सेवा कर अधिनियमन 2017 च्या बिलात सुधारणा करण्यात येणार आहे. नवीन वस्तू व कर विधेयक आणणार असल्याचा निर्णय आज झालेल्या बैठकीत घेण्यात आला. मंत्रिमंडळ बैठकीत या बाबत महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांसाठी सुधारणा विधेयक आणणार असून शक्तिपीठ महामार्गाच्या भूसंपादनाला मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.

पवनार (जि.वर्धा) ते पत्रादेवी (जि. सिंधुदुर्ग) या महाराष्ट्र गोवा सरहद्द शिघ्रसंचार द्रुतगती महामार्गास मान्यता देण्यात आली. राज्यातील साडेतीन शक्तिपीठ , दोन ज्योतिर्लिंग आणि पंढरपूर अंबेजोगाई सहित १८ तीर्थक्षेत्रांना जोडणारा शक्तिपीठ महामार्ग. प्रकल्प महामंडळामार्फत राबवणार, प्रकल्पाच्या आखणीस तसेच भूसंपादनासाठी २० हजार कोटी रुपयांच्या तरतुदीस मान्यता देण्यात आली.

कोयना धरणाच्या पायथा विद्युतगृहाच्या प्रकल्पास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. यासह अनेक महत्वाचे निर्णय घेण्यात आलेत.

## शक्तिपीठ महार्गावरून

# मंत्रिमंडळ बैठकीत नाराजीनाट्य

दोन मंत्र्यांनी केला कडाडून विरोध

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २४ :
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा 'ड्रीम प्रोजेक्ट' असणाऱ्या शक्तीपीठ महामार्गासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.

मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत भूसंपादनासाठी 20 हजार कोटी रुपयांची मोठी तरतूद मंजूर करण्यात आली. मात्र, या निर्णयावर मंत्रिमंडळातच मतभेद झाल्याचे उघड झाले आहे. कोल्हापूरचे मंत्री प्रकाश आबिटकर आणि हसन मुश्रीफ यांनी या प्रकल्पासंदर्भात सरकारने पुनर्विचार करून निर्णय घेण्याची विनंती केली आहे.

शक्तिपीठ महामार्ग हा राज्यातील 12 जिल्ह्यांमधून जाणार असून यासाठी 86 हजार कोटींचा खर्च अपेक्षित आहे. मात्र या महामार्गाला कोल्हापूर, धाराशिव, सोलापूर येथील शेतकऱ्यांनी तीव्र विरोध केला आहे. शक्तिपीठ महामार्गाला शेतकऱ्यांचा होणारा विरोध लक्षात घेता कोल्हापूर जिल्ह्यातील मंत्री प्रकाश आबिटकर आणि हसन मुश्रीफ यांनी कॅबिनेटमध्ये नाराजी व्यक्त केली.

लोकसभा निवडणुकीत कोल्हापूर-सांगली भागात महायुतीला बसलेला फटका लक्षात घेता, पुन्हा त्याच भागात शेतकऱ्यांचा रोष ओढवून घेणे, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी सरकारला धोकादायक ठरू शकते, असे मत दोन्ही मंत्र्यांनी व्यक्त केल्याची माहिती मिळत आहे.

शक्तिपीठ महामार्ग हा 12 जिल्हे आणि 39 तालुक्यातून जाणारा महामार्ग असून तो राज्यासाठी फायदेशीर असला, तरी शेतकऱ्यांचे नुकसान करणारा आहे, अशी भूमिका मंत्री प्रकाश आबिटकर आणि हसन मुश्रीफ यांनी बैठकीत मांडली. विधानसभा निवडणुकीत शक्तिपीठ महामार्गामुळे मोठा फटका बसल्याने स्थानिक शेतक?यांना विश्वासात घेऊन आणि पुनर्विचार करून निर्णय होणे अपेक्षित आहे, असे मत मंत्र्यांनी बैठकीत मांडल्याची माहिती आहे.

## रेल्वे भाडेवाढ : १ जुलैपासून अंमलबजावणी

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २४ :
१ जुलैपासून रेल्वे प्रवास महाग होऊ शकतो. नॉन-एसी मेल/एक्सप्रेस गाड्यांचे भाडे प्रति किलोमीटर १ पैशाने आणि एसी क्लासचे भाडे प्रति किलोमीटर २ पैशांनी वाढू शकते.

इकॉनॉमिक टाईम्सने सूत्रांच्या हवाल्याने ही माहिती दिली आहे. १ जुलैपासून नवीन दरांनुसार भाडे द्यावे लागेल.

## देशभरातील अनेक उड्डाणे रद्द

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २४ :
इराण-इस्त्रायल युद्धाचा परिणाम भारत आणि मध्य पूर्वेकडील देशांना जाणाऱ्या विमानांवर होत आहे. वाढत्या तणावामुळे आणि हवाई क्षेत्र बंद झाल्यामुळे आतापर्यंत ६० हून अधिक उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. दिल्ली विमानतळावरून ४८ उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. त्यापैकी २८ उड्डाणे दिल्लीत येणार होती आणि २० उड्डाणे दिल्लीहून निघणार होती.

जयपूर विमानतळावरून ६ उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. यामध्ये मध्य पूर्वेला जाणारे आणि येणारे प्रत्येकी ३ उड्डाणे समाविष्ट आहेत. युएई-कतार हवाई क्षेत्र बंद झाल्यामुळे लखनौ विमानतळावरून अबू धाबी आणि शारजाहला जाणारे २ उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. अमृतसर विमानतळावरून दुबईला जाणारे विमानही रद्द करण्यात आले आहे.

सोमवारी रात्री इराणने त्यांच्या अणु तळांवरील हल्ल्यांचा बदला घेण्यासाठी कतारमधील अमेरिकेच्या अल-उदेद हवाई सैन्य तळावर 6 क्षेपणास्त्रे डागली. यानंतर कतार, बहरीन, युएई, इराक आणि कुवेतने त्यांचे हवाई क्षेत्र तात्पुरते बंद केले. मध्य पूर्वतील विमानतळ पुन्हा सुरू होत असताना, आम्ही त्या मार्गांवर काळजीपूर्वक आणि हळूहळू आमच्या सेवा पुन्हा सुरू करत आहोत. आम्ही संपूर्ण परिस्थितीवर लक्ष ठेवून आहोत. प्रवाशांच्या सुरक्षेसाठी आम्ही सुरक्षित मार्ग निवडत आहोत, असे इंडिगोकडून सांगण्यात आले. मध्य पूर्व हवाई क्षेत्र बंद झाल्यामुळे काही उड्डाणांवर परिणाम होऊ शकतो, असे स्पाइसजेटने म्हटले आहे. अकासा एअरची अनेक उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत.

## अवघ्या अडीच तासांत मोडली

# इराण-इस्त्रायल युद्धबंदी

■ वृत्तसंस्था, तेल अवीव, दि. २४ :
युद्धबंदी लागू झाल्यानंतर काही तासांतच इस्त्रायल आणि इराण दोघांनीही त्याचे उल्लंघन केले. इस्त्रायलने नुकतेच इराणची राजधानी तेहरानमधील एका रडार साइटवर हवाई हल्ला केला. इस्त्रायली आर्मी रेडिओने हल्ल्याची पुष्टी केली आहे.

तत्पूर्वी, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांना फोन करून इराणवरील हल्ला थांबवण्याची विनंती केली.

वृत्तसंस्था अल जझीराच्या वृत्तानुसार, नेतन्याहू ट्रम्प यांना म्हणाले, "मी हल्ला थांबवू शकत नाही, कारण इराणने प्रथम युद्धबंदीचे उल्लंघन केले आणि त्याला प्रत्युत्तर देणे आवश्यक आहे."

दोन्ही देशांमधील युद्धाच्या १२ व्या दिवशी, आज पहाटे ३:३२ वाजता, ट्रम्प यांनी युद्धबंदीच्या कराराची घोषणा केली. सकाळी १०:३८ वाजता त्यांनी आणखी एक पोस्ट केली आणि लिहिले, आतापासून युद्धविराम लागू झाला आहे,



कृपया तो मोडू नका.

तथापि, युद्धबंदी सुरू झाल्यानंतर अवघ्या अडीच तासांतच इराणने इस्त्रायलवर सहा बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे डागली. बेअरशेबा शहरातील एका इमारतीवर क्षेपणास्त्र आदळले, ज्यामध्ये पाच जणांचा मृत्यू झाला आणि २० हून अधिक जण जखमी झाल्याची माहिती माध्यमांमध्ये झळकली आहे.

# बच्चू कडू यांना मोठा दिलासा

जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदावर कायम

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :
प्रहारचे अध्यक्ष बच्चू कडू यांच्या अमरावती जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदाच्या अपात्रता निर्णयावर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने स्थगिती दिली आहे. त्यामुळे बच्चू कडू यांना मोठा दिलासा मिळाला आहे. तसेच बच्चू कडू यांचे जिल्हा बँकेचे अध्यक्षपद कायम राहणार आहे. 16 जून रोजी बच्चू कडू यांना अपात्र ठरवण्यात आले होते.

उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानंतर बच्चू कडू यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, न्यायालयाने अमरावती जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदावरून दिलेला निर्णय हा सत्याचा विजय आहे. भाजपच्यामदतीने त्यांनी बँकेतून आम्हाला हटविण्याचा प्रयत्न केला. परंतु न्यायदेवतेने न्याय केला आहे, असे बच्चू कडू म्हणाले.

## हिंदीला राष्ट्रभाषा घोषित करा

### अबू आझमींची मागणी

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २४ :
राज्यात पहिलीपासून तीन भाषा शिकणे सक्तीचे करण्यात आले असून, तिसऱ्या भाषेच्या रूपात हिंदी लादण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न सध्या वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे.



विरोधी बाकावर असलेल्या समाजवादी पार्टीने मात्र सरकारच्या भूमिकेला पाठिंबा दिला आहे.
सपाचे आमदार अबू आझमी यांनी तिसरी भाषा म्हणून हिंदी शिकवणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले आहे. इतकेच नव्हे तर, हिंदीला देशाची राष्ट्रभाषा म्हणून घोषित करावे, आणि काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत सर्वांसाठी हिंदी शिकणे बंधनकारक करावे, असेही त्यांनी ठामपणे म्हटले आहे.
अबू आझमी म्हणाले, तिसरी भाषा म्हणून आपल्याकडे हिंदीचा पर्याय आहे आणि ती देशभरात लागू करायला हवी.

## हिंदी : अंतिम निर्णय सात दिवसात

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २४ :
महाराष्ट्रातील शाळांमध्ये पहिलीपासून हिंदी भाषा लागू करण्याचा निर्णय महायुती सरकारने घेतला असून या निर्णयाला राज्यभरातून मोठा विरोध केला जात आहे. राज्यभरातून होणारा विरोध लक्षात घेता राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे.



हिंदी भाषेबाबतचा अंतिम निर्णय पुढील सात दिवसात घेतला जाणार असल्याची माहिती समोर येत आहे. शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे हे हिंदी भाषेला विरोध करणाऱ्या राजकीय पक्षांशी, नेत्यांशी तसेच भाषा तज्ज्ञांसोबत बैठक घेणार आहेत.

शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, इतर राज्यांची भाषा व त्यांचे धोरण, तसेच हिंदीबाबतचे धोरण या मुद्द्यांवर सरकारची भूमिका समजावून सांगणार आहेत. धोरणाला विरोध करणाऱ्यांची नेमकी भूमिका काय आहे, त्यानंतर या संपूर्ण बाबींचा समावेश असलेला एक समग्र अहवाल तयार करण्यात येईल.

## वाल्मीक कराड सूत्रधार

■ वृत्तसंस्था, बीड, दि. २४ :
मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात सुदर्शन घुले हा केवळ गँग लीडर होता. वाल्मीक कराड हाच त्यांचा पडद्यामागे असणारा खरा सूत्रधार होता, असा दावा विशेष सरकारी वकील उज्वल निकम यांनी मंगळवारी कोर्टात युक्तिवाद करताना केला.

संतोष देशमुख हत्या प्रकरणाची आज बीडच्या जिल्हा व विशेष सत्र न्यायालयात जवळपास 3 तास सुनावणी झाली. त्यात वाल्मीक कराडच्या वकिलांनी 2 तास युक्तिवाद केला. तर उज्वल निकम यानी 1 तास युक्तिवाद केला.

# अजित पवारांच्या खात्याकडे लक्ष ठेवा..

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :
अजित पवारांच्या खात्याकडे मोठा निधी आहे, त्यावर लक्ष ठेवा. तो निधी कुठे वितरित होतो याची माहिती घ्या, असा आदेश राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या मंत्र्यांना दिला असल्याची माहिती आहे.

मंत्रिमंडळाची बैठक झाल्यानंतर एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या मंत्र्यांची वेगळी बैठक घेतली. यात निधी वाटपावरून शिवसेना शिंदे गटाच्या मंत्र्यांनी नाराजी व्यक्त केल्याची माहिती आहे.

अजित पवार निधी देत नाहीत, अशी तक्रार शिवसेना शिंदे गटाच्या मंत्र्यांनी अनेकवेळा बोलून दाखवली आहे. मंत्री संजय शिरसाट यांनी देखील थेट आरोप केले होते. त्यामुळे निधी वाटपाच्या मुद्द्यावरून महायुतीमधील तिन्ही घटक पक्षांमध्ये धुसफूस असल्याचे दिसून येते. याच पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदे यांनी मंत्रिमंडळाची बैठक झाल्यानंतर त्यांच्या पक्षाच्या मंत्र्यांसोबत वेगळी बैठक घेतली असल्याचे समजते.

### शिवसेनेच्या मंत्र्यांना शिंदेंचे आदेश



एकनाथ शिंदे निधी वाटपावरून आक्रमक झाल्याचे देखील पाहायला मिळाले. अजित पवार यांच्या खात्यावर लक्ष ठेवण्याचे आदेश शिंदेंनी आपल्या मंत्र्यांना दिले आहेत. अजित पवारांच्या खात्यात 14-14 हजार कोटींचे दोन निधी आहेत. त्यावर लक्ष ठेवले पाहिजे. हा निधी कुठे वितरीत होतो याची माहिती आपल्याला मिळाली पाहिजे असे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.

दरम्यान, राज्यात निधी वाटपाच्या मुद्द्यावरून शिंदे गटाच्या मंत्र्यांनी नाराजी व्यक्त केल्यानंतर एकनाथ शिंदे यांनी अजित पवारांची भेट घेतली होती. त्यापूर्वी उद्योग मंत्री उदय सामंत यांनी देखील पवारांची भेट घेतली होती. या भेटीत निधी वाटपावर चर्चा झाल्याची माहिती आहे.

शिवसेना शिंदे गटाच्या मंत्र्यांनी अजित पवारांकडून निधी मिळत नसल्याची तक्रार करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. त्यानंतर निधी हा काही आपल्या खिशातून देत नाही, राज्यातील तिजोरीला शिस्त आणण्यासाठी काही पावले उचलली जातात असे अजित पवारांनी स्पष्ट केले होते.

अजित पवारांच्या निधी वाटपावर केवळ शिंदे गटच नव्हे तर भाजपच्या आमदारांनी देखील नाराजी व्यक्त केली होती. तीच नाराजी आज पुन्हा एकदा उफाळून आल्याचे दिसून आले.

# स्वीय सहाय्यकांना मूळ विभागात रुजू होण्याचे आदेश

### मुख्यमंत्री फडणवीसांची कठोर भूमिका : मंत्र्यांची धाकधूक वाढली

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वीय सहाय्यकांना तातडीने मूळ विभागात रुजू होण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे आता महायुती सरकारमधील मंत्र्यांची धाकधूक वाढली आहे.

यापूर्वी देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महायुती सरकारमधील सात मंत्र्यांना पीएस आणि ओएसडी नियुक्त करण्याची परवानगी नाकारली होती. हा विषय अनेक दिवसांपासून चर्चेत होता. मात्र आता पुन्हा एकदा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यालयाकडून मंत्र्यांचे पीए म्हणून कार्यरत असलेल्या सरकारी अधिकाऱ्यांना त्यांच्या मुळ विभागात रुजू होण्याचे आदेश देण्यात आले आहेत.




इतकेच नाही तर मूळ विभागात हजर न झाल्यास संबंधित सरकारी अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली जाईल, असे देखील स्पष्ट करण्यात आले आहे.

## तेजस्वीची नाराजी ठाकरेंकडून दूर



**मुंबई :** गेल्या काही महिन्यांपासून ठाकरे गटाच्या माजी नगरसेविका तेजस्वी घोसाळकर या पक्षात नाराज असल्याच्या चर्चा होत्या. आता उद्धव ठाकरे यांनी तेजस्वी घोसाळकर यांची नाराजी दूर केली आहे. ठाकरेंनी तेजस्वी घोसाळकर त्यांच्यावर मोठी जबाबदारी सोपवली असून, त्यांची दहिसर विधानसभेच्या प्रमुखपदी निवड करण्यात आली आहे.

तेजस्वी घोसाळकर यांनी काही दिवसांपूर्वी पक्षातील सर्व पदांचा राजीनामा दिला होता. त्यामुळे त्या पक्षात नाराज असल्याच्या चर्चा सुरू होत्या. त्यातच भाजप नेते आणि मुंबै जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष प्रवीण दरेकर यांनी तेजस्वी घोसाळकर यांची बँकेच्या संचालक मंडळावर नियुक्ती केली. त्यामुळे त्या भाजपात प्रवेश करू शकतात, अशी चर्चा सुरू झाली होती. पक्षाकडून त्यांची मनधरणी करण्याचा प्रयत्न सुरू होता. तेजस्वी घोसाळकर यांनी थेट 'मातोश्री'वर जाऊन उद्धव ठाकरे यांची भेट घेतली आणि आपण उद्धव ठाकरेंसोबतच राहणार असल्याचे स्पष्ट केले. त्यानंतर आता पुन्हा एकदा त्यांच्यावरती पक्षाने मोठी जबाबदारी दिली आहे. माजी नगरसेविका तेजस्वी घोसाळकर यांची दहिसर विधानसभा प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. दहिसर विधानसभा हा ठाकरे गटासाठी महत्त्वाचा मतदारसंघ मानला जातो. या ठिकाणी मराठी मतदार चांगल्या संख्येने आहे. त्याशिवाय, शिवसेनेला मानणारा मोठा मतदार आहे.

## बँक मॅनेजरला आमदाराची धमकी

**जालना :** जालना जिल्ह्यातील बदनापूर विधानसभा मतदारसंघातील भारतीय जनता पक्षाचे आमदार नारायण कुचे हे पुन्हा एकदा अडचणीत सापडले आहेत. जालन्यातील एका बँक मॅनेजरला त्यांनी फोनवर शिवीगाळ करून धमकी दिली आहे. त्यांच्यातील या संवादाची कथित ऑडिओ क्लिप सध्या सोशल मीडियावर चांगलीच व्हायरल झाली आहे. या प्रकरणानंतर आता बँक कर्मचारी संघटना देखील आक्रमक झाली असून त्यांनी जिल्हाधिकारी आणि पोलिस अधीक्षक यांच्याकडे आमदार कुचे यांच्या विरोधात तक्रार दाखल केली आहे.

एका शेतकऱ्याच्या थकीत कर्ज प्रकरणात त्यांनी बँक अधिकाऱ्यांवर दबाव टाकण्याचा प्रयत्न केला आहे. या संदर्भातली संभाषणाची क्लिप देखील व्हायरल होत आहे. तुम्हाला समजून सांगितले तर समजत नसेल तर मला हाताने समजावून सांगावे लागेल. तुमची इच्छा असेल तर तिथे आल्यावर हाताने समजून सांगण्याची भाषा कुचे यांनी वापरली आहे. कुचे यांच्या क्लिप मुळे आता बँक कर्मचारी संघटनेने संताप व्यक्त केला आहे. दरम्यान, बँक अधिकाऱ्यांनी कुचे यांच्याविरोधात तक्रार दाखल करीत कारवाईची मागणी केली आहे.

### पक्षात वशिल्याचा भारी वापर : निर्णय घेताना कुणीही विचारत नाही

# ठाकरे गटात भास्कर जाधव नाराज

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २४:

पक्षात हल्ली काय उद्योग चालले आहे कळत नाही. एखादा निर्णय घेताना तिथल्या पदाधिकाऱ्यांना विचारले पाहिजे. तिथल्या जबाबदार नेत्याला प्रश्न विचारला पाहिजे. हा भारी वशीला हल्ली लागला आहे असे म्हणत उबाठाच्या कार्यशैलिवर उबाठाचे नेते भास्कर जाधव यांनी नाराजी व्यक्त केली आहे.



भास्कर जाधव पुढे बोलताना म्हणाले की, वशील्याचा माझ्यावर काही परिणाम होणार नाही. पक्षामध्ये कुठला नेता मला का टार्गेट करेल? का करेल, प्रत्येकाचे कार्यक्षेत्र ठरले आहे. पक्षातील नेत्यांच्या मनात माझ्याबद्दल नितांत आदर आहे.

**राऊतांवर अप्रत्यक्ष टीका**

भास्कर जाधव म्हणाले की, तालुका प्रमुख, विभाग प्रमुख मी केलेले काम. बाळासाहेबांच्या अष्टप्रधान मंडळामध्ये जे 13 नेते कार्यरत होते त्यातील सुभाष देसाई आजही कार्यरत असून पूर्णक्षमतेने काम करत आहेत.

ते जेव्हा मला भेटतात तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद मला दिसतो. दिवाकर रावते यांच्यासारखा लढवय्या माणूस जेव्हा भेटतो तेव्हा ए भास्कर इकडे या असा आवाज देतात. तू चांगला बोलतोस असे म्हणत कौतुक करतात. माझा द्वेष करणार कोण?

दुसरी गोष्ट माझा द्वेष कुणीही करत नाही, करत असेल तर त्याला मी किती किंमत देणार. किती द्यावी असे तुमचे म्हणणे आहे, मी काय आहे त्यांना माहिती आहे, ते काय मला माहिती आहे, असे म्हणत त्यांनी नाव न घेता विनायक राऊतांवर टीका केल्याचे बोलले जात आहे.

भास्कर जाधव म्हणाले की, मला पक्षातील कोणी नेता त्रास देत नाही आणि कुणी द्यायच्या भानगडीत पडू नये, हे पण सांगून टाकतो हे पूढचे बोलायला नको, असा इशाराच त्यांनी अप्रत्यक्षपणे राऊतांना दिल्याची चर्चा आहे.

मी घुसमटणारा माणूस नाही. शरद पवारांना सोडण्याची राजकीय चूक केली हे मी नाकारणार नाही. माझी कुणीही घुसमट केली नाही. माझी शिवसेनेत घुसमट होते असे काही नाही. माझ्याकडे प्रामाणिक म्हणून पहा.

मी कुठल्या पदाकरता यापूर्वीही अशी नौटंकी केली नाही, आणि करणार नाही. मी अधिवेशनावेळी सरकारला सांगितले की माझ्याऐवजी दुसऱ्या कुणाला विरोधी पक्षनेता करा. मी माझे पत्र मागे घेतो, असे भाष्कर जाधव यांनी स्पष्ट केले . दरम्यान, ठाकरे गटातून ते बाहेर पडणार असल्याची चर्चा आहे.

### निवृत्तीपेक्षा एकनाथ शिंदेंचे नेतृत्व स्वीकारा...

#### उदय सामंतांचा जाधवांना सल्ला



ठाकरे गटाचे नेते भास्कर जाधव यांनी राजकारणातून निवृत्त व्हावेसे वाटते, असे विधान केले होते. त्यांच्या या वक्तव्यानंतर राजकीय वतुर्ळात चर्चांना उधाण आले असतानाच, शिंदे गटातील नेते व उद्योगमंत्री उदय सामंत यांनी भास्कर जाधवांना निवृत्ती न घेता एकनाथ शिंदेंचे नेतृत्व स्वीकारण्याचा सल्ला दिला आहे. भास्कर जाधव माझ्याबद्दल बोलताना मातोश्रीचा राग काढला असल्याचेही सामंत म्हणाले.

भास्कर जाधव हे शिवसेनेच्या (ठाकरे गट) कोकणातील प्रमुख नेत्यांपैकी एक मानले जातात. मात्र अलीकडील काही दिवसांपासून पक्षातील अंतर्गत मतभेद, खासकरून खासदार संजय राऊत यांच्याशी त्यांचे संबंध तणावपूर्ण असल्याच्या चर्चा आहेत. जाधव यांनी काही दिवसांपूर्वी एका मुलाखतीत राजकारणातून निवृत्ती घ्यावीशी वाटते, असे विधान केल्यामुळे या चर्चांना अधिकच जोर मिळाला. दरम्यान, जाधव यांना उदय सामंत यांनी एकनाथ शिंदेंचे नेतृत्व स्वीकारण्याचा सल्ला दिला आहे.

भास्कर जाधव यांच्यासारख्या नेत्याने निवृत्तीचा विचार करणे योग्य नाही, अशी माझी भावना आहे. माझे हे वक्तव्य म्हणजे कुठल्याही प्रकारचा टोमणा नाही. ही माझी खरी भावना आहे, असे उदय सामंत म्हणाले.भास्कर जाधव हे मातोश्रीवर प्रचंड नाराज असल्याचे दिसते. मी ही त्यावर खुल्या मनाने सांगतो की, भास्कर जाधव यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे नेतृत्व स्वीकारले तर आम्हाला आनंद होईल, असा सल्लाही त्यांनी भास्कर जाधवांना दिला.

# सीएम हे लूट करणारे ठग आणि पेंढारी...

### फडणवीसांवर राजू शेट्टींची विखारी टीका

■ वृत्तसंस्था
कोल्हापूर, दि. २४:



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणजे लूट करणारे आणि पेंढारी असल्याची टीका शेतकरी नेते राजू शेट्टी यांनी केली आहे. शक्तिपीठ महामार्गाच्या कामांत मोजणी करताना बाळाचा वापर होत असल्याचा आरोप देखील त्यांनी केला आहे. यासंदर्भात सोशल मीडियावरील पोस्ट माध्यमातून त्यांनी राज्य सरकारवर टीका केली आहे.

फडणवीस यांचा दुसरा ड्रीम प्रोजेक्ट म्हणून शक्तिपीठ महामार्गाकडे पाहिले जाते. याआधी समृद्धी महामार्गाला देखील मोठ्या प्रमाणात राज्यातून विरोध झाला होता. मात्र तरी देखील समृद्धी महामार्ग आता पूर्ण झाला आहे. त्याचप्रमाणे आता शक्तिपीठ महामार्गाला देखील विरोध होत आहे. शेतकरी नेते राजू शेट्टी यांनी या महा-मार्गासाठी जमीन मोजणी करताना बळाचा वापर होत असल्याचा आरोप केला आहे.

सरकार शक्तीपीठ महामार्ग करण्याचा अट्टाहास का व कशासाठी करत आहे. कारण या शक्तिपीठ महामार्गातून जवळपास 50 हजार कोटीचा ढपला पाडला जाणार असल्यानेच हा प्रकल्प जनतेच्या माथी लादला जात असल्याचा आरोप शेट्टी यांनी केला आहे.

फडणवीस सरकार म्हणजे शक्तिपीठ महामार्गातून राज्यातील शेतकरी व जनतेचे लूट करणारे सध्याच्या युगातील ठग आणि पेंढारी झाले आहेत. धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर तालुक्यातील वानेवाडी येथे शक्तिपीठ महामार्ग मोजणीसाठी आले असता शेतकऱ्यांनी या मोजणीस कडाडून विरोध केला.

राज्य सरकार पोलिसांना हाताशी धरून बळाचा वापर करून जबरदस्तीने मोजणी करत आहेत. देवेंद्र फडणवीस म्हणजे शेतकरी व जनतेचे लूट करणारे सध्याच्या युगातील ठग आणि पेंढारी झाले आहेत. सध्या रत्नागिरी -नागपूर हा रस्ता अस्तित्वात असून या मार्गावर तुरळक वाहतूक आहे.

सध्या रोज या मार्गावर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणास किमान ४० लाख टोल संकलित होण्याची आवश्यकता असताना सध्या दररोज ११ ते १२ लाख इतकाच टोल गोळा होत आहे. गेल्या दिड वर्षापासून हा महामार्ग तोट्यात जात असून याचा भुर्दंड सामान्य जनतेवर बसणार असल्याचे शेट्टी म्हणाले.

## विठ्ठल दर्शनाचे बनावट पास विक्रीचा प्रकार उघड

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. २४:

आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरपूरच्या दिशेने जाणाऱ्या पायी जाणाऱ्या वारकऱ्यांच्या भक्तिभावाला काळिमा फासवणारी घटना उघडकीस आली आहे.

काही फसवणूक करणाऱ्या टोळ्यांनी विठ्ठल दर्शनासाठी मंदिरात प्रवेश मिळवण्यासाठी बनावट 'टोकन दर्शन' पास तयार करून विक्री केल्याचा प्रकार समोर आला. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्यात सहभागी सात भाविकांची फसवणूक करण्यात आली.

हे भाविक विठ्ठल मंदिरात प्रवेशासाठी दाखल झाल्यानंतर त्यांच्या टोकन पासचे स्कॅनिंग करण्यात आले. स्कॅनिंग दरम्यान हे पास बनावट असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर मंदिर प्रशासनाने तातडीने कारवाई करत या सात भाविकांना बाजूला घेत चौकशी सुरू केली.

चौकशीत या भाविकांनी सांगितले की, सासवडच्या परिसरात काही अज्ञात व्यक्तींनी त्यांना 100 रुपयांच्या मोबदल्यात 'दर्शन टोकन' देऊ केले. जुने अधिकृत पास स्कॅन करून त्यांच्या आधारे बनावट टोकन तयार करून ते भाविकांना देण्यात आले होते. मात्र या भाविकांना पास कोणी दिले, कुठे दिले, आणि नेमके कसे मिळाले याची ठोस माहिती देता आलेली नाही. मंदिर प्रशासनाने त्यांना



पोलिसांच्या ताब्यात दिले असून पोलिस या प्रकरणाचा तपास करत आहेत.

आषाढी वारीच्या काळात लाखो भाविक विठ्ठलाच्या दर्शनासाठी गर्दी करतात. यामध्ये प्रत्यक्ष रांगेत उभे राहून दर्शन घेण्यासाठी 10 ते 12 तासांचा वेळ लागतो, तर अधिकृत टोकन प्रणालीमुळे अर्ध्या तासात दर्शन मिळू शकते. याचाच गैरफायदा घेत काही फसवणूक करणाऱ्या व्यक्तींनी बनावट पास तयार करून भाविकांची दिशाभूल केली. अधिकृत संकेतस्थळावरूनच मोफत टोकन बुक करावे असे मंदिर समितीने म्हटले आहे.

## भुसे घेणार राज ठाकरेंची भेट

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४:



राज्यातील शाळांमध्ये प्राथमिक स्तरावर हिंदी शिकवण्याच्या निर्णयावरून राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. या पार्श्वभूमीवर शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यासह साहित्यिक, भाषा तज्ज्ञ व अन्य संबंधितांशी प्रत्यक्ष चर्चा करण्याची तयारी दर्शवली आहे.

मंत्री दादा भुसे म्हणाले की, हिंदीच्या निर्णयामागे कोणताही राजकीय हेतू नसून, विद्यार्थ्यांचे भविष्यातील शैक्षणिक हित लक्षात घेऊनच अभ्यासपूर्ण निर्णय घेतला गेला आहे. यासंदर्भात विद्यार्थ्यांचे हित कसे जपले जाईल, याचे सविस्तर सादरीकरण विरोधकांना, साहित्यिकांना आणि नागरिकांना करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

दादा भुसे म्हणाले म्हणाले की, कोणाचीही गैरसमज होऊ नये म्हणून आम्ही थेट संवाद साधणार आहोत. ज्यांना काही शंका किंवा तक्रारी आहेत, त्यांच्याशी वैयक्तिक भेट घेऊन सर्व माहिती समोर मांडली जाईल. यामुळे सकारात्मक आणि सर्वसमावेशक निर्णय होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## १२०० फूट खोल दरीत आढळले तलाठी आणि तरुणीचे मृतदेह

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. २४:

जुन्नरनजिक 1200 फूट खोल दरीमध्ये 2 मृतदेह आढळून आले आहेत. यामध्ये श्रीगोंद्याचे तलाठी आणि एका महाविद्यालयीन तरुणीचा मृतदेह समावेश आहे. जुन्नरच्या कोकणकडा परिसरातून दोघांनी आत्महत्या केल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे.

श्रीगोंद्याचे तलाठी रामचंद्र साहेबराव पारधी, असे मृत व्यक्तीचे नाव आहे. रुपाली खुटाण आंबोली असे मृत महाविद्यालयीन तरूणीचे नाव आहे.

जुन्नरच्या रिव्हर्स वॉटर फॉलजवळ एक पांढऱ्या रंगाची कार गेली काही दिवस उभी होती. ही गोष्ट स्थानिकांना निदर्शनास आली तेव्हा त्यांनी शोधाशोध सुरू केली. यावेळी दरीच्या कड्यावर पुरुष आणि स्त्रीच्या चपला आढळून आल्या. यानंतर रेस्कू टीमने दरीत उतरुन शोध घेतला असता रुपाली आणि रामचंद्र यांचे मृतदेह आढळून आले.

त्यानंतर जुन्नर पोलिस आणि रेस्क्यू टीमने कठिण परिस्थितीत मृतदेह दरीतून बाहेर काढले आहेत. रमेश आणि प्रियंका यांनी आत्महत्या केली, की त्यांचा खून करण्यात आला. याबाबतचा तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे. पोस्टमार्टम रिपोर्टनंतर मृत्यूचे कारण समजणार आहे. पोलिसांकडून आजूबाजूला चौकशी केली जात आहे. मृत्यूचे कारण आणि दोघांमधील संबंध याबाबत सखोल चौकशी सुरू आहे.

**तरुण ट्रकचालकाचा कॅबिनमध्ये खून**

दुसरीकडे नाशिकमध्ये चामारलेणी रोडवर नग्नावस्थेत मिळालेल्या मृतदेहाची ओळख पटवण्यात पोलिसांना यश?? आले. कर्नाटकमधील तरुण मरकुंडा उमेश अंबिकार (34) असे या तरुणाचे नाव आहे.

हा ट्रकचालक असून डिझेल संपल्याने ट्रक दिंडोरी रोडवर आरोग्य विज्ञान विद्यापीठाजवळ उभा केलेला मिळाला. या ट्रकच्या कॅबिनमध्ये रक्ताचे डाग मिळून आले असून या कॅबिनमध्येच त्याचा खून करून मृतदेह चामार लेणी रोडवर फेकून दिल्याचे तपासात निष्पन्न झाले.

## सामाजिक कार्यकर्ता खंडणी घेताना जाळ्यात

■ वृत्तसंस्था, कोल्हापूर, दि. २४:

कोल्हापुरातील एका स्वयंघोषित सामाजिक कार्यकत्यार्ला तब्बल 15 लाख रुपयांची खंडणी घेताना रंगेहाथ अटक करण्यात आली आहे.

हा कार्यकर्ता पूर्वी बच्चू कडू यांच्या प्रहार संघटनेचा पदाधिकारी म्हणून राजकारणात सक्रिय होता. पण त्याच्या काळ्या कारनाम्यांची माहिती मिळताच त्याची पक्षातून हकालपट्टी करण्यात आली होती. पोलिसांनी या प्रकरणी दोघांना बेड्या ठोकल्या आहेत.

जयराज कोळी असे अटक करण्यात आलेल्या स्वयंघोषित सामाजिक कार्यकत्यार्चे नाव आहे. त्याच्यावर एका औषधी उपकरकणांच्या पुरवठादाराकडून 15 लाखांची खंडणी उकळण्याचा आरोप आहे. स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा व कागल पोलिसांनी मंगळवारी सकाळी एक संयुक्त कारवाई करत जयराज गोळी व त्याचा सहकारी युवराज खराडे यांना अटक केली. कोळीने फियार्दीला खंडणी द्या, अन्यथा तुमच्या पत्नीच्या नावाने खोटे चौकशीचे अर्ज टाकून त्रास देण्याची धमकी दिली होती.

पोलिसांच्या माहितीनुसार, जयराज कोळी एका औषधी उपकरणे पुरवठा करणाऱ्या व्यक्तीला चौकशीचे खोटे अर्ज दाखल करून वारंवार त्रास देत होता. 20 लाख रुपये दे त्यानंतर मी सर्व अर्ज मागे घेतो अशी मागणी त्याने केली होती. फिर्यादी व आरोपी यांच्यात अखेर 15 लाखांवर तडजोड झाली होती. कागलच्या लक्ष्मी टेकडी लगत हे पैसे देण्याचे ठरले होते.

पण तत्पूर्वीच फिर्यादीने या प्रकाराची माहिती पोलिसांना दिली. त्यानुसार पोलिसांनी व्यवस्थित सापळा रचून जयराज कोळी व युवराज खराडे या दोघांच्या मुसक्या आवळल्या. या दोघांवरही कागल पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## बहुतेक साहित्यिक लाचार

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४:

महाराष्ट्रामध्ये तिसरी भाषा म्हणून हिंदीची सक्ती करण्यात येत आहे. यावरुन उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी संताप व्यक्त केला आहे. महाराष्ट्रातील 90% साहित्यिक हे लाचार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. महाराष्ट्रात मराठी भाषेवर अन्याय होत असताना, अभिनेते नाना पाटेकर, प्रशांत दामले आणि माधुरी दीक्षित हे गप्प का? असा प्रश्न राऊत यांनी उपस्थित केला.

महाराष्ट्रामध्ये हिंदीची सक्ती करण्यासाठी देवेंद्र फडणवीस यांचा आटापिटा सुरू आहे. तर दुसरीकडे हिंदी भाषिक उत्तर प्रदेश मध्ये 5000 हिंदी भाषिक शाळा बंद पडल्या असल्याचा दावा राऊत यांनी केला आहे. मुंबई महानगरपालिकेसाठी हे सर्व सुरू आहे. या विषयी महाराष्ट्रातील साहित्यिकांशी चर्चा करण्याची गरज नाही, अभिनेते नाना पाटेकर, प्रशांत दामले, माधुरी दीक्षित कुठे आहेत? राज्यातील लाभार्थी आणि पुरस्कार प्राप्त 90% साहित्यिक हे लाचार असल्याचे राऊत म्हणाले.

# महादेव बाबर राष्ट्रवादीत

### उद्धव ठाकरेंना दादांचा झटका

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. २४ :

शिवसेना उद्धव बाळासाहेब पक्षाचे माजी आमदार महादेव बाबर यांनी सोमवारी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याची घोषणा केली.

ते दस्तुरखुद्द अजित पवारांच्या उपस्थितीत राष्ट्रवादीत प्रवेश करणार आहेत. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तोंडावर बाबर यांनी ठाकरे गटाला सोडचिठ्ठी दिल्यामुळे उद्धव ठाकरे यांना पुण्यात जोरदार झटका बसला आहे.

महादेव बाबर हे ठाकरे गटाकडून हडपसर विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी न मिळाल्यामुळे नाराज होते. या नाराजीतूनच त्यांनी ठाकरे गटाला जय महाराष्ट्र केला. सुरूवातीला बाबर कोणत्या पक्षात जाणार? याविषयी अनेक अटकळी व्यक्त केल्या जात होत्या. पण अखेर त्यांनी स्वतःच आपण सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाणार असल्याचे स्पष्ट केले. त्यांच्या पक्ष प्रवेशामुळे राष्ट्रवादीतील पुण्यातील ताकद वाढणार आहे.

मी पूर्वीपासूनच अजित पवार यांच्या काम करण्याच्या पद्धतीचा चाहता आहे. त्यातच सध्या त्यांची सत्ताही आहे. त्यामुळे विकासाचे मार्ग मोकळे आहेत. त्यामुळे मी ठाकरे गटाला सोडचिठ्ठी देत अजित पवारांच्या पक्षात जाण्याचा निर्णय घेतला आहे. माझ्या परिसराचा विकास हाच माझा अजेंडा आहे. येत्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही मी चांगले काम करून दाखवेल, असे महादेव बाबर बोलताना म्हणाले.

# महाराष्ट्रात दोन दिवस मुसळधार

### मराठवाडा व विदर्भात मध्यम ते जोरदार : समुद्रकिनाऱ्यावर जाणे टाळण्याचे आवाहन

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २४:

भारतीय हवामान विभागाने पुढील दोन दिवस महाराष्ट्रात मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. विशेषतः मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग तसेच पुणे, घाटमाथा, सातारा, कोल्हापूर आणि मराठवाडा व विदर्भात मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

विदर्भ विभागात नागपूर, अमरावती, चंद्रपूर, यवतमाळ या जिल्ह्यांत मंगळवारी आणि बुधवारी मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. विदर्भात ढगाळ वातावरण राहील. सकाळी काही ठिकाणी विजांसह मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता आहे.

मुंबईमध्ये पुढील सलग पाच दिवस समुद्राच्या लाटा मोठ्या प्रमाणात वाढणार आहेत. त्यामुळे किनारी भागांतील रहिवासी व पर्यटकांनी समुद्रकिनाऱ्यावर जाणे टाळावे. प्रशासन व बचाव दल सजग आहेत, पण प्रत्येकाची स्वतःची सुद्धा जबाबदारी आहे, सुरक्षित राहणे आणि सागरापासून लांब राहण्याचे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

अलिबाग तालुक्यात काल रात्रीपासून सुरू असलेल्या मुसळधार वादळी



पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. नाशिकमध्ये गोदावरी नदीची पूरस्थिती सलग सहाव्या दिवशीही कायम आहे. दुतोंड्या मारुतीच्या कमरेपर्यंत पुराचे पाणी पोहोचले असून, रामकुंड आणि गोदा घाटाचा परिसर पूर्णपणे पाण्याखाली गेला आहे.

सिंधूदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ तालुक्यात माणगांव खोऱ्यातील वसोली गावातील कर्ली नदीवरील कुत्रेकोंड पुलावरून दुचाकीस्वार वाहुन गेला तर त्यांच्यासोबत असलेला सहकारी बचावला आहे.

**मराठवाड्यात प्रशासन सतर्क**

पुढील 3-4 दिवसांत गुजरात, मध्य प्रदेश, महाराष्ट्रात अति जोरदार पावसाची शक्यता आहे. अशा हवामानामुळे आगामी काळात नागरिकांनी अधिक सतर्क राहण्याचा इशारा देण्यात आला आहे.

विदर्भात म्हणजे नागपूर, अमरावती, वर्धा, यवतमाळ इत्यादी भागात तसेच मराठवाड्यात हलका ते मध्यम पाऊस होणार असून, अतिरिक्त सावधगिरी आवश्यक आहे. काही भागांत विजा व वाऱ्याची शक्यता असल्याने स्थानिक प्रशासन सतर्क आहे.

कोकणातील घाटमाथ्यावर ढगांचा गडगडाट सुरू आहे. महाड, पोलादपूर, चिपळूण इ. ठिकाणी दरड कोसळण्याचा धोका कायम आहे. या भागातील लोकांनी हवामानानुसार सावधगिरी बाळगावी अशी सूचना जिल्हा प्रशासनाच्या वतीने देण्यात आली आहे. तर मुंबईत ढगाळ वातावरणामुळे दुपारी हलका ते मध्यम पाऊस झाला. परंतु, रात्री वाऱ्याबरोबर मुसळधार सरींचा इशारा देण्यात आला आहे. बीएमसीने नदी-नाल्यांच्या पाणी पातळीवर बारीक लक्ष ठेवण्यासाठी विशेष टीम तैनात केली आहे.

**हवामान विभागाच्या इशारा**

मुंबईसाठी यलो अलर्ट : आगामी 26 जून पर्यंत मुसळधार पावसाची शक्यता आहे; समुद्रकिनारी लाटांपासून सावध राहण्याचा इशारा देण्यात आला आहे.

रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, कोल्हापूर या जिल्ह्यांमध्ये ऑरेंज अलर्ट जाहीर करण्यात आला आहे.

विदर्भात अतिजोरदार पावसाचा अंदाज असून, यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. मराठवाडा भागात काही ठिकाणी अचानक जास्त पावसाची शक्यता असल्याने प्रशासनाला दक्ष राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

### त्रिभाषा सूत्रावर अंतिम निर्णयाआधी

# राज्यव्यापी सल्लामसलत!

### मुख्यमंत्री फडणवीस यांचा मोठा निर्णय

■ दीपक कैतके
मुंबई, दि. २४:



त्रिभाषा सूत्राच्या अंमलबजावणीबाबत राज्य शासन आता कोणताही एकतर्फी निर्णय घेणार नसून, साहित्यिक, भाषा तज्ज्ञ, राजकीय नेते आणि संबंधित सर्व घटकांशी सल्लामसलत करूनच अंतिम निर्णय घेतला जाईल, अशी स्पष्ट भूमिका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडली. वर्षा निवासस्थानी रात्री उशिरा झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

या बैठकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे, राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर तसेच शिक्षण विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बैठकीत त्रिभाषा सूत्राचा सखोल आढावा घेण्यात आला.

यावेळी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाअंतर्गत मराठी विद्यार्थ्यांचे ॲकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिट प्रणालीतील संभाव्य नुकसान टाळण्याबाबतही चर्चा झाली. सर्व राज्यांतील धोरणात्मक स्थिती, त्यांचा अनुभव आणि अभ्यास लक्षात घेऊन महाराष्ट्रासाठी समग्र सादरीकरण तयार करण्यात येईल, असा निर्णयही यावेळी झाला.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, हा विषय केवळ भाषेचा नाही, तर विद्यार्थ्यांच्या भविष्यातील संधींचा आहे. त्यामुळे कोणताही निर्णय सर्व संबंधितांची मते ऐकून, सखोल अभ्यास केल्यानंतरच घेतला जाईल.

शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे हे आता सल्लामसलतीची प्रक्रिया राबविणार असून, विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ आणि राजकीय नेतृत्वाशी थेट संवाद साधण्यात येणार आहे. या बैठकीला मुख्यमंत्री सचिवालयाचे डॉ. श्रीकर परदेशी, उपमुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव असीमकुमार गुप्ता, प्रधान सचिव नवीन सोना, शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंग देओल, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रतापसिंह, राहुल रेखावार हे उपस्थित होते.

# भाजप कार्यकर्ते पंकज देशमुख यांची आत्महत्या नव्हे तर घातपात

## सर्वपक्षीय न्याय हक्क जन आंदोलन समितीचा आरोप



■ महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. २४ :

भाजप कार्यकर्ते पंकज देशमुख यांची आत्महत्या नव्हे तर घातपातच असल्याचा गंभीर आरोप जळगाव मतदारसंघातील सर्वपक्षीय न्याय हक्क जन आंदोलन समितीने केला. हा सर्व घटनाक्रम आणि पोलिसांची भूमिका, तपास संशयांस्पद असून या घटनेची सीआयडीमार्फत चौकशी करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

सत्ताधारी, विरोधी अशा सर्वपक्षीय नेत्यांचा समावेश असलेल्या न्याय हक्क जन आंदोलन समितीने आज, मंगळवारी याप्रकरणी जिल्हाधिकारी किरण पाटील यांची भेट घेऊन त्यांना न्यायासाठी साकडे घालत निवेदन दिले. यानंतर स्थानिय शासकीय विश्रामगृहात प्रसिद्धी माध्यम प्रतिनिधींसोबत संवाद साधला.

यावेळी दिवं. पंकज देशमुख यांच्या विधवा पत्नी व त्यांची दोन मुले, सुनीता देशमुख, त्यांचे बंधू गजानन देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच शिवसेना ठाकरे गटाच्या राज्य प्रवक्त्या जयश्री शेळके, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे जिल्हा कार्याध्यक्ष तथा सहकार नेते ॲड. प्रसेनजित पाटील, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे जळगाव विधानसभा अध्यक्ष रंगराव देशमुख, काँग्रेस नेत्या स्वाती वाकेकर, सामाजिक कार्यकर्ते विजय पोहनकर, अभय मारोडे, मनोज वाघ, शिवसेना शिंदे गटाचे विधानसभा प्रमुख अजय पारस्कर, ज्येष्ठ आंबेडकरी नेते भाऊ भोजने, शिवसेना उबाठाचे विधानसभा संघटक भीमराव पाटील, समाजवादी पार्टीचे सैय्यद नफिज, वंचित बहुजन आघाडीचे रमेश नाईक, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे विश्वास पाटील यांच्यासह सर्वपक्षीय नेते, पदाधिकारी बहुसंख्येने उपस्थित होते.

यावेळी सुनीता देशमुख यांनी आपले पती पंकज देशमुख यांची आत्महत्या नसून घातपात असल्याचा स्पष्ट आरोप केला. माझे पती आत्महत्या इकरण्याइतपत कमकुवत नव्हते. भाजपमधील काही कार्यकर्त्यांनी आपणास न्याय मिळवून देण्याचे आश्वासन दिले, पण ते पाळले नाही. त्यांनी विश्वासभंग केला. त्यामुळे मी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांकडे न्यायासाठी साकडे घातले. मात्र न्याय मिळाला नाही. अजित पवारांमुळे वरिष्ठ स्तरावर काही हालचाल झाली, पण जळगाव पोलीस मात्र ढिम्मच असल्याचे त्या म्हणाल्या. आपणास पतीचा मृतदेहदेखील उशिरा दाखवण्यात आला. शवविच्छेदन जळगावऐवजी अकोला येथे करण्यात आले. यामुळे या प्रकरणाची सीआयडी चौकशी करून आपणास न्याय द्यावा, अशी मागणी त्यांनी यावेळी केली.

सुनीता देशमुख यांचे भाऊ गजानन देशमुख यांनी जळगाव पोलिसांवर आमचा विश्वास नसल्याचे सांगून ते नुसता वेळकाढूपणा करीत असल्याचा आरोप केला.

ॲड. प्रसेनजित पाटील आणि स्वाती वाकेकर यांनी यावेळी सांगितले की, ही आत्महत्या नव्हे तर हत्याच आहे. आत्महत्येचा बनाव करण्यात आला. मात्र, गळ्याला लागलेला नाममात्र फास, पंकज देशमुख यांच्या अंगावरील वळ, मारहाणीच्या जखमा, त्यांचे जमिनीवर असलेले पाय, यांकडे दुर्लक्ष करण्यात आले.

# जिल्हाधिकारी कार्यालयामध्येच कंत्राटी कर्मचाऱ्याने काढले कपडे

■ महासागर प्रतिनिधी, यवतमाळ, दि. २४ :

गेल्या ५ वर्षांपासून वेतनापासून वंचीत असलेल्या एका कंत्राटी कर्मचाऱ्याने चक्क जिल्हाधिकारी यांच्या कक्षासमोर अंगावरील कपडे काढत आंदोलन करीत प्रशासनाचे लक्ष वेधले. हा प्रकार सोमवारी दि. २३ जूनला दुपारच्या सुमारास घडला असून तो कर्मचारी जीवन प्राधिकरण कार्यालयात कंत्राटी कामगार म्हणून कार्यरत होता.

रोहन रामटेके असे असे त्या कंत्राटी कर्मचाऱ्याचे नाव आहे. या घटनेने जिल्हाधिकारी कार्यालयात एकच खळबळ उडाली, घटनेचे गांभीर्य लक्षात घेता शहर पोलिसांना पाचारण करण्यात आले असून त्या कर्मचाऱ्याला शहर पोलिसांनी स्थानबध्द केले आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालय यवतमाळ येथे रोहन रामटेके हा पंप ऑपरेटर म्हणून २०२० पासून कर्तव्यावर होता. वेतनापासून वंचीत असलेल्या कंत्राटी कर्मचारी रोहन रामटेके याने जिल्हाधिकारी कार्यालयात आंदोलन केले. जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारी, जीवन प्राधिकरण कार्यालयाचे कार्यकारी अभियंता प्रफुल व्यवहारे यांना पोलिस ठाण्यात बोलवून कंत्राटी कर्मचाऱ्याच्या मागण्याबाबत विचारणा करण्यात आली.




MIRAE ASSET
Mutual Fund

In order to impart an insight on mutual fund, to educate and create awareness among the investors about the financial market, Mirae Asset Mutual Fund undertakes numerous events and activities at various places across the country and in number of ways such as conducting Investor Awareness Programs (IAPs) / Investor meets, contents on investor awareness in print media (newspapers, magazines etc.) and programs on Mutual Funds in electronic media (TVs, radios etc.).

In this regard, please see below schedule of upcoming IAP:

| Date | Time | Address |
|---|---|---|
| June 27, 2025 | 6:00 P.M. | Chitnavis Centre, Civil Lines, Nagpur - 440 010. |

MIRAE ASSET MUTUAL FUND (Investment Manager: Mirae Asset Investment Managers (India) Private Limited. CIN - U65990MH2019PTC324625)
Registered & Corporate Office: 606, 6th Floor, Windsor Building, Off CST Road, Kalina, Santacruz (E), Mumbai - 400098. ☎ 1800 2090 777 (Toll free), ✉ customercare@miraeasset.com 🌐 www.miraeassetmf.co.in

Mutual Fund investments are subject to market risks, read all scheme related documents carefully.


# आठवडी बाजारातील व्यावसायिक गाळ्यांना लागली उतरती कळा

■ महासागर प्रतिनिधी, मलकापूर, दि. २४ :

जवळपास सत्तर ते ऐंशी वर्षांपूर्वी येथील आठवडी बाजारात व्यावसायिकांसाठी गाळ्यांची निर्मिती करण्यात आली होती. परंतु, प्रशासनाने दुर्लक्ष केल्यामुळे या गाळ्यांना उतरती कळा लागली आहे. बहुतांश गाळे जीर्ण झाले असून, ते कधीही कोसळण्याची शक्यता आहे. त्यामुळे व्यावसायिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे.

जिल्ह्यात सर्वांत मोठी बाजारपेठ म्हणून मलकापूर पांग्रा गावाची ओळख आहे. या बाजारात जिल्ह्यातील खामगाव, मेहकर, लोणार, सिंदखेडराजा, चिखली देऊळगावराजासह परजिल्ह्यातील व्यावसायिक येत असतात. जवळपास सत्तर ते ऐंशी वर्षांपूर्वी येथील आठवडी बाजारात व्यावसायिकांसाठी गाळ्यांची निर्मिती करण्यात आली होती. परंतु दरम्यानच्या काळात प्रशासनाने या गाळ्यांची कोणतीही दुरुस्ती न केल्यामुळे बहुतांश गाळे मोडकळीस आले आहेत. जीर्ण झालेले हे गाळे कधीही कोसळण्याची शक्यता आहे. त्यामुळे व्यावसायिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. गाळ्यांच्या दुरुस्तीबाबत शासकीय व राजकीय अनास्था दिसून येत आहे. आठवडी बाजारात सर्वत्र घाणही पसरली असून, घाण पाण्याच्या नाल्या भरून वाहत आहेत. थोडाही पाऊस पडला की बाजारात चालणे कठीण होत आहे. परिणामी अनेक व्यावसायिक या नाल्यांवरच आपली दुकाने थाटत आहेत. खरेदीसाठी आलेल्या ग्राहकांना घाण पाण्याचा सामना करावा लागत आहे. आठवडी बाजाराची भयावह परिस्थिती झाली असतानाही प्रशासन कोणत्याही उपाययोजना न करता केवळ वसुली करण्यात व्यस्त आहे.

वास्तविक बाजार लिलावाच्या माध्यमातून प्रशासनाला दरवर्षी जवळपास सात लाख रुपयांच्या महसूल प्राप्त होतो. परंतु, त्या तुलनेत व्यावसायिकांना कोणत्याही सुविधा देण्यात येत नाहीत. बाजारातील पाण्याच्या टाकीची दुरावस्था झाली असून, शौचालयही बंद पडले आहे.

# महाराजस्व समाधान शिबिर

■ महासागर प्रतिनिधी, अडगाव, दि. २४ :

येथील ग्राम सचिवालयात अडगाव बु. मंडळ अंतर्गत महाराष्ट्र शासनाच्या आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. २५० विविध दाखल्यांचे वितरण यावेळी करण्यात आले. नायब तहसीलदार एस. पी. ढगे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास सरपंच शोभा रमेश खंडारे, मंडळ अधिकारी सुधाकर सोनोने, माजी सरपंच अशोक घाटे, गटनेते संजय राजनकर, पोलिस पाटील हितेश हागे, माजी प.सं. सदस्य गुलाब डाबेराव, कृषी सहायक बिहाडे,सारभूकन, देशमुख,अंगणवाडी पर्यवेक्षिका वैशाली बोदडे,आशा समन्वयक सविता भागवतकर, सेतू संचालक शेख नासिर उल्ला, अमोल खंडारे, शशी नवले यांची उपस्थिती होती.

# विद्यार्थिनींनी केले शाश्वत शेती विकासासाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन




■ महासागर प्रतिनिधी,अमरावती, दि. २४ :

डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ संलग्नित श्रीमती सुमित्राबाई अंधारे कृषी महाविद्यालयातील अंतिम वर्षाच्या विद्यार्थिनींनी ग्रामीण कृषीकायार्नुभव गाव शिर्ला येथे जाऊन शेतकऱ्यांना शाश्वत शेती, पिकावरील रोग व कीटक व्यवस्थापन आणि कृषी विषयक जनजागृती करून त्यांना शेतीमधील विविध प्रात्यक्षिके करून दाखविली. या कार्यक्रमाचा उद्देश शाश्वत शेतीविषयक व्यावहारिक ज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणे हा होता विद्यार्थिनींनी शेतकऱ्यांना पीक उत्पादनवाढीसाठी तंत्रशुद्ध माती परीक्षण, शेती व्यवस्थापनाचे आर्थिक नियोजन आणि पिकांची आरोग्य सुधारणा या मूलभूत विषयांवर मार्गदर्शन केले. सदर विषयासंदर्भात या कार्यक्रमाचे मार्गदर्शक प्राचार्य डॉ. राम खरडे प्रा. रोहित कनोजे, ग्रामीण कृषी कायार्नुभव कार्यक्रमाचे अधिकारी व कीटकशास्त्र विभागाचे प्रा. पांडुरंग जाधव, कार्यक्रमाचे समन्वयक शिवकुमार राठोड. तसेच शेतकरी सुरेश वसतकर व त्यांची पत्नी उपस्थित होते. या कार्यक्रमांमध्ये कृषीकन्या कू प्रमवी विरघट कु नेहा चव्हाण, प्रतीक्षा जंजाळ, प्रगती मेसरे यांनी विविध प्रात्यक्षिके सादर केली.

# विद्यापीठातील आजीवन अध्ययन विभागाचा पदवीदान समारंभ

■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. २४ :

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचा उद्या २५ जून, २०२५ रोजी सकाळी 11.00 वा. विद्यापीठ परिसरातील हकश्राव्य सभागृहात पदवीदान समारंभ आयोजित करण्यात आला आहे.

समारंभाचे अध्यक्षस्थान प्र-कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे भूषविणार असून प्रमुख मार्गदर्शक म्हणून ब्रजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य तथा विद्यापीठ विद्या परिषद सदस्य डॉ. दीपक धोटे उपस्थित राहणार आहेत. तर प्रमुख अतिथी म्हणून आजीवन अध्ययन व विस्तार मंडळाचे सदस्य डॉ. रवींद्र सरोदे, अधिसभा सदस्य डॉ. सुभाष गावंडे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदूरकर यांची उपस्थिती लाभणार आहे. समारंभाला सर्व पदवीधरांनी उपस्थित रहावे, असे आवाहन विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांनी केले आहे.

# अमरावतीला ५ नव्या ई-शिवाई एसटी बसेस आ. सुलभा खोडकेंच्या हस्ते लोकार्पण

■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. २४ :



मागील दोन वर्षांच्या प्रतीक्षेनंतर अखेर अमरावती एसटी विभागाला सोमवारी पाच नव्या इलेक्ट्रिक शिवाई बसेस मिळाल्या. सकाळी ११ च्या सुमारास आ. सुलभा खोडके यांच्या हस्ते या पाचही ई-शिवाईचे लोकार्पण करण्यात आले. ११.४५ वाजताच्या सुमारास अमरावती-नागपूर या पहिल्याच ई-शिवाई बसमध्ये ३५ प्रवासी नागपूरकडे रवाना झाले.

तपोवन येथील एसटीच्या कार्यशाळेत एकाचवेळी १७ बसेस चार्ज करण्याची सोय आहे. तसेच एकदा चार्ज केली की ही ई बस २८० किमी धावते. ई-शिवाई तिकिटाचे दर हे शिवशाहीच्या तुलनेत थोडेसे जास्त आहेत. अमरावती ते नागपूर प्रवासाचा विचार करता शिवशाहीने प्रौढांना ३८८ रुपये, महिला व ज्येष्ठ नागरिकांना २०३ रुपये तर शिवाईने प्रवासाकरिता प्रौढांना ४१४ रुपये.

तसेच महिला व ज्येष्ठ नागरिकांना २१७ रुपये खर्च करावे लागतील. अमरावती ते परतवाडा प्रवासाकरिता शिवशाहीने प्रौढांना १३५, महिला व ज्येष्ठ नागरिकांना ७१ रु. तर शिवाईने प्रौढांना १४४ व महिलांसह ज्येष्ठ नागरिकांना ७६ रु. तिकीट दर पडेल. तसेच अमरावती-यवतमाळसाठी शिवशाहीने प्रौढांना २३९, महिला व ज्येष्ठांना १२५ तर शिवाईने प्रवास करण्यासाठी प्रौढांना २५५ तसेच महिला व ज्येष्ठांना १३४ रुपये मोजावे लागणार आहेत.

# योगांजलीत आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

■ महासागर प्रतिनिधी, बुलडाणा, दि. २४ :

आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने येथील योगांजली योग वर्गात आसन व प्राणायाम यासंबंधी एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी मान्यवरांनी ओंकार प्रतिमा, महर्षी पतंजली, भारत प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून केले.

दक्षिण आफ्रिकेतील खडतर असे कॉम्रेड मॅरेथॉन पूर्ण करून आल्याबद्दल डॉ.अश्विनी जाधव, संतोष जाधव यांचा स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला आहे. राष्ट्रीय योगपटू बालयोगी क्षितिज निकम याचे सीबीएससी स्तरावरील शालेय राष्ट्रीय स्तरावरच्या उत्कृष्ट सहभागाबद्दल स्मृती चिन्ह देऊन कौतुक करण्यात आले.


NAGPUR MUNICIPAL CORPORATION
Tender Notice

Commissioner, Nagpur Municipal Corporation, Nagpur, invites tenders in appropriate form for the following works. These tenders can be purchased by registered contractors from the office of the Executive Engineer (Electrical), NMC, Nagpur. Purchase and submission of tenders can be done from the office of the Executive Engineer (Electrical), NMC, Nagpur.

| Name of the Work | Project Cost(in Rs.) |
|---|---|
| Electrification of Lashkaribagh Panchpaoli UPHC under Zone No. 09, NMC Nagpur | 2,43,589/- |
| Lighting arrangement at Mayur Nagar garden in pr. No. 02 under zone no. 09 NMC | 2,45,444/- |
| S & E 8 Mtr. Octagonal pole and Flood light Fitting at Sugat Buddha Vihar in prabhag no.23, Zone no. 08. | 2,37,736/- |

Note - 1) Tender Submission end date : 30-06-2025. 2) Date of Opening of Tender (If Possible) : 01-07-2025. 3) Rates are exclusive of G.S.T.

Advt No. 209 PR Date 24.06.2025

Executive Engineer (Electrical)
N.M.C. Nagpur

P/N/25/209



# कार्यालय नगर परिषद उमरेड

## (जिल्हा- नागपुर )

क्रंमाकः- एमसीयु / कवि / / २०२५ दिनांकः-

**जाहीरनामा**

ह्याद्वारे नागरिकांना सुचित करण्यात येते की, नगर परिषद परिसरातील खाली नमुद केलेल्या मालमत्तेचे फेरफार करण्याबाबत खालील अर्जदारांनी कार्यालयात अर्ज सादर केलेला आहे.

| अ. क्र. | हल्ली नगर परिषद रेकॉर्डवर असलेले नाव | वार्ड क्रमांक | मालमत्ता क्रमांक | शिट क्रमांक / न.भु. क्र. सर्व्हे क्रमांक | अर्जदाराचे नाव (ज्याचे नावे फेरफार घ्यावयाचे आहे त्याचे नाव) | फेरफाराकरीता सादर केलेले दस्ताऐवज |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | रामचंद्र चैतु नान्हे | १० मंगळवारी पेठ | ५३४४ | न.भु. क्रे ३१६९<br>शिट क्रमांक ५०<br>क्षेत्रफळ ६१.२० | श्रवण रामचंद्र नान्हे,<br>सौमा रामचंद्र नान्हे | वारसान शपथपत्राप्रमाणे व सिटी सर्व्हे येथील मालमत्ता पत्रकातील घेतलेल्या फेरफार नोंदीप्रमाणे |
| २ | संध्या सुभाष देवसरकार | ८ कावरा पेठ | ४१९६ | न.भु. क्र १६५७<br>शिटक्रमांक ३०<br>क्षेत्रफळ १११.५० | पराग सुभाष देवसरकार | वारसान शपथपत्राप्रमाणे व सिटी सर्व्हे येथील मालमत्ता पत्रकातील घेतलेल्या फेरफार नोंदीप्रमाणे |
| ३ | महा शासन भोग.<br>शामराव मारोती उरकुडे | ८ कावरा पेठ | ४२१८ | क्षेत्रफळ ५०० | राजू शामराव उरकुडे | वारसान शपथपत्राप्रमाणे व नगर परिषद ठरावाप्रमाणे |
| ४ | महा. शासन भोग.<br>अशोक राघोजी ठाकरे | ८ कावरा पेठ | ४३०१,<br>४३०२ | क्षेत्रफळ १००० | प्रमिला अशोक ठाकरे,<br>सागर अशोक ठाकरे | वारसान शपथपत्राप्रमाणे व नगर परिषद ठरावाप्रमाणे |
| ५ | गजानन सदाशिव भिवापूरकर | १६ जोगिठाना पेठ | ७४६३ | न.भु. क्रं ४८८१<br>शिट क्रमांक ६०<br>क्षेत्रफळ १३१.१० | दुर्गा सुरेश निखारे,<br>वनिता देवराव शेटे,<br>गीता राकेश कुंभारे,<br>सुनीता विलेश किन्हेकर | वारसान शपथपत्राप्रमाणे व आखीव पत्रिकेप्रमाणे |
| ६ | बेबीनंदा नरेश दुबे | २० बेलगाव | १६८१८ | प.ह.न. ४६, प्लॉट नं २१<br>मौजा. बेलगाव उमरेड<br>सर्व्हे क्रमांक ५१८/२<br>क्षेत्रफळ १६२ | अंकित नरेश दुबे | वारसान शपथपत्राप्रमाणे व सातबारा नोंदीप्रमाणे. |
| ७ | ज्ञानेश्वर सुदामजी झोडे | २० बेलगाव | १०४७६ | प.ह.न. ४५, प्लॉट नं ८<br>मौजा. बेलगाव उमरेड<br>सर्व्हे क्रमांक ४७<br>क्षेत्रफळ १५० | नलिनी जानेश्वर झोडे,<br>अरुणा नामदेव पाटील,<br>अजय ज्ञानेश्वर झोडे,<br>राणी जानेश्वर झोडे,<br>वैष्णवी जानेश्वर झोडे | वारसान शपथपत्राप्रमाणे व सातबारा नोंदीप्रमाणे, |
| ८ | इंदिरा ईश्वर बावस्कर,<br>देवेंद्र ईश्वर बावस्कर,<br>प्रशांत ईश्वर बावस्कर | ४ बुधवारी पेठ | १६१४,<br>१६१७ | न.भु. क्रे १७६७<br>शिट क्रमांक ३१<br>क्षेत्रफळ ७०.५० | इंदिरा ईश्वर बावस्कर,<br>प्रशांत ईश्वर बावस्कर हे नाव कायम ठेऊन नीता देवेंद्र बावस्कर,<br>इशांत देवेंद्र वावस्कर | वारसान शपथपत्राप्रमाणे व सिटी सर्व्हे येथील मालमत्ता पत्रकातील घेतलेल्या फेरफार नोंदीप्रमाणे |
| ९ | मधुकर काशिनाथ मौदेकर | २१ इतवारी पेठ | ११०४२ | न.भु. क्रं ६५०१<br>शिट क्रमांक ७६<br>क्षेत्रफळ २६.०० | सुमन मधुकर मौदेकर,<br>रोशन मधुकर मौदेकर | वारसान शपथपत्राप्रमाणे व सिटी सर्व्हे येथील मालमत्ता पत्रकातील घेतलेल्या फेरफार नोंदीप्रमाणे |
| १० | मधुकर लक्ष्मण डाखोरे | ५ गांगापूर | २४२३ | न.भु. क्रं २११<br>शिट क्रमांक १०<br>क्षेत्रफळ ५७.२५ | हिवराज मधुकर डाखोरे,<br>रोशन मधुकर डाखोरे | वारसान शपथपत्राप्रमाणे व सिटी सर्व्हे येथील मालमत्ता पत्रकातील घेतलेल्या फेरफार नोंदीप्रमाणे |
| ११ | हरिहर ग्यानू महाजन | १९ इतवारी पेठ | ८६२८ | न.भु. क्रं ४०९५<br>शिट क्रमांक ५८<br>क्षेत्रफळ ६९.९० | सुमित्रा गोविंदराव गाडीवान,<br>प्रतिभा हरिहर महाजन,<br>पंकज हरिहर महाजन | वारसान शपथपत्रा व सातबारा नोंदीप्रमाणे. |
| १२ | रामलाल वासुदेव पलीया | ७ कावरा पेठ | ३७४० | न.भु. क्रं १४६२,<br>शिट क्रमांक २८<br>क्षेत्रफळ १६५ | चंद्रशेखर रामलाल पलीया,<br>ओमप्रकाश रामलाल पलीया,<br>गोपाल रामलाल पलीया,<br>गीताबाई राजेंद्र चौबे | वारसान शपथपत्रा व भूमी अभिलेख प्रमाणे |

उपरोक्त नमुद मालमत्तेवरील व त्या व्यतीरिक्त ज्याचा हक्क संबध असेल त्यानी सदर्दू मालमत्तेबाबत कोणताही आक्षेप असल्यास हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्याने तारखेपासुन आवश्यक दस्ताऐवजासह लेखी आक्षेप १५ दिवसाचे आत मुख्य अधिकारी, नगर परिषद उमरेडला सादर करावा. नमुद मुदतीचे आत कोणत्याही स्वरूपाचे आक्षेप प्राप्त न झाल्यास वर नमुद अर्जाचे अनुषंगाने दायित्व बदलविण्याचा निर्णय घेण्यात येईल, तरी सबधितांनी नोंद घ्यावी.

मुख्य अधिकारी
नगर परिषद उमरेड.

# शाळेची पटसंख्या वाढविणे फक्त शिक्षकांची जबाबदारी?

**महाराष्ट्रात सध्या जिल्हा परिषद शाळांमध्ये पटसंख्या कमी असलेल्या शाळेतील अनेक शिक्षकांवर निलंबनाची कार्यवाही करण्यात आली. या कार्यवाही विषयी एक नागरिक म्हणून खुप प्रश्न निर्माण डोक्यात येतात.**

---------



**विनोद पंजाबराव सदावर्ते**
समाज एकता अभियान
रा. आरेगांव, ता. मेहकर.
जि. बुलढाणा.
9130979300

येथे मी शिक्षकांची बाजू अजिबात मांडत नाही फक्त न्यायीक पद्धतीने व्यवस्थेचा विचार करतो. अपवादात्मक शिक्षक वगळता अनेक शिक्षक सामाजिक व शैक्षणिक कायार्पासून खुप दुर आहेत.

पगार, पत्नी आणि परिवारात ते मग्न आहेत. शिक्षणाची गुणवत्ता व शिक्षणातील तर्कवाद कमी व्हायला शिक्षक जबाबदार आहेत हे कोणीही नाकारू शकत नाही. गुलामीच्या बेड्या तोडून मानवी स्वातंत्र्य व विज्ञानवादातुन मानसाची प्रगती हे ध्येय घेऊन महात्मा फुले व सावित्रीमाई फुले यांनी शिक्षण सुरू करून समाजात क्रांती करून जागृती केली, शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे आणि जो प्राशन करेल तो गुरगुरल्या शिवाय राहणार नाही असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे असताना किती शिक्षकांची विद्यार्थी विज्ञाननिष्ठ, तर्कवादी, जागृत व अन्याया विरूद्ध आवाज उठवणारे आहेत? याची समिक्षा शिक्षक करतील का?

शिक्षकांविषयी अनेक प्रश्न व शंका डोक्यात आहेतच तरीही पटसंख्या कमी झाली म्हणून शिक्षकांवर निलंबणाची कार्यवाही केली हा शिक्षकांवर झालेला अन्याय आहे. अन्याया विरोधी जो बोलतो तोच खरा सुशिक्षित आहे.

जिल्हा परिषद शाळेची पटसंख्या कमी का झाली? याला कारणीभूत फक्त शिक्षकच आहेत का? यावर विचार विनीमय होणे आवश्यक आहे. जेही लोक कारणीभूत आहेत त्या सर्वांवर कारवाई होणे गरजेचे आहे. चला आपण विचार करू या.

जिल्हा परिषद शाळेची विद्यार्थी संख्या कमी का झाली याचे एकमेव कारण म्हणजे खाजगीकरणाच्या नावाखाली खाजगी शाळांना मान्यता देऊन शिक्षणाचा व्यापर करणे. खाजगी शाळा सुरू झाल्या लाखों रुपये लोक फि भरून मुलांना शैक्षणिक कमकुवत करत आहेत ते फक्त खोटे स्टेटस टिकण्यासाठी.

श्रीमंत व नोकरदार व्यक्तींच्या लोकांनी आपली मुलं खाजगी शाळेत टाकले म्हणून सर्वसामान्य लोकांनी कर्ज काढून खोटी प्रतिष्ठा जपण्यासाठी व आपणही गरीब नाही हे दाखवण्यासाठी आपली मुलं खाजगी शाळेत टाकली. खाजगी शाळेत पैसे भरून मुलांना टाकणारे लोक सुशिक्षित आहेत का तर मुळीच नाही.

ते सुशिक्षित आणि हुशार या दोन्ही प्रवर्गात न येता ते खोटी प्रतिष्ठा जपणा?या बेगडी व मानसिक गुलाम प्रवर्गात मोडतात. याचे कारणही तसेच आहे शेतक?यांना कडून भाजीपाला घेतांना भाव करणारे, एकही रुपया गोरगरिबांना न देणारे, लोकांना व्याजाने पैसे देणारे व वरतोंड करून हक्क अधिकाराच्या बाता करणाऱ्यांना प्राथमिक शिक्षण हे सक्तीचे व मोफत आहे हे कळत नसेल आणि मोफतच्या शिक्षणासाठी वर्षाला लाखों रुपये खर्च करणाऱ्या लोकांना सुशिक्षित व हुशार कसं म्हणायचं?

खाजगी शाळांवर नियंत्रण हाच खुप मोठा उपाय आहे जिल्हा परिषद शाळेतील पटसंख्या वाढविण्यासाठी. दुसरी गोष्ट म्हणजे एकदा निवडून आलेल्या आमदार खासदारांचे एका वर्षाच्या आत मोठ मोठे प्रशस्त बंगले, हॉटेल, बँका, कंपन्या, भुखंड आणि बरेच काही महागड्या वस्तुची कमाई होते. परंतु पंधरा विस वर्षे आमदार खासदार राहीलेला एक तरी नेता छाती ठोक पणे सांगू शकतो का? माझ्या मतदार संघातील जिल्हापरिषद शाळेची इमारत प्रशस्त, स्वच्छ व आनंददायी आहे.

जिल्हा परिषद शाळेच्या इमारती आजही बहुतांश स्वातंत्र्य पुर्व काळातील आहेत. त्याची रंगरंगोटी करण्यासाठी सरकार कडे पैसे नसावे?

राज्यात बिअर पिणाऱ्यांची संख्या वाढविण्यासाठी समिती गठीत केली जाते उत्पादन शुल्क कमी केले जाते तर शाळेतील पटसंख्या वाढविण्यासाठी शासनाने समिती गठीत केल्याचे कुणाला माहिती आहे का?

जिल्हा परिषद शिक्षकांना शिकवण्याचे काम कमी आणि इतरकामे जास्त दिली जातात परंतु विद्यार्थांची संख्या वाढविण्यासाठी नियोजन करण्याचे काम दिले जात नाही. जिल्हा परिषद शाळेच्या पाच किलोमीटर पर्यंत तरी खाजगी शाळेची परवानगी नाकारली तरीही जिल्हा परिषद शाळेला सोन्याचे दिवस येतील.

शाळेतील पटसंख्या कमी होणे ही चिंतेची बाब आहेच हे कोणीही नाकारू शकत नाही पण शिक्षकांचे निलंबन हा योग्य उपाय आहे का? बरं पटसंख्ये सारख्याच अनेक गंभीर समस्या आपल्या समोर आहेत जसे अनेक ठिकाणी खड्यात रस्ते आहेत, जलजिवन मिशन योजनेचे कामही झाले नाहीत बिलही निघालेले आहेत, विमानतळ, रेल्वे, पुतळे, पुल उद्घाटन झाल्यानंतर काहीच दिवसात कोसळले, हजारो करोडो रुपयांचा चुराडा करून निकृष्ठ दर्जाचे काम केले गेले. किती गंभीर आहे? मग त्या मतदारसंघातील आमदार खासदार, संबंधित इंजिनिअर, मंजूर करणारे अधिकारी यांच्यावर कारवाई कधी होणार?

ब्रिटिश कालीन पुल, रस्ते, इमारती आजही मजबूत आहेत पण आपल्या सरकारने बांधलेले रस्ते, पुल, पुतळे वाऱ्या व पावसाने पडतात तर किती जबाबदार लोकांचे निलंबन केले? मग शिक्षकांवरच कारवाई का?

खाजगी शिक्षण संस्था बहुतांश राजकीय नेते व त्यांचे नातेवाईक यांच्या च आहेत म्हणजे राजकीय लोकांच्या हितासाठी सर्व सामान्य लोकांचा घात करणे यालाच पारदर्शक व इमानदार सरकार म्हणायचे का?

फक्त शिक्षकांवर कारवाई आणि इतरांना सुट यालाच न्याय म्हणायचे का? शिक्षकांचे निलंबन झाले असताना शिक्षकांनी गप्प राहणे याला सुशिक्षित म्हणायचे का? आज काही शिक्षक निलंबित झाले उद्या कोणावरही वेळ येऊ शकते परंतु याचे गांभीर्य किती लोकांना आहे?

जिल्हा परिषद शाळेची पटसंख्या कशी वाढेल या साठी ज्या गावात पटसंख्या कमी आहे तिथे जाऊन सर्वसामान्य लोकांना जरी विचारले आणि तसे उपाय केले तर पटसंख्या वाढू शकते. मुळात वर्ग सात शिक्षक चार, वर्ग चार शिक्षक दोन असे नियोजन आणि त्यातही निलंबन असे केले तर संख्या कशी वाढेल?

पटसंख्या वाढविण्यासाठी सोपे उपाय आहेत. परंतू ते उपाय सोडून शिक्षकांचे निलंबन करणे म्हणजे जिल्हा परिषद शाळेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थी व पालकांचे खच्चीकरण करणे होय. शाळेची इमारत जुनी व रंगरंगोटी नाही म्हणून कोण जबाबदारी स्विकारणार? शाळेमध्ये पुरेसे शिक्षक नाही म्हणून कोण जबाबदारी स्विकारणार?

प्रत्येक ऑफिस मध्ये भ्रष्टाचार आहे कोणाला निलंबित करणार? लोकांचे काम वेळेवर होत नाहीत कोणाला निलंबित करणार? पोलीस, तलाठी, ग्रामसेवक सारखे लोक करोडो रुपयांचे गबाड गोळा करतात कोणाचे निलंबन करणार? अनेक नोकरदार लोक दिवसभर कामाच्या ठिकाणी बसतच नाहीत त्यांच्या वर काय कारवाई होणार?

गुन्हेगारी वाढली म्हणून पोलीस निलंबित होत नाहीत, सर्वसामान्य लोकांना पैसे न देता योजनेचे घरकुल मिळत नाहीत तेव्हा मात्र कोणीही निलंबित केले जात नाही. खाजगीकरण आणून सर्वात अगोदर शिक्षणावर घाव घातला गेला तेव्हा एकही शिक्षक बोलला नाही.

आता शिक्षण राहिले बाजूला शिक्षकावरच घाव घालत आहेत. तेव्हाही शिक्षक पेटून उठून स्वतःचे भविष्य वाचवू शकत नसतील तर ते शिक्षक विद्यार्थ्यांचे भविष्य काय घडवणार? पटसंख्येचे कारण दाखवून शिक्षकांना घरी बसवले जात असेल आणि शिक्षक गप्प असतील तर याचा अर्थ पटसंख्या कमी व्हायला शिक्षकच जबाबदार आहेत, हे शिक्षकांना मान्य आहे आणि निलंबनाची कारवाई योग्यच आहे हे सिद्ध होते.

शिक्षकांनी जागृत होऊन आवाज उठवणे अत्यंत आवश्यक आहे. पटसंख्या कमी आहे म्हणून शिक्षकावर ठपका ठेऊन घरी बसवणे चुकीचे आहेच. शिक्षक दजेर्दार शिक्षण देत नाहीत, शिक्षक वेळेवर शाळेत येत नाहीत, शिक्षक धर्मनिरपेक्ष राहत नाहीत, शिक्षक अंधविश्वास व पाखंडाला चालना देऊन विद्यार्थ्यांना तर्क, सत्य व विज्ञान यापासून दुर ठेवतात या कारणांमुळे कमी केले तर कोणताही प्रश्न उपस्थित होणार नाही.

पण शिक्षकांना पटसंख्येचे कारण दाखवून निलंबित केले तर हाच नियम वेगवेगळ्या विभागात लागु होऊन त्या विभागातील कामाची संख्या व वेग कमी आहे म्हणून कर्मचाऱ्यांना निलंबित केले तर ऐंशीटक्के पेक्षा जास्त शासकीय कार्यालये खाली होतील. सरकारने कोणतेही पाऊल उचलतांना न्यायीक भूमिका घ्यायला पाहिजे सुड भावना मनात ठेवून शिक्षणावर घाव घालु नये एवढीच अपेक्षा.

# कर्करोग संशोधक डॉ. सुलोचना गवांदे




**अमेरिकेत गेली ४० वर्षे कर्करोगावर संशोधन करणाऱ्या आणि विविध माध्यमांद्वारे कर्करोगाविषयी जनजागृती करीत असलेल्या डॉ सुलोचना गवांदे यांची प्रेरणादायी जीवन कहाणी...**

----------------

**देवेंद्र भुजबळ**
_९८६९४८४८००

----------------

कर्करोगाचे आपल्याला मागच्या दशकात प्रामुख्याने चार पाच प्रकारच माहिती होते. पण आता समजतेय की ही संख्या १०० च्या वर आहे. कर्करोग आणि इतर आजार यातील मूळ फरक म्हणजे बहुतांश इतर रोग हे आपल्या शरीराच्या बाहेरून येणा?या जीवजंतूंमुळे होतात अथवा शरीरातील इंद्रिये, स्नायू इत्यादी दुर्बळ झाल्यामुळे होतात. कर्करोग हा मात्र स्वतःच्या शरीरातील पेशीतूनच निर्माण होतो.



कर्करोग झाल्याचे निदान कळताच केवळ रुग्णच नव्हे तर त्याचे कुटुंबीयही गर्भगळीत होतात, इतकी या रोगाची धास्ती आहे. अशा या वेगळ्या आणि विलक्षण रोगावर सखोल संशोधन करणाऱ्या, तो होऊच नये म्हणून आणि झालाच तर त्याच्याशी कसा सामना करायचा यासाठी जनजागरण करणाऱ्या डॉ. सुलोचना गवांदे यांच्याशी न्यूज स्टोरी टुडे पोर्टलच्या माध्यमातून आमचा संबंध आला आणि त्यांच्या कार्याने प्रभावित होऊन आम्ही त्यांना यथाशक्ती मदत करण्याचा प्रयत्न करू लागलो आणि करीत आहोत.

डॉ सुलोचना गवांदे या मूळ मुंबईकर आहेत ही आपल्या सर्वांसाठी मोठी अभिमानाची बाब आहे. त्यांचे शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण मुंबईतच झाले. त्यांनी टाटा मेमोरियल सेंटरशी संलग्न कर्करोग संशोधन संस्थेतून एम एससी व पीएच डी या पदव्या प्राप्त केल्या. पुढे कर्क रोगावर प्रगत संशोधन करण्यासाठी ४० वर्षांपूर्वी अमेरिकेत जाण्याचे धाडस त्यांनी केले.

सुरुवातीला फार बिकट परिस्थितीत कर्क रोगावरचे संशोधन करीत राहिल्या आणि अजूनही करीत आहेत. पण त्यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी केवळ संशोधन, शास्त्रीय अभ्यास आणि या विषयावर होणाऱ्या जागतिक परिषदांपुरतेच स्वतःला बंदिस्त करून ठेवले नाही तर सामान्य माणसाला कर्करोगाची, त्या विषयी सुरू असलेल्या संशोधनाची अद्ययावत माहिती मिळावी.

त्यांना धीर, दिलासा मिळावा म्हणून त्या अनेक प्रकारे प्रयत्न करीत असतात. त्यांचे दीर्घकाळ परदेशात वास्तव्य असले तरी त्यांनी त्यांची मायभूमीशी आणि माय मराठीशी असलेली नाळ तुटू दिली नाही. त्यामुळेच कर्करोगाविषयीची जाणीव, जागृती ही मराठी समाजापर्यंत पोहोचण्यासाठी त्या भरीव कामगिरी करीत असतात.

डॉ सुलोचना गवांदे यांनी २०१६ मध्ये महाराष्ट्र टाइम्स या वृत्तपत्रात पंधरवाड्याला एक लेख असे सदर वर्षभर लिहिले. या सदरातून त्यांनी कर्करोगाचा इतिहास, कारणे व लक्षणे, उपचार हे सर्व विषय अतिशय सोप्या भाषेत मांडले. वाचकांना ही लेखमाला अत्यंत उपयुक्त वाटली. नंतर या लेखनावर आधारित त्यांचे कर्करोगः माहिती आणि अनुभव हे पुस्तक प्रकाशित झाले.

पुढे या पुस्तकात अधिक भर घालून त्याचे इंग्रजी रूपांतर Revealing the Secrets of Cancer या नावाने २०२२ मध्ये अमेरिकेत व नंतर भारतात प्रकाशित केले गेले. गेल्या वर्षीच्या (२०२४) मराठी व इंग्रजी कालनिर्णयच्या पृष्ठभागावर कर्करोगाची कारणे आणि तो टाळण्यासाठी काय करावे याबद्दल त्यांनी लिहिलेले लेख प्रसिद्ध झाले आहेत.

कर्करोगाविषयी बोलण्यासाठी गवांदे मॅडम यांना विविध प्रसार माध्यमांद्वारे निमंत्रित करण्यात येत असते. त्या नेहमीच "योग्य" माहिती देण्याचा आग्रह धरतात. इथे योग्य शब्द जाणीवपूर्वक वापरलेला आहे, तो अशासाठी की अनेक व्यक्ती,संस्था कर्करोग बरा करण्याविषयीचे अवास्तव दावे करतात. त्यांच्या उपचारांमुळे रुग्ण बरा तर होत नाहीच उलट त्याचे शारीरिक, मानसिक, आर्थिक नुकसानच होत असते.

कर्करोगाचे अनेक प्रकार योग्य औषधोपचारांनी पूर्ण बरे होतात किंवा कित्येक वर्षे आटोक्यात राहतात. नको त्या गोष्टींच्या मागे लागण्याने हे इलाज वेळेवर होत नाहीत, परिणामी रुग्णाचा आजार अधिक गंभीर होतो आणि कित्येकदा रोग कह्यात आणणे अशक्य होते. ही अत्यंत दुर्दैवी परिस्थिती आहे आणि याबद्दल लोकांना जागरूक करणे आवश्यक आहे.

म्हणून गवांदे मॅडम मुद्रित माध्यमापुरत्याच मर्यादित राहिल्या नाहीत तर आकाशवाणी, दूरचित्रवाणी, समाज माध्यमे, प्रत्यक्ष व्याख्याने, संवाद,मुलाखती अशा विविध प्रकारच्या माध्यमांद्वारे त्या कार्यरत आहेत. अर्थात खरं म्हणजे ही काही फक्त त्यांचीच किंवा सरकार, संशोधक आणि डॉक्टरांची पण नाही तर ही जागरूकता वाढवणे हे काम तुम्हा आम्हा सर्वांचेच आहे. इतकी ही कर्करोगाची समस्या भीषण आहे. गवांदे मॅडम यांच्या कर्करोगः माहिती आणि अनुभव या पुस्तकातील सर्व लेख मुंबई आकाशवाणीच्या निवेदिकांनी वाचून महाराष्ट्रातील केंद्रांवर प्रसारित केले. अमेरिकेत येल विद्यापीठाच्या कर्करोग समितीने NPR रेडिओवर या पुस्तकावर आधारित डॉ गवांदे यांचा कार्यक्रम प्रसारित केला.

डॉ गवांदे मॅडम गेल्या वर्षी मुंबईत आलेल्या असताना, त्यांचे विचार एबीपी माझा वाहिनीवर प्रसारित होण्याचे महत्व मी ज्या वेळी या वाहिनीचे संपादक राजीव खांडेकर यांना सांगितले, त्यावेळी त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता डॉ गवांदे मॅडम यांची मुलाखत घेतली. या त्यांच्या कार्यक्रमाला खूप प्रतिसाद मिळाला. त्यांची ही मुलाखत आपण आजही यू ट्यूब वर पाहू शकता आणि आपण ती अवश्य पाहावी देखील. त्यांचे मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेत पॉडकास्ट प्रसिद्ध झाले असून ते देखील यू ट्यूब वर उपलब्ध आहेत.

कर्करोगाविषयी प्रसार माध्यमांद्वारे जनजागृती करीत असतानाच गवांदे मॅडम लहानमोठ्या सभांतून लोकांना प्रत्यक्ष भेटून बोलत असतात. न्यूज स्टोरी टुडेच्या ठाणे येथील मेघना आणि हेमंत साने यांच्या घरी झालेल्या स्नेह मिलन कार्यक्रमात मेघना साने यांनी त्यांची घेतलेली उस्फुर्त मुलाखत आणि त्या नंतरची प्रश्नोत्तरे खूपच उद्बोधक ठरली. आकाशवाणीचे निवृत्त सहसंचालक भूपेंद्र मिस्त्री यांनी त्यांच्या कॅमेरा टीमद्वारे या मुलाखतीचे चित्रीकरण करून ती समाज माध्यमातून प्रसिद्ध केली. ही मुलाखत त्या स्नेह मिलन कार्यक्रमाचे मोठेच वैशिष्ट्य ठरले.

---------------

**(लेखाचा उर्वरीत भाग पुढील अंकी)**

# युद्धात अमेरिकेची उडी आणि संकट!

आता सिद्ध झाले आहे की अमेरिका जगाला तिसऱ्या महायुद्धाकडे नेतांना दिसत आहे. कारण अमेरिका-इजरायल - इराण याची फक्त वर्चस्वाची लढाई आहे.परंतु यात मिडलिस्टमधील अनेक देश भरडले जात आहे.

आपण युक्रेन-रशिया, इजरायल सोबतचे हमास-हिज्बुल्ला-हुती विद्रोही -इराण यांच्या संघर्ष व युद्ध पहाले.परंतु आपण ज्याला सुपर पॉवर म्हणतो तो अमेरिका तडजोड न करता इराणवर "ऑपरेशन मिडनाईट हॅमर"च्या माध्यमातून इराणवर अचानक अमेरिकेच्या बी-२ बॉम्बर विमानांनी इराणचे फॉर्डो उध्दवस्त करण्यासाठी बंकर बस्टर्ड बॉम्ब टाकतो आणि तेही १३६०० किलो वजनाचा एक बॉम्ब.

असे १४ बॉम्ब टाकून इराणचे फोर्डो, नातान्झ आणि इश्फाहान या ३ आण्विक केंद्रांवर हल्ले करून उध्वस्त करतो. याचाच अर्थ असा की जग विनाशाकडे जात असल्याचे दिसून येते.यामुळे आता जगातील अनेक राष्ट्र दोन गटात विभागल्या जाण्याची दाट शक्यता आहे आणि त्याची सुरुवात सुध्दा झाली आहे. अमेरिकेच्या कारवाईमुळे रशिया-चीन इराणकडून खुलेआम उतरू शकतो, यालाही नाकारता येत नाही.

अमेरिकेच्या हल्ल्यानंतर इराणने इस्त्रायलवर मोठ्या प्रमाणात क्षेपणास्त्रे डागण्यास सुरूवात केली आहे. अमेरिकेच्या इराणच्या अणुऊर्जा प्रकल्पांवर केलेल्या हल्ल्यामुळे जगात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अमेरिकेच्या बी-२ बॉम्बर हल्ल्यानंतर इराण होर्मुझचा जलमार्ग बंद करून नाकाबंदी करण्याची दाट शक्यता आहे.

होर्मूझ खाडीतून जगातील २० टक्के कच्च्या तेलाचा व्यापार होतो आणि हा मार्ग इराणने बंद केला तर याचा परिणाम भारतासह जगातील अनेक देशांवर पडु शकतो.कारण अमेरिकेने थेट अणुकेंद्रांवर हल्ला केल्याने इराणच्या तळपायाची आग मस्तकात गेली आहे. त्यामुळे इराणने अखेरचे हुकुमी अस्त्र बाहेर काढले आहे.

होर्मुझ बंद झाल्यास तेल पुरवठासाखळी विस्कळीत होईल व जागतिक बाजारपेठेत तेलाच्या किमती भडकू शकतात.अमेरिकेच्या हल्ल्यानंतर इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला खोमेनेई व परराष्ट्रमंत्री अब्बास अराघची यांनी अमेरिकेला हल्याचा परिणाम भोगण्यास सज्ज रहाण्याचा इशारा दिला. कारण अमेरिकेने आमच्या अणुकेंद्रावर हल्ले करून संपूर्ण सिमा ओलांडल्या आहेत त्यामुळे आम्हालाही आमचे संरक्षण करण्याचा अधिकार आहे असा इशारा दिला.

त्यामुळे या युध्दावर योग्य तोडगा निघाला नाही तर भयावह परिणाम होवू शकतात.कारण इराण- इस्त्रायल युध्द व युक्रेन-रशिया युद्ध सध्याच्या परिस्थितीत थांबने शक्य नाही. परंतु अमेरिकेच्या इराणवरील हल्याने जगाला बेचैन केले असून तिसऱ्या महायुद्धाची घंटी वाजविल्याचे दिसून येते. डोनाल्ड ट्रम्पला वाटत असेल की हा अमेरिका, इस्त्रायल आणि जगासाठी ऐतिहासिक क्षण आहे परंतु ही बाब चुकीची आहे.

कारण युद्धामुळे अजून पर्यंत कोणालाच फायदा झालेला नाही उलट नुकसानच झाले आहे आणि आता अमेरिकेच्या इराणवरील हल्याने जगात युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली असून याचा गंभीरपणे परिणाम जगातील संपूर्ण देशांना भोगावे लागतील. त्यामुळे संयुक्त राष्ट्रसंघाने पुढाकार घेऊन हे युध्द ताबडतोब थांबविले पाहिजे अन्यथा विनाश अटळ आहे.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष "डोनाल्ड ट्रम्प जे बोलतात ते करीत नाही, आणि जे बोलत नाही ते करतात" त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत डोनाल्ड ट्रम्प हे विश्वास पात्र नेता रहाले नाही. अमेरिका सध्याच्या परिस्थितीत स्वार्थी व व्यापारी देश बनला आहे. अमेरिकेने स्वतःच्या स्वाथार्साठी दिनांक १४ जून २०२५ ला असीम मुनीरला अमेरिकि सशस्त्र दलाच्या २५० व्या वर्धापन दिनानिमित्त प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित केले होते व सोबतच डोनाल्ड ट्रम्प यांचा ७९ वा वाढदिवस सुध्दा होता.

या निमित्ताने असीम मुनीरकडून इराणच्या अनेक महत्त्वपूर्ण ठिकाणांची व गुप्त माहिती अवगत केली.याचाही फायदा अमेरिकेने अवश्य घेतला असावा आणि असीम मुनीर पाकिस्तानला परत गेल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांना २०२६ चा नोबेल पुरस्कार देण्याची मागणी मिडियाच्या माध्यमातून केली आणि दुसऱ्याच दिवशी २२ जून २०२५ ला अमेरिकेने इराणवर बी-२ बॉम्बर विमानांनी अणू केंद्रांवर हल्ला केला. यामुळे सध्याच्या परिस्थितीत पाकिस्तान अत्यंत कठीण परिस्थितीत फसल्याचे दिसून येते.

पाकिस्तानचे मित्र राष्ट्र चीन, इराण आणि वर्ल्ड बॅंकेकडुन कर्ज घेण्यासाठी अमेरिकेशी दोस्ती.त्यामुळे आता पाकिस्तान घर का ना घाट का अशी परिस्थिती झाली आहे. डोनाल्ड ट्रम्प ने स्पष्ट शब्दात सांगितले आहे की "आम्ही दोस्ती कोणाही सोबत फुकट करीत नाही". अमेरिकेला कल्पना होती की इराणचा खरा मित्र पाकिस्तान आहे. त्यामुळे अमेरिकेने इराणविषयी संपूर्ण गुप्त माहिती पाकिस्तान कडून हस्तगत केल्याचे स्पष्ट दिसून येते.

इराणला खाईत लोटण्याचे केले असेल तर पाकिस्ताननेच केले आणि ही बाब इराणच्याही लक्षात आली आहे. इराण व चीन पाकिस्तानला सुध्दा धडा शिकवु शकतो. या विनाशकारी महायुद्धाला संयुक्त राष्ट्रसंघाने, नाटो सह संपुर्ण देशांनी थांबवीण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे, अन्यथा विनाश अटळ आहे. इराणने अमेरिकेसोबत बदला घेण्यासाठी कतर, बहरिन, इराक येथील अमेरिकेनं एअर बेस वर इराणने १० बेलेस्टीक मिसाईल डागली असुन अमेरिकन हल्ल्याचा बदला घेतल्याचा दावा इराणने केला आहे.परंतु इराणने डागलेले १० मिसाईल अमेरिकेने उध्वस्त केल्याचा दावा पेंटागॉन मधुन करण्यात आला आहे.

यामुळे अमेरिकेन एअर बेसला कोणत्याही प्रकारचे नुकसान झाले नाही.युएई ने इराणच्या हल्ल्याची निंदा केली आहे.अमेरिका, रशिया, चीन, संयुक्त राष्ट्र यांनी एकत्र येऊन ताबडतोब युद्धविराम करावा.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
स्वतंत्र पत्रकार, नागपूर.
९९२१६९०७७९

## वाचक लिहितात

### टीआरपी मागे माध्यमे का?

'श्री दाभोळकर हत्या आणि मी' या विक्रम भावे लिखित पुस्तकाचे नागपुरातील अमृत भवन येथे प्रकाशन झाले. विक्रम भावे यांना केवळ संशयाच्या आधारे अटक झाली होती. शेवटी न्यायालयाने त्यांची निर्दोष मुक्तता केली.

भावे यांना या काळात ज्या मानसिक यातना झाल्या, त्यांचं कौटुंबिक आयुष्य कसं उध्वस्त झालं! याविषयी लोकांना सांगण्यासाठी शेवटी पुस्तकच लिहावे लागले. हे त्यांच आत्मकथन आपल्याला अस्वस्थ करत. अगदी वडिलांचे निधन झालं असताना सुद्धा त्यांच्या अंत्य संस्काराला त्यांना जाता आलं नाही. कीती हा अन्याय! मी बरेचदा ऐकले आहे की, एखाद्या सराईत गुन्हेगाराला, खून्याला सुद्धा अशावेळी हजर करतात. मग इथेच का ही क्रूरता!

मुळातच हे सर्व वाचल्यावर लक्षात येतं की भावे हे या सामाजिक आणि राजकीय व्यवस्थेचे बळी ठरले आहे आणि मीडियाने सुद्धा पक्षपाती भूमिका घेतली असेच लक्षात येते. हल्ली टीआरपी मागे माध्यमे धावतात, त्यात त्यांचे उत्पन्न वाढते, असे असले तरी त्यामुळे एखाद्याच्या आयुष्याची वाताहत होते हे त्यांना कसं लक्षात येत नाही! याला काय म्हणायचं!

त्यांना समाज मनाच्या सुखदुःखाशी काही देणे घेणे नाही का? टीआरपी सोडून मीडियाने बाजू मांडल्यास जनतेची अधिक विश्वास संपादन करेल, आणि कुणा निर्दोष व्यक्तिचा नाहक बळी जाणार नाही.

■ **सौ. माधवी पत्की**
**नागपूर.**

### प्रसार माध्यमांची भूमिका महत्त्वाची..

नुकताच नागपूर येथे दाभोळकर हत्या आणि मी या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्याचा कार्यक्रम झाला. कार्यक्रम पाहताना एका निर्दोष व्यक्तीवर झालेला अन्याय बघून मनात प्रचंड चीड निर्माण झाली.

या संपूर्ण प्रकरणात प्रसारमाध्यमांची भूमिका महत्त्वाची वाटली.

जेव्हा विक्रम भावे यांना केवळ संशयाच्या आधारावर अटक झाली, तेव्हा प्रसारमाध्यमांवर झालेल्या चर्चासत्रांमध्ये हिंदुत्ववादी विचारधारेला आरोपी असल्याचे दर्शविले. त्यांच्याविरोधात जनमत तयार करण्यात आले.

परंतु न्यायालयाने जेव्हा त्यांना निर्दोष घोषित केले, तेव्हा मात्र प्रसार माध्यमे लहानशी बातमी देऊन मोकळे झाले.

एका निर्दोष व्यक्तीला तीन वर्षे तुरुंगवास भोगावा लागला. त्यांना आणि त्यांच्या कुटुंबाला झालेला मनस्ताप आणि भोगाव्या लागलेल्या यातना, त्यांच्या वडिलांच्या निधनानंतर शेवटचे दर्शनही मोबाईलवर घ्यावे लागले. त्यावेळीही प्रसारमाध्यमांनी कुठेही आवाज उठवला नाही. असे का? प्रसार माध्यमे लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. त्यांनी निरपेक्षपणे बाजू मांडणे गरजेचे आहे ही सामान्य जनतेची अपेक्षा आहे.

■ **सौ. प्रिया बागडदेव**
**छिंदवाडा.**



# दररोज ब्रेडचे सेवन आणि मेंदूच्या आजाराची शक्यता

धावपळीच्या जीवनात, ब्रेड हा सर्वात सोपा नाश्ता आहे. ब्रेड लवकर तयार होते आणि अनेक चवींमध्ये उपलब्ध असते, लहान मुलांपासून ते मोठ्यांपर्यंत सर्वांची आवडती बनली आहे. आज बहुतेक लोक त्यांच्या सकाळची सुरुवात ब्रेड-जाम किंवा ब्रेड-बटर अशा नाश्त्याने करतात. परंतु सहज उपलब्ध आणि तयार होणारी ब्रेड अनेक समस्यांचे कारण देखील बनत आहे. तज्ज्ञांचा असा विश्वास आहे की जे लोक दररोज ब्रेड खातात ते केवळ शारीरिकच नाही तर मानसिक आजारांनाही बळी पडू शकतात.

ब्रेडमध्ये असलेले उच्च ग्लायसेमिक इंडेक्स रक्तातील साखरेचे प्रमाण वेगाने वाढवू शकते, ज्यामुळे मधुमेहाचा धोका वाढतो. ब्रेडमध्ये फायबर आणि व्हिटॅमिन ईची कमतरता असते, ज्यामुळे खराब कोलेस्ट्रॉल वाढू शकते आणि हृदयरोगाचा धोका वाढू शकतो.

ब्रेडमध्ये असलेले ग्लूटेन आणि रिफाइंड कार्ब्स बद्धकोष्ठता, पोटदुखी आणि अतिसार यासारख्या समस्या निर्माण करू शकतात. कॅलरीज आणि कार्बोहायड्रेट्सचे प्रमाण जास्त असल्याने, जास्त ब्रेड खाल्ल्याने वजन जलद वाढू शकते. याशिवाय, दररोज ब्रेड खाल्ल्याने यकृत आणि मूत्रपिंडांवर वाईट परिणाम होऊ शकतो. ब्रेडमध्ये अनेक प्रकारचे प्रिझर्व्हेटिव्ह्ज आणि रसायने मिसळली जातात, ज्यामुळे शरीराच्या पचनसंस्थेवर परिणाम होऊ शकतो.

**मानसिक आरोग्यावर होणारे परिणाम**

नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिनच्या संशोधनातून असे दिसून आले आहे की दररोज ब्रेड खाल्ल्याने केवळ शारीरिकच नाही तर मानसिक आरोग्यावरही परिणाम होऊ शकतो. ब्रेडमध्ये असलेले रिफाइंड कार्ब्स आणि ग्लूटेनमुळे नैराश्य, ताण आणि एकाग्रतेचा अभाव यासारख्या मानसिक समस्या उद्भवू शकतात. सतत ब्रेड खाल्ल्याने शरीरात जळजळ देखील होऊ शकते, ज्यामुळे मेंदूच्या कार्य करण्याच्या क्षमतेवर परिणाम होऊ शकतो.

दररोज ब्रेड खाल्ल्याने ऑटो-ब्रूअरी सिंड्रोमचा धोका असतो. खरंतर, ब्रेड बनवण्यासाठी यीस्टचा वापर केला जातो. दररोज ब्रेड खाल्ल्याने पोटात यीस्टचे प्रमाण वाढू शकते. अशा परिस्थितीत, जेव्हा पोटात असलेले बॅक्टेरिया ब्रेडमध्ये असलेले कार्बोहायड्रेट्स पचवतात तेव्हा किण्वन होते, ज्यामुळे पोटात अल्कोहोल म्हणजेच इथेनॉल तयार होते. ज्यामुळे रुग्णाला अल्कोहोल न पिता नशेसारखे लक्षणे जाणवतात. हा एक प्रकारचा मानसिक आजार आहे, जो जास्त ब्रेड खाणाऱ्यांना होऊ शकतो.

## अशोकायन



**प्रा. अशोक सारडा**
मेहकर
(९४२१३९४३३९)

### स्कुल बॅग!

पाठ ठणके कंबर ठणके
दुखू लागलेत खांदे
दप्तराच्या ओझ्याने
आरोग्याचे झालेत वांदे..!

नाकापेक्षा मोती जड
अशी आहे वस्तुस्थिती
शासकांनो पर्याय काढा
करतो आम्ही विनंती!

विषयात करा कपात
युनिट नुसारच हवी
पुस्तके व वह्या
आमच्या दप्तरात..!

## एसुस इंडियाने आरटीएक्स ५०५० जीपीयू असलेल्या नवीन टफ गेमिंग एफ १६ आणि रॉग स्ट्रिक्स जी१६ सह गेमिंग लाइनअपचा विस्तार



नवी दिल्ली, २४ जून : भारतातील नंबर १ गेमिंग ब्रँड असलेल्या रिपब्लिक ऑफ गेमर्स (रॉग) चे घर असलेल्या एसुस इंडियाने एन्व्हिडिया जिफोर्स आरटीएक्स ५०५० ग्राफिक्सने सुसज्ज असलेल्या रॉग स्ट्रिक्स जी१६ सोबत नवीन टफ गेमिंग एफ १६ सादर करून त्यांच्या गेमिंग लाइनअपचा विस्तार केला आहे. याशिवाय, एसुस रॉग ने त्यांच्या विद्यमान २०२४ रॉग स्ट्रिक्स जी१६ (जी६१४) लाइनअपला रिफ्रेश केलेल्या आरटीएक्स ५०५० जीपीयूने सुसज्ज करून अपग्रेड केले आहे, ज्यामुळे किंमत विभागांमध्ये उच्च-कार्यक्षमता गेमिंग प्रदान करण्याची त्यांची वचनबद्धता आणखी मजबूत झाली आहे.

रॉग स्ट्रिक्स जी१६ (जी६१५ जेएचआर-एस ५००५ डब्ल्यूएस) १,५९,९९० रुपये, रॉग स्ट्रिक्स जी१६ (जी६१४पीएच-आरवी ०३३ डब्ल्यूएस) १,४४,९९० रुपये, टफ एफ १६ (एफएक्स६०८जेएच-आरवी ०५७ डब्ल्यूएस) १,२४,९९० रुपयात उपलब्ध आहे.

गेमिंग लाइनअपच्या नवीन श्रेणीबद्दल बोलताना, एसुस इंडियाचे उपाध्यक्ष, ग्राहक आणि गेमिंग पीसी, अर्नोल्ड सु म्हणाले, एसुसमध्ये, आम्ही स्पर्धात्मक गेमर्सपासून ते दररोजच्या निर्मात्यांपर्यंत प्रत्येक प्रकारच्या वापरकर्त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आमच्या गेमिंग लाइनअपचा विस्तार आणि विकास करण्यासाठी सतत काम करत आहोत. आमच्या रॉग आणि टफ मालिकेत आरटीएक्स ५०५०-संचालित मॉडेल्स सादर करून, आम्ही हे सुनिश्चित करत आहोत की उच्च-कार्यक्षमता गेमिंग, एआई-तयारी आणि इमर्सिव्ह व्हिज्युअल्स अनेक किंमती आणि वापर प्रकरणांमध्ये उपलब्ध आहेत. हे लाँच भारताचा नंबर १ गेमिंग ब्रँड म्हणून आमचे स्थान मजबूत करण्यासाठी आणि गेमिंग इकोसिस्टमच्या प्रत्येक कोपऱ्याला सेवा देण्याच्या दिशेने आणखी एक पाऊल आहे.

## अदानी एअरपोर्ट्सने मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्टसाठी जागतिक गुंतवणूकदारांकडून १ अब्ज डॉलर्सचे वित्तसहाय्य मिळवले

मुंबई, २४ जून : अदानी एंटरप्रायझेस लिमिटेडची पूर्ण मालकीची उपकंपनी आणि भारतातील सर्वात मोठी खासगी विमानतळ ऑपरेटर -अदानी एअरपोर्ट्स होल्डिंग्स लिमिटेड (एएएचएल) ने मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट लिमिटेड (एमआयएएल) साठी प्रोजेक्ट फायनान्स संरचनेद्वारे यशस्वीरित्या १ अब्ज डॉलरचे वित्तसहाय्य प्राप्त केले आहे. या व्यवहारात जुलै २०२९ मध्ये परतफेड होणाऱ्या ७५० दशलक्ष डॉलर्सच्या नोट्सचा समावेश आहे, ज्यांचा वापर पुनर्वित्तासाठी केला जाणार आहे. याशिवाय अतिरिक्त २५० दशलक्ष डॉलर्स उभारण्याची तरतूदही या संरचनेत आहे, ज्यामुळे एकूण वित्तपुरवठा १ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचतो. ही रचना एमआयएएल च्या विकास, आधुनिकीकरण आणि क्षमतेच्या वाढीसाठीच्या भांडवली खर्च कार्यक्रमासाठी अधिक वित्तीय लवचिकता प्रदान करेल.

ही भारतातील विमानतळ पायाभूत सुविधा क्षेत्रातील पहिला (इन्व्हेस्टमेंट ग्रेड- आयजी) रेटिंग असलेला खासगी बाँड इश्यू आहे. हा व्यवहार अपोलो व्यवस्थापित निधीच्या नेतृत्वाखाली झाला असून, ब्लॅकरॉक व्यवस्थापित निधी, स्टँडर्ड चार्टर्ड आणि इतर प्रमुख संस्थात्मक गुंतवणूकदार आणि विमा कंपन्यांच्या सहभागामुळे जागतिक गुंतवणूकदारांचा भारताच्या पायाभूत सुविधा क्षेत्रातील संधींवर आणि अदानी एअरपोर्ट्सच्या कार्यक्षम संचालन प्लॅटफॉर्मवर विश्वास अधोरेखित होतो. एमआयएएल च्या स्थिर मालमत्ता तळावर, नियमित रोख प्रवाह आणि कार्यक्षमतेच्या जोरावर या नोट्सना बीबीबी-/स्थिर अशी रेटिंग मिळण्याची अपेक्षा आहे.

एएएचएल दीर्घकालीन दृष्टिकोनाशी कटिबद्ध असून, भारतातील विमानतळ पायाभूत सुविधा क्षेत्रात सातत्याने आधुनिकीकरण, क्षमतेत वाढ, डिजिटायझेशन आणि तंत्रज्ञान एकत्रीकरणाच्या माध्यमातून गुंतवणूक करत आहे. हा व्यवहार एमआयएएल च्या शाश्वतता उद्दिष्टांना गती देईल आणि २०२९ पर्यंत नेट-झिरो उत्सर्जन प्राप्त करण्याच्या उद्दिष्टाला आधार देईल.

या इश्यूआधी एएएचएल ने जागतिक बँकांच्या गटाकडून ७५० दशलक्ष डॉलर्सचा वित्तपुरवठा मिळवला होता. हा नवीन व्यवहार भारताच्या पुढील पिढीच्या पायाभूत सुविधा व्यासपीठासाठी अदानी समूहाच्या जागतिक भांडवली बाजारांवरील प्रवेश क्षमता आणि गुणवत्तापूर्ण गुंतवणूकदार आकर्षित करण्याच्या क्षमतेला अधोरेखित करतो.

श्री. अरुण बन्सल, सीईओ, अदानी एअरपोर्ट्स होल्डिंग्स लिमिटेड म्हणाले:ही यशस्वी बाँड इश्यू अदानी एअरपोर्ट्सच्या कार्यप्रणालीची ताकद, मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्टच्या भक्कम पाया आणि शाश्वत पायाभूत विकासासाठीची आमची कटिबद्धता अधोरेखित करते. अपोलो व्यवस्थापित निधी आणि आघाडीच्या संस्थात्मक गुंतवणूकदारांच्या सहभागामुळे आम्ही जागतिक भांडवलीच्या स्रोतांमध्ये आमचा प्रवेश अधिक मजबूत केला आहे. भारतातील सर्वात मोठ्या खासगी गुंतवणूक श्रेणीतील प्रोजेक्ट फायनान्स व्यवहारांपैकी एक सुरक्षित करण्याची आमची क्षमता हे आर्थिक शिस्त, भांडवली कार्यक्षमतेचा आणि दीर्घकालीन मूल्यनिर्मितीचा आमचा कटिबद्ध दृष्टिकोन दर्शवते.

या व्यवहारासाठी कायदेशीर सल्लागारांमध्ये एमआयएएल साठी एअँडओ शीअरमन आणि सायरिल अमरचंद मंगलदास यांचा समावेश होता, तर गुंतवणूकदारांसाठी मिलबँक एलएलपी आणि खैतान अँड कंपनी सल्लागार होते.

## करुणा पांडे हिच्याविषयी गौरव चोप्रा म्हणतो, कॉफी की चहा? या वादावरून आमच्यात संवाद सुरू झाला



मुंबई, २४ जून : सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत पुष्पाची हृदयस्पर्शी आणि आजच्या काळाशी सुसंबद्ध असलेली कथा सर्व वयोगटातील प्रेक्षकांना आपलीशी वाटत आहे. प्रसिद्ध अभिनेता गौरव चोप्राने या मालिकेच्या माध्यमातून टेलिव्हिजनवर दणक्यात पुनरागमन केले आहे. प्रोफेसर राजवीर शास्त्रीच्या भूमिकेत त्याने या मालिकेला वेगळे परिमाण दिले आहे. पुष्पाने कायद्याचा अभ्यास करण्यासाठी प्रोफेसर शास्त्रींच्याच कॉलेजात प्रवेश मिळवला आहे. या दोन्ही कलाकारांचे पडद्याच्या मागे जे सख्य जुळले आहे, ते पडद्यावरील त्यांच्या नात्यापेक्षा अगदी वेगळे आहे. गौरव चोप्राशी असलेल्या नात्याविषयी करुणा पांडे म्हणते, अगदी पहिल्या फोन कॉलपासूनच आमच्यात एक अनपेक्षित मोकळेपणा आला होता. एकमेकांविषयी वाटणारा आपलेपणा पडद्यावर आमच्या दृश्यांमध्ये प्रतिबिंबित झाला. आमचे दोघांचे स्वभाव खूप वेगळे आहेत. पण अभिनय कलेकडे आम्ही ज्या पद्धतीने पाहतो, त्यात एक अनोखे साम्य आहे. तो कामाच्या बाबतीत खूपच प्रामाणिक, उत्स्फूर्त आणि जागरूक आहे. तीव्रता आणि हास्य यांच्यातील संतुलन तो ज्या पद्धतीने सांभाळतो, ते बघायला मला आवडते. राजवीर ही खूप गुंतगुंतीची, गंभीर व्यक्तिरेखा आहे. पण दोन टेक्सच्या मधल्या वेळेत आम्ही एकमेकांची थट्टा मस्करी करतो आणि खूप हसतो. आमची जेवणाची वेळ जेवण आणि मजेशीर संभाषणाने भरलेली असते. काही क्षणात आम्ही अभिनय दुनियेतून बाहेर पडून मस्ती करू लागतो. आमच्यात सहजपणा आहे, एक लय आहे आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे आम्हाला दोघांना अभिनयाचे वेड आहे. मला वाटते प्रेक्षकांना आमच्यातली हीच गोष्ट रुचली आहे.

करुणाशी झालेल्या व्यक्तिगत आणि सर्जनशील मैत्रीविषयी बोलताना गौरव म्हणतो, तीन वर्षांपासून सुरू असलेल्या एका यशस्वी मालिकेत इतक्या उशिरा एंट्री घेणे खूप आव्हानात्मक असते. मालिकेला एक लय आलेली असते, पात्रं प्रेक्षकांच्या परिचयाची झालेली असतात आणि अशात तुम्ही एंट्री घेऊन त्यात ढवळाढवळ करता! राजवीर एक गुंतगुंतीची व्यक्तिरेखा आहे. त्याच्या स्वभावात अनेक पदर आहेत. तो दुखावलेला आहे आणि त्याच्या भावना तीव्र आहेत. पण प्रेक्षक पुष्पाच्या नजरेतून त्याच्याकडे बघत आहेत. मी सेटवर पाऊल टाकण्याच्या अगोदरच, करुणा जींनी आपल्या टीमतर्फे मला शुभेच्छा दिल्या होत्या. आणि कदाचित तुमचा विश्वास बसणार नाही, पण सेटवर चहा की कॉफी या वादावरून आमच्यात संवाद वाढला. मजेमजेत सुरुवात होऊन हा वाद पुढे भलताच वाढला आणि सेटवरील सगळ्या मंडळींनी त्यांना पटणारी बाजू उचलून धरली. अशा काही क्षणांमुळे आमच्यात मोकळेपणा वाढला आणि ही केमिस्ट्री तुम्हाला पडद्यावर प्रतिबिंबित होताना दिसेल.

## या उन्हाळ्यात ट्रेनमधील स्विगी फूड विद्यार्थ्यांसाठी बनला प्रवासातील साथीदार

नागपूर, २४ जून : भारतातील अग्रेसर मागणी केल्यावर सुविधा उपलब्ध करून देणारे क्षेत्र म्हणजेच स्विगी लिमिटेडने जाहीर केले की, या उन्हाळ्याच्या सुटीमध्ये भारतामधील विद्यार्थ्यांसाठी फूड ऑन ट्रेन हा प्रवासाचा साथीदार बनत आहे. रेल्वेच्या कोचमध्ये मोठ्या प्रमाणात मिळणाऱ्या ऑर्डरपासून ते रेल्वेत नेहमी मिळणाऱ्या पदार्थांपेक्षा जास्त प्रमाणात विविध पदार्थांपर्यंत विद्यार्थी त्यांचा प्रवास अधिक चवदार आणि अविस्वमरणीय बनविण्यासाठी स्विगीचा वापर करत आहे. या उपक्रमाबद्दल बोलतांना, स्विगीच्या फूड स्ट्रॅटेजी, कस्टमर एक्सपिरियंस आणि न्यू इनिशिएटीव्हचे उपाध्यक्ष श्री. दीपक मालू म्हणाले, विद्यार्थ्यांना स्विगीची ट्रेनमधील फूड सर्व्हिस फारच आवडते! ते वेगवेगळ्या पदार्थांपासून ते रात्रीच्या जेवणापर्यंत आणि अगदी जास्त संख्येने जेवणापर्यंत सर्वकाही ऑर्डर करत आहेत. विद्यार्थ्यांकडून मिळणारी ही मोठी मागणी स्विगीला ऑनबोर्ड डायनिंग अनुभव सुधारत राहण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रवासात कधीही आणि कुठेही हवे असलेले जेवण पोहोचवण्यावर लक्ष केंद्रित करण्यास प्रेरणा देत आहे.

आयआरसीटीसी सोबत स्विगीची भागीदारी आणि भारतातील १०० हून अधिक स्टेशनपर्यंतचा विस्तार हा रेल्वे प्रवास अधिक आनंददायी आणि सोयीस्कर बनवण्याच्या त्यांच्या वचनबद्धतेला पूर्ण करतो. खात्रीशीर प्रवास्यांच्या सीटवरच डिलिव्हरी, कटलरी आणि हजारो ब्रँड्समध्ये पसरलेल्या वैविध्यपूर्ण मेनूसह, स्विगी फूड ऑन ट्रेन प्रवासाला एका वेळी एक ऑर्डर देऊन अविस्मरणीय अन्नपदार्थांचा अनुभव देत आहे.

फूड ऑन द ट्रेनवर ऑर्डर देण्यासाठी, पुढील लिंकवर फॉलो करा - https://www.swiggy.com/order-food-online-in-train.

## ओप्पो लॉन्च करत आहे के१३एक्स ५जी अत्यंत मजबूत आणि टिकाऊ स्मार्टफोन

नागपूर, २४ जून : ओप्पो इंडिया ने ओप्पो के१३एक्स ५जी फोन दाखल केला आहे, हा या सेगमेन्टमधील सगळ्यात दणकट स्मार्टफोन आहे. टिकाऊपणा आणि तडजोड न करता सर्व फंक्शन्सची अपेक्षा ठेवणारे तरुण विद्यार्थी आणि नवे नवे व्यावसायिका यांच्यासाठी प्राधान्याने हा फोन बनवण्यात आला आहे. लवचिकता असलेल्या के१३एक्स ५जी मध्ये एसजीएस गोल्ड ड्रॉप सर्टिफिकेशन आणि एमआयएल-एसटीडी ८१०एच मिलिटरी-ग्रेड स्टँडर्ड आहेत. त्यामुळे या श्रेणीतील हा सगळ्यात दणकट फोन बनला आहे. एरोस्पेस-ग्रेडच्या एएम०४ अॅल्युमिनियम मिश्रधातूमधून याची ३६०ओ डॅमेज प्रूफ आर्मर बॉडी बनवण्यात अली आहे. क्रिस्टल शील्ड ग्लासने त्याला मजबुती दिली आहे आणि समुद्री स्पन्जने प्रेरित बायोमिमेटिक स्पॉन्ज शॉक अब्जॉर्प्शन सिस्टम मुळे हा फोन आणखी प्रगत बनला आहे. स्टाइल किंवा उपयोगिता यांच्याशी तडजोड न करता, ओप्पो के१३एक्स ५जी ने आयपी६५ वॉटर आणि डस्ट रेझिस्टन्ससह टिकाऊपणा आणि बिजोड मजबुतीच्या बाबतीत एक नवीन मापदंड स्थापित केला आहे.



ओप्पो के१३एक्स ५जी च्या ४जीबी+१२८जीबी व्हेरियन्टची किंमत ११,९९९रु., ६जीबी+१२८जीबी व्हेरियन्टची किंमत १२,९९९ रु. आणि ८जीबी+१२८जीबी व्हेरियन्टची किंमत १४,९९९ रु. असून २७ जून २०२५ रोजी दुपारी १२ वाजल्यापासून हा फोन ओप्पो ई-स्टोअर मध्ये आणि फ्लिपकार्ट विक्रीसाठी उपलब्ध होईल. यामध्ये मिडनाइट व्हायोलेट आणि सनसेट पीच हे दोन रंगांचे पर्याय आहेत. हा फोन खरेदी करणाऱ्या ग्राहकांना सेलच्या दिवशी काही निवडक बँक ऑफर्सवर ४जीबी आणि ६जीबी च्या व्हेरियन्टवर १००० रु. आणि ८जीबी च्या व्हेरियन्टवर २००० रु. इन्स्टंट डिस्काउंट मिळेल किंवा १००० रु. चा एक्स्चेंज बोनस आणि अतिरिक्त ३ महिन्यांपर्यंत नो कॉस्ट ईएमआय पर्याय मिळेल. ज्यामुळे या तिन्ही व्हेरियन्टची प्रभावी किंमत अनुक्रमे १०,९९९, ११,९९९ आणि १२,९९९ रु. होईल.

ओप्पो इंडिया चे हेड ऑफ प्रॉडक्ट कम्युनिकेशन सॅव्हीओ डिसूझा म्हणाले, ओप्पो के१३एक्स लॉन्च करून आम्ही असामान्य टिकाऊपणा, फ्लूईड परफॉर्मन्स आणि उत्कृष्ट पॉवर कार्यक्षमता या जेन झीच्या वास्तविक गरजा, चांगल्या किंमतीत पूर्ण करण्याच्या आमच्या वचनबद्धतेस पुष्टी देत आहोत. के१३एक्स मध्ये आधुनिक बायोमिमेटिक शॉक अब्जॉर्प्शन सिस्टम, या श्रेणीतील आघाडीचे बॅटरी ऑप्टिमायझेशन आणि ५जी तत्परता आहे. या स्मार्टफोनमधून तडजोड न करता, एंट्री-स्तराच्या स्मार्टफोनमध्ये काय काय शक्य असू शकते याची व्याख्या करण्याचे ओप्पो चे व्हिजन झळकते.

स्मृती रविचंद्रन, उपाध्यक्ष- मोबाइल्स, फ्लिपकार्ट म्हणाल्या, फ्लिपकार्ट मध्ये आम्हाला फक्त दमदार परफॉर्मन्स देणाऱ्या नाही, तर दैनंदिन जीवनाच्या मागण्या पुरवणाऱ्या स्मार्टफोन्सची वाढती गरज स्पष्ट दिसत आहे. ओप्पो के१३एक्स ५जी च्या लॉन्चमुळे ग्राहकांची कोणतीही तडजोड न करता टिकाऊपणाची वाढती मागणी पूर्ण होणार आहे. मिलिटरी ग्रेडचा दणकटपणा, नावीन्यपूर्ण शॉक अब्जॉर्प्शन प्रणाली आणि विकसित फीचर्स असलेला के१३एक्स हा मूल्य, स्टाइल आणि लवचिकतेचा शोध घेणाऱ्या तरुणांसाठी एक उत्तम पर्याय आहे. हा दमदार आणि टिकाऊ फोन देशभरातील लक्षावधी ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यासाठी ओप्पो सोबत पुन्हा एकदा भागीदारी करताना आम्हाला आनंद होत आहे.

## आजच्या डिजिटल युगात ओळखीचा सर्रास गैरवापर होतो : परिवा प्रणती

मुंबई, २४ जून : सोनी सबवरील वागले की दुनियामध्ये मध्यमवर्गीय माणसाच्या दैनंदिन जीवनातील आव्हानांचे, मूल्यांचे आणि त्यांच्या चिवटपणाचे चित्रण असते. जीवनातील चढ-उतारांमधून वागले कुटुंब प्रेक्षकांना कौटुंबिक मूल्ये, प्रामाणिकपणा आणि आशा यांचे महत्त्व जाणवून देते. त्यामुळेच ही मालिका प्रेक्षकांना आपलीशी वाटते.

आगामी भागांमध्ये, अगदी अनपेक्षित असे काही तरी घडते- साई दर्शन सोसायटीमध्ये पोलीस येतात आणि शेजारी देशासाठी हेरगिरी करण्याच्या आरोपावरून वंदना (परिवा प्रणती)ला अटक करतात. अधिकाऱ्यांनी सांगितल्या प्रमाणे, संवेदनशील सरकारी माहिती फुटली असते आणि या बनवाबनवीसाठी जो अॅड्रेस वापरलेला असतो, तो वंदनाच्या नावे असतो.

प्रेक्षक बघतील की संकट दाट होत जाते. एका अज्ञात विदेशी कंपनीमधून २५ लाख रु. वंदनाच्या खात्यात पाठवले जातात. तिने गुप्त माहिती दिल्याबद्दल तिला आलेली रक्कम असल्याचा संशय यामुळे बळावतो. पोलीस राजेशला (सुमित राघवन) सांगतात की, पुरावा सबळ आहे. वागले कुटुंब या प्रकाराने स्तब्ध होऊन जाते. वागले कुटुंबीय हे काय घडते आहे याचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करत आहेत, तर वंदना सापळ्यात पूर्ण अडकलेली दिसत आहे.

सत्य शोधून वागले कुटुंब वंदनाचे निरपराधित्व सिद्ध करू शकेल का?

वंदना वागलेची भूमिका करणारी परिवा प्रणती म्हणते, आजच्या डिजिटल युगात, सायबर फसवेगिरी आणि ओळखीचा गैरवापर सर्रास होत आहे. वंदनाच्या बाबतीत जे झाले, तो एक सावधानतेचा इशारा आहे. तिला हेरगिरीसारख्या गंभीर आरोपात अडकवण्यासाठी तिच्या नावाचा आणि खात्याचा उपयोग झाला आहे. यावरून लक्षात येईल की आपणा सर्वांनाच किती मोठा धोका आहे. हा मुद्दा आमच्या मालिकेत हाताळत असल्याचा मला अभिमान वाटतो. कारण आपण सर्वांनीच अधिक जागरूक आणि सतर्क राहण्याची गरज आहे. अशा बनवाबनवीमुळे निरपराध जीवन उद्धवस्त होऊ शकते. नागरिक म्हणून सावध राहणे आणि संशयास्पद हालचालींची माहिती शासनास देणे आणि सशक्त सायबर सिक्युरिटी प्रणालीचा आग्रह धरणे ही आपली एकत्रित जबाबदारी आहे.

## वैयक्तिक इतिहास, अभिमान आणि दुखावलेपणात माझ्या व्यक्तिरेखेची प्रेरणा आहे : रजत दहिया

मुंबई, २४ जून : सोनी सबवरील उफ्फ ये लव है मुश्किल ... मालिकेतील अनपेक्षित कलाटण्या आणि जटिल व्यक्तिरेखा यांच्यामुळे प्रेक्षकांची उत्कंठा वाढत आहे. नुकत्याच, युग (शब्बीर अहलूवालिया) आणि कैरी (आशी सिंह) यांच्यातील बदलत्या नात्याचा आनंद घेऊ लागलेल्या प्रेक्षकांना अचानक विक्रम (विकी) मल्होत्रा (रजत दहिया)च्या एंट्रीमुळे एक नाट्यात्मक धक्का बसला आहे. विक्रम मल्होत्रा एक मोहक व्यक्तिमत्त्वाचा पण कुटिल वृत्तीचा वकील आहे, जो युगचा व्यावसायिक शत्रू आहे.

विक्रम ही काही साधीसुधी व्यक्तिरेखा नाही. तो युगचा जुना प्रतिस्पर्धी आहे. त्यांच्या इतिहासात फसवणूक आणि निरंतर संघर्ष आहे. त्यांच्या आगमनामुळे मनात खोल दाटलेले तणाव पुन्हा वर आले आहेत. युगच्या जीवनात तर त्यामुळे गोंधळ माजलाच आहे, पण कैरी सोबतचे त्याचे नाजुक नाते देखील प्रभावित होणार आहे. वरकरणी विक्रम शांत आणि मोहक दिसत असला, तरी त्याच्यात जुना राग ठासून भरला आहे. सत्य कसे खोटे भासवावे आणि खोट्याला कसा सत्याचा मान मिळवून द्यावा हे तो जाणतो. त्यामुळे त्याच्या येण्याने कथानकात अनपेक्षित वळणे येणार हे नक्की.

टेलिव्हिजन मालिकांमधील त्याच्या प्रभावी अभिनयाबद्दल ओळखला जाणारा रजत दहिया आपल्या भूमिकेविषयी म्हणतो, विक्रमच्या व्यक्तिरेखेतील गुंतागुंत आणि त्याचे अनपेक्षित वागणे यामुळे मी त्याच्याकडे आकृष्ट झालो. तो फक्त एक खलनायक नाही- लोकांची कमजोरी ओळखून त्यांचा उपयोग कसा करून घ्यायचा हे त्याला बरोबर समजते. तो तुम्हाला मोहित करतो, स्वतःविषयीच तुम्हाला साशंक करतो आणि त्याला हव्या त्या पद्धतीने परिस्थिती वळवून घेतो. हे करताना सगळ्यांपेक्षा तो दोन पावले पुढेच असतो. पण यातील मेख अशी आहे की, तो केवळ दुष्टपणाने हे करत नाही, तर त्याचे दुखावलेले मन, अभिमान आणि वैयक्तिक भूतकाळ यामुळे त्याचे वागणे असे आहे. युग आणि त्याच्यामधील मानसिक रस्सीखेच कशी चालते हे बघण्यास मी उत्सुक आहे. विशेषतः एका आगळ्यावेगळ्या प्रेमकाहाणीत हा संघर्ष दाखवल्याने तो अधिकच रोचक होतो.




## आज का अंदाज

बुधवार २५ जून २०२५
जबरदस्त पास होणारे चान्सेस
पत्थर फोड एकच

कल्याण बाजार

| 3 | 6 | 9 | 0 |
|---|---|---|---|
| 120 | 123 | 900 | 235 |
| 247 | 259 | 450 | 370 |
| 300 | 349 | 360 | 480 |
| 32 | 62 | 91 | 01 |
| 35 | 65 | 97 | 07 |
| 38 | 68 | 94 | 04 |

मुंबई बाजार

| 3 | 4 | 7 | 8 |
|---|---|---|---|
| 149 | 239 | 377 | 224 |
| 256 | 590 | 449 | 350 |
| 670 | 400 | 557 | 440 |
| 32 | 42 | 70 | 80 |
| 35 | 45 | 71 | 81 |
| 36 | 46 | 79 | 89 |

२५ जून २०२५
सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| 10 | 40 | 53 | 82 |
| 19 | 49 | 52 | 83 |
| 17 | 47 | 56 | 86 |

कल्याण, मुंबई आणि सर्व बाजारासाठी 60 पानांचा चार्ट मिळेल. 100 टक्के खात्रीशीर.

प्रो. बालाजी कुमार
9822486034


## सुपरटेक ईव्ही सार्वजनिक इश्यूमधून २९.९० कोटी रुपये उभारणार

नवी दिल्ली, २४ जून : सुपरटेक ईव्ही लि. ही इलेक्ट्रिक वाहन बाजारपेठेतील एक अग्रणी शक्ती असून दुचाकी (ई२डब्ल्यू) आणि इलेक्ट्रिक तीन चाकी (ई३डब्ल्यू) वाहनांवर लक्ष केंद्रित करण्यासह कंपनी एसएमई सार्वजनिक इश्यूमधून २९.९० कोटी रुपये उभारण्याची योजना आखत आहे.

कंपनीला बीएसई एसएमई प्लॅटफॉर्मवर पब्लिक इश्यू लाँच करण्यास मान्यता मिळाली असून हा सार्वजनिक इश्यू २५ जून २०२५ रोजी सबस्क्रिप्शनसाठी खुला होईल आणि २७ जून २०२५ रोजी बंद होईल. कॉर्पोरेट मेकर्स कॅपिटल लि. हे या इश्यूचे बुक रनिंग लीड मॅनेजर आहे.

२९.९० कोटी रुपयांची प्रारंभिक सार्वजनिक ऑफर ही पूर्णपणे ३२,४९,६०० इक्विटी शेअर्सची एक नवीन इश्यू आहे, ज्याचे दर्शनी मूल्य १० रुपये आहे. इश्यूसाठी किंमत पट्टा ८७ ते ९२ रुपये प्रति शेअर आहे. या इश्यूमधून कंपनी १६.५० कोटी रुपये खेळत्या भांडवलाच्या गरजांसाठी, ३ कोटी रुपये काही कर्जांच्या भागाच्या परतफेडीसाठी आणि उर्वरित रक्कम सामान्य कॉर्पोरेट उद्देशांसाठी आणि इश्यूशी संबंधित खर्चासाठी वापरण्याची कंपनीची योजना आहे.

अर्जासाठी किमान लॉट साईज १,२०० शेअर्स आहे जे किमान १,१०,४०० रुपयांच्या गुंतवणुकीत रूपांतरित होतात. ९२ रुपये प्रति शेअर वरच्या किंमत बँड आहे. इश्यूसाठी रिटेल कोटा ४७.५१ टक्के, एनआयआय ४७.४७ टक्के, क्यूआयबी ५.०२ टक्के आणि मार्केट मेकर ५.०२ टक्के आहे.

दरम्यान, कंपनीच्या उत्पादन पोर्टफोलिओमध्ये १२ मॉडेल्स समाविष्ट आहेत, ज्यामध्ये ८ प्रकारचे इलेक्ट्रिक दुचाकी आणि ४ प्रकारचे ई-रिक्षा आहेत. आर्थिक वर्ष २४-२५ साठी कंपनीने ७५.१९ कोटी रुपयांचा महसूल आणि ६.१९ कोटी रुपयांचा निव्वळ नफा नोंदवला आहे.

## राशीभविष्य

**मेष :** आज पूर्ण होत असलेल्या कामात अनावश्यक विलंब होईल. तुम्ही तुमची बुद्धिमत्ता आणि विवेक वापरावा. नोकरीच्या शोधात तुम्हाला इकडे तिकडे भटकंती करावी लागेल.

**वृषभ :** आजचा दिवस तुमच्यासाठी मिश्र परिणामांचा असेल. तुमचे वागणं सुधारण्याचा प्रयत्न करा. समाजात तुमची ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न करा. तुमची महत्त्वाची कामे इतरांवर सोपवू नका.

**मिथुन :** आज आर्थिक व्यवहारात अधिक काळजी घ्या. जास्त पैसे खर्च होऊ शकतात. परिस्थिती लक्षात घेऊन भांडवली गुंतवणुकीबाबत अंतिम निर्णय घ्या. प्रेमसंबंधांमध्ये जोडीदारावर संशय घेणे टाळा.

**कर्क :** आज तुमची जुन्या मित्राशी भेट होईल. निपुत्रिक लोकांना मुलांशी संबंधित चांगली बातमी मिळेल. प्रेमसंबंधांमध्ये संशयास्पद परिस्थिती टाळा. आज तुम्हाला एखादी चांगली बातमी मिळेल.

**सिंह :** खर्चावर नियंत्रण ठेवा. अनावश्यक खर्च टाळा. आर्थिक स्थिती मजबूत राहील. वादविवाद टाळा. मालमत्ता खरेदी-विक्रीत उशीर होईल. मात्र, प्रवासाचे योग संभवतील. कामाला सकारात्मक प्रतिसाद मिळेल.

**कन्या :** सहकाजयांशी मतभेद होऊ शकतात. कधीकधी वातावरण आनंदी तर कधीकधी तणावपूर्ण असू शकते. कामाच्या ठिकाणी महत्त्वाच्या योजना एखाद्या अज्ञात कारणामुळे पुढे ढकलल्या जाऊ शकतात.

**तूळ :** तुम्हाला अतिशय महत्त्वाच्या कामात यश मिळेल. तुम्हाला स्वादिष्ट जेवण मिळेल. तुम्हाला लांबच्या प्रवासाला जावे लागू शकते. कामाच्या ठिकाणी तुमच्या अधीनस्थांशी जवळीक वाढेल.

**वृश्चिक :** आज प्रेमसंबंधांमध्ये तुमच्या भावनांना सकारात्मक दिशा द्या. सुसंवाद निर्माण करण्याची गरज भासेल. वैवाहिक जीवनात पती-पत्नीमध्ये आनंद आणि सहकार्य वाढेल.

**धनु :** आज तुम्ही कायदेशीर अडचणीत येऊ शकता. ज्यामुळे तुम्हाला प्रचंड शारीरिक आणि मानसिक त्रासाला तोंड द्यावे लागेल. दुविधा निर्माण करणाजया परिस्थितीत ताणतणावाला हावी होऊ देऊ नका.

**मकर :** आजचा दिवस आनंदाचा आणि प्रगतीचा असेल. महत्त्वाच्या कामात कोणताही मोठा निर्णय तुमच्या वैयक्तिक परिस्थिती लक्षात घेऊनच घ्या. आज कामाच्या ठिकाणी निरर्थक वाद टाळा.

**कुंभ :** परस्पर विश्वास कायम ठेवा. वैवाहिक जीवनात पती-पत्नीमध्ये आनंद आणि सहकार्य वाढेल. तुमचे आरोग्य बिघडू शकते. महिलांचा वेळ हास्य आणि विनोदात जाईल.

**मीन :** तरुण मित्रांसोबत बाहेर जाण्याची योजना आखतील. भौतिक सुख, समृद्धी आणि व्यवसायात वाढ होण्याची शक्यता आहे. सामाजिक, राजकीय चर्चा किंवा वादविवाद टाळा.

## शब्दकोडे क्रमांक २१४६



**आडवे शब्द :-**
१) आश्चर्य
३) सैनिकांची एक स्फुर्तीदायक घोषणा
९) पार, ओटा
१०) गाणे गाणारा
११) मोठी जाड तलवार
१२) सुंदर युवती
१४) साय
१५) सुंदर, शहाणा
१७) गावाखालची जमीन
१९) नक्षीदार ताट
२१) शिसे आणि कथील यांचा मिश्र धातू
२२) मारझोड
२४) अनुमान, तर्क
२५) फळांचा राजा
२६) शोभिवंत, फक्कड
२७) घाण
२९) खोडण्याचे साधन
३०) बिया, रोपे इ
३२) पाणी, आयुष्य
३४) उपदेश
३६) वर-वधू मधील लग्नातील पडदा
३८) रेलचेल समृद्धी
३९) हरलेला
४१) गणितातील मध्यम प्रमाण
४३) लिखित निवेदन
४४) चेहेऱ्यावरील तेज
४६) घ्राणेंद्रिय
४७) फळातील खाद्यभाग
४८) हुप्प्या
५०) गाडीचे छत
५२) देशोदेशीचे नाणे
५४) नसत्या उठाठेवी करणारी
५६) धोबी
५७) श्रम, मेहनत
५८) बक
६०) पशुतुल्य आचरण करणारा मनुष्य, नराधम
६२) गव्हाचे बारीक पीठ
६३) हत्ती, वारण
६५) विंचवाचा डसण्याचा अवयव
६६) पटाईत
६८) मुसलमानांचा एक सण
७०) मेहनत, श्रम
७१) लाज
७२) गरळ ओकणारा सरपटी प्राणी
७४) समईतील कापसाची वळी
७५) पाण्याचा उकळताना होणारा आवाज
७६) ठकबाजी, फसविणे

**उभे शब्द :-**
१) परवानगी, मान्यता
२) बागांची लागवड करणारा मालक
३) उगाच
४) तात्काळ समर्पक उत्तर देणारा
५) दारूचा एक प्रकार
६) अस्वल, माकड यांना संभाळणारा
७) अस्थि, हाडूक,
८) उर्ध्व दिशा
९) गव्हाचे पीठ
१३) मृत्यू
१६) सरस्वती
१८) चावट, ताळतंत्र नसलेला
२०) गोंधळ व अव्यवस्थेची स्थिती
२२) मान देणे, मान्य करणे
२३) जयपराजय
२६) सावली
२७) थोडक्यात महानगरपालिका
२८) अफूचे बी
३१) बेलाचे पान
३३) वर देणारा, गणपती
३५) जननी
३६) फरक, तफावत
३७) कडक
३८) विसराळू मनुष्य
४०) बळकट, कणखर
४२) संताप
४३) मोकळीक, अनुमती
४५) मागणारा
४६) बेकरी मधील गोड बिस्किट प्रकार
४८) वक्र
४९) आकाश
५१) श्रीविष्णूचा सहावा अवतार
५३) धान्य कोठार
५५) पाणी
५९) हत्ती
६१) उथळ आकार
६४) साथ, मैत्री
६५) हल, शेतीतील एक अवजार
६७) माग, शोध
६९) प्रत्येक
७०) औषध
७१) बाण
७३) श्रीरामाचा एक पुत्र

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# शिंदे सेनेत पदाधिकाऱ्यांना नवी जबाबदारी

## निवडणुकांच्या तोंडावर कामांचा धडाका



■ महासागर प्रतिनिधी,
यवतमाळ, दि. २४ :

येत्या काही महिन्यात पार पडणाऱ्या, नगर पालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती यासारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी शिवसेना शिंदे गट पुर्णपणे तयार असून पदाधिकाऱ्यांवर नव्या जबाबदारी देण्यात आल्या आहेत. जिल्ह्यात शिवसेना पक्षवाढीसाठी संघटनात्मक बांधणीवर भर देण्यात येत असून त्याचे सकारात्मक परिणाम येत्या निवडणुकांमध्ये पहावयास मिळतील अशी माहिती शिवसेना शिंदे गटाचे संपर्कप्रमुख हरिहर लिंगनवार यांनी दिली.

शिवसेनेने संघटनात्मकदृष्टा पदाधिकाऱ्यांवर सोपवण्यात आलेली नवी माहिती आणि निवडणुकीसाठी पक्षाची तयारी याची माहिती देण्यासाठी सोमवारी दि. २३ जून रोजी दुपारी आयोजीत करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

त्यामध्ये वणी, राळेगाव, यवतमाळ व आर्णी या विधानसभेचे संपर्कप्रमुख म्हणून हरिहर लिंगनवार यांच्याकडे जबाबदारी राहणार आहे. दिग्रस, पुसद व उमरखेड या तिन विधानसभेचे संपर्कप्रमुखांची जबाबदारी आता श्रीधर मोहोड यांच्याकडे दिली आहे. जिल्ह्यात तीन नव्या जिल्हाप्रमुखांची घोषणा करण्यात आली. त्यात गजानन डोमाळे यांच्याकडे यवतमाळ, राळेगाव विधानसभा मतदारसंघाचे जिल्हाप्रमुख म्हणून जबाबदारी दिली आहे.

राजुदास जाधव यांच्याकडे आर्णी, वणी विधानसभेची जबाबदारी देण्यात आली आहे. तर यशवंत पवार दिग्रस, पुसद, उमरखेड विधानसभा मतदारसंघाचे जिल्हाप्रमुख राहणार आहे. यावेळी चंद्रपूर व यवतमाळ लोकसभा मतदार संघाचे नवे समन्वयक विश्वास नांदेकर, संपर्कप्रमुख श्रीधर मोहोड, जिल्हाप्रमुख गजानन डोमाळे, राजुदास जाधव, यशवंत पवार उपस्थित होते. राठोड यांच्याकडे पश्चिम विदभार्ची जबाबदारी शिवसेना शिंदे गटाचे मुख्य नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांचेकडे पश्चिम विदर्भाची निवडणुकीची जबाबदारी दिली आहे.

महागनर पालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच पालिका निवडणुकीसाठी संजय राठोड यांचे दौरे सुरू असल्याची माहिती संपर्कप्रमुख हरिहर लिंगनवार यांनी यावेळी दिली.

# अतिवृष्टीतील नुकसानीच्या मदतीपासून शेतकरी वंचित

■ महासागर प्रतिनिधी,
महागाव, दि. २४ :

महागाव तालुक्यातील शेतकऱ्यांना मागील वर्षी झालेल्या अतिवृष्टीतील नुकसानभरपाई अद्यापही मिळाली नाही. ती तत्काळ देण्यात यावी, अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा राष्ट्रीय किसान मोर्चाच्या वतीने महागाव तहसीलदार यांना निवेदनातून देण्यात आला आहे.

२०२४-२५ या वर्षातील खरीप हंगामात अतिवृष्टी झाल्यामुळे शेती पिकाचे प्रचंड नुकसान झाले होते. शासन स्तरावर तातडीने पंचनामे करण्यात आले. त्यानंतर मदतही जाहीर करण्यात आली. परंतु महागाव तालुक्यातील गुंज सर्कल व तालुक्यातील इतर शेतकऱ्यांच्या खात्यात अद्याप पर्यंत अतिवृष्टीचा एकही रुपया जमा झालेला नाही. या वर्षीचा खरीप हंगाम सुरू झाला आहे. परंतु पावसाने दडी मारल्यामुळे शेतकऱ्यावर दुबार पेरणीचे संकट उभे झाले. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीची आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. अन्यथा राष्ट्रीय किसान मोर्चाच्या वतीने शासनाच्या विरोधात तीव्र आंदोलन करण्याचा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला.

# अमरावती विभागाच्या ८ आगारांमधून पंढरपूरसाठी सोडणार १७५ जादा बसेस



■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. २४ :

आषाढी यात्रेनिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक पंढरपुरात जात असतात. भाविकांचा प्रवास सुरक्षित व सुखकर व्हावा यासाठी राज्य परिवहन महामंडळाच्या अमरावती विभागाच्या ८ आगारांमधून १७५ विशेष बस सोडण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

६ जुलैला सर्वत्र साजऱ्या होणाऱ्या आषाढी एकादशी निमित्त भाविक मोठ्या संख्येने पंढरपूर येथे दर्शनासाठी जात असतात. पंढरपूरला जाण्यासाठी एसटी महामंडळाकडून दरवर्षी जादा बसेसची सोय उपलब्ध करून देण्यात येत असून यंदा जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून जादा बसेस उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

एसटी प्रशासनाने पंढरपूरला भाविकांना जाण्यासाठी चंद्रपूर, राजुरा, चिमूर आणि वरोरा आगारातून २५ अतिरिक्त बसेसची व्यवस्था केली आहे. भाविकांच्या वाढत्या मागणीनुसार प्रशासनाकडून आणखी बसेस वाढविण्याचे नियोजन करण्यात येणार आहे. विठू नामाचा गजर करत असंख्य पालख्या पंढरपूरकडे मार्गस्थ झाल्या आहेत. हजारो वारकऱ्यांच्या सेवेसाठी लालपरीसुद्धा सज्ज झाली आहे. अमरावती जिल्ह्यातील ८ आगारांमधून १७५ बसेसचे नियोजन करण्यात आले आहे. १ जुलैला दुपारी १२ वाजता पहिली बस पंढरपूरसाठी रवाना होत आहे. ही बस २ जुलैला सकाळी १० वाजता पंढरपूरला पोहोचणार आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही एसटी महामंडळाकडून पंढरपूरला जाणाऱ्या भाविकांसाठी यात्रा विशेष बसेस सोडण्यात येत आहेत. ६ जुलैला आषाढी एकादशी असून, भाविकांना त्यापूर्वी नियोजित तीर्थस्थळी पोहोचता यावे, यासाठी २ ते १३ जुलै या कालावधीत यात्रा स्पेशल बसेस सोडण्यात येणार आहेत. विशेष म्हणजे, गतवर्षीच्या तुलनेने यंदा २७ अधिक बसेसची व्यवस्था केली आहे. मागील वर्षी १२४ बसेस पंढरपूरकरिता मिळाल्या होत्या. राज्यभरातून वारकरी दिंडी, पालखी घेऊन पंढरपूर येथे दाखल होतात. या दरम्यान रिंगण सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. ते पाहण्यासाठी भाविक आधीच पोहचत असतात. अमरावती आगारातून सर्वाधिक २९ बसेस सोडण्यात येणार असून बडनेरातून २५, परतवाडा आगारातून २६, वरूडमधून २०, चांदूर रेल्वेमधून १५, दयार्पूर मधून २०, मोर्शीमधून २० आणि चांदूर बाजार आगारातून २० बसेस सोडण्यात येणार आहेत.

# सिनेमा सिनेमा खेळतांना

## एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. २४ :

चित्रपट, नाटक, वेब सिरीज, न्यूज चॅनेल, या माध्यमामध्ये रोजगार, व्यवसाय, नोकरीच्या संधी साठी धडपड करणाऱ्या कलावंत तसेच विद्यार्थी यांना चित्रपट उद्योग क्षेत्राची तांत्रिक ओळख आणि निर्मितीचे पायाभूत प्रशिक्षण देण्यासाठी अमरावती स्पंदन परिवार बहुउद्देशीय संस्था द्वारा संचालित बिइंग आर्टिस्ट अकॅडेमि ऑफ फिल्म अँड थिएटर आर्टस, अमरावती आयोजित एक दिवशीय "सिनेमा सिनेमा खेळतांना" कार्यशाळेचे आयोजन रविवारी 29 जून रोजी बीइंग आर्टिस्ट अकादमी ऑफ फिल्म अँड थिएटर आर्टस, अमरावती येथे केले असून 28 जून पर्यंत नाव नोंदणी करून निशुल्क कार्यशाळेत सहभागी होण्याचे आवाहन अकादमी संचालिका स्नेहा वासनिक यांनी केले आहे.

कार्यशाळेला प्रमुख उपस्थीती तथा मार्गदर्शक म्हणून संस्थेचे माजी विद्यार्थी व मालिका दिग्दर्शक आणि अभिनेता योगेश डवरे (प्रचिती सद्गुरू श्री गजाननाची, अबीर गुलाल ई.) आणि तुला शिकवीन चांगलाच धडा, सुंदरा मनामधे भरली मालिकांचे दिग्दर्शक आणि अभिनेता तेजल डहाणकर, तसेच सध्या माध्यम क्षेत्रात कार्यरत असणारे आणि अकॅडमीचे माजी विद्यार्थी प्रामुख्याने उपस्थित राहणार आहे. चित्रपट तसेच माध्यमाच्या रीतसर शिक्षणानंतर शासकीय संस्था, अशासकीय संस्था, सरकारी कार्यालये, खाजगी संस्थामधे करियर च्या संधी, तसेच फेलोशीप्स, स्कॉलरशिप, अर्थ सहाय्य मिळविण्याचे विविध मार्ग आणि चित्रपट उद्योजकता जनगृती करण्याच्या उद्देशाने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असून चित्रपट निर्मितीची प्रक्रीया, निमार्ता, कथा लेखन, दिग्दर्शन, अभिनय, छायाचित्रण, प्रकाश योजना, संकलन, ध्वनी, कला दिग्दर्शन, रंगभूषा, वेशभूषा, जाहिरात व प्रसिद्धी, सेन्सॉर सर्टीफिकेशन, वितरण व्यवस्था,आर्थिक गुंतवणुक व मोबदला या सर्व विभागांची कार्य पद्धती तसेच सिनेमा किंवा चित्रपट म्हणजे काय? कला-व्यवसाय-उद्योग-करियर म्हणून या क्षेत्राकडे बघण्याचा दृष्टीकोन कसा असावा? यावर चर्चात्मक मार्ग दर्शन करण्यात येणार आहे.

# रामपूर शाळेत नव्या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांचे केले स्वागत

■ महासागर प्रतिनिधी,
यवतमाळ, दि. २४ :

नवीन शैक्षणिक वर्षाला सोमवारी दि. २३ जून पासून प्रारंभ झाला. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत झाले. शाळेत प्रथमच दाखल झालेल्या विद्यार्थ्यांची गावातून वाजतगाजत मिरवणूक काढण्यात आली. गरजू विद्यार्थ्यांना दप्तर, पुस्तक, वह्यांचे वाटप झाले. पहिल्याच दिवशी नवीन कोरी पुस्तक हातात पडल्याने विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित झाला. काही शाळांमध्ये शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत झाले. शाळेत प्रथमच दाखल झालेल्या विद्यार्थ्यांची गावातून वाजतगाजत मिरवणूक काढण्यात आली. घाटंजी जि. प. प्राथमिक शाळा, आदर्शगाव रामपूर येथे नविन शैक्षणिक वर्षाच्या स्वागतार्थ भव्य व आनंदमय प्रवेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. पारंपरिक लेझीम, ढोल-ताशांच्या गजरात विद्यार्थ्यांसाठी आकर्षक प्रवेशरथाचे आयोजन करण्यात आले होते.

विशेष इयत्ता पहिलीतील नव्या विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत करून त्यांच्यासाठी हा दिवस अविस्मरणीय ठरविण्यात आला. याप्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा कविता कोरवते अध्यक्षस्थानी होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून ग्रामपंचायत सदस्य नरसिंगजी पेन्दोर, मेघा झाडे, शिक्षक पालक संघाचे सदस्य अंकुश कोरवते, अर्जुन मंगाम, सचिन मेश्राम, माजी विद्यार्थी संघाचे अंकुश मरस्कोल्हे आणि मिलिंद आत्राम यांची उपस्थिती लाभली.

# प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्या : डॉ. तांगडे



■ महासागर प्रतिनिधी, बुलडाणा, दि. २४ :

सोशल मीडिया आरोग्याला तारक की मारक या निबंध स्पर्धेतील विजेत्यांना सुद्धा यथोचित पुरस्कार देण्यात आले.आपले आरोग्य हीच खरी संपती हा संदेश देत आजारी पडण्यापूर्वी प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, असे आवाहन जिल्हा आयुष अधिकारी डॉ. प्रशांत तांगडे यांनी केली.

जिल्हा आयुष विभाग,ज्ञानगंगा रनर्स ग्रुपचे रण रागिणी फ्री रण क्लब आणि जिल्हा स्त्री रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने २२ जून रोजी जागतिक योग दिवसाच्या निमित्ताने स्त्रियांसाठी योग संगम शिबीर आयोजित करण्यात आले. या शिबिरामध्ये ११६ स्त्रीयांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जिल्हा स्त्री रुग्णालय अधीक्षक डॉ. प्रशांत पाटील, तर प्रमुख पाहुणे जिल्हा आयुष अधिकारीडॉ. प्रशांत तांगडे, हे होते. जिल्हा स्त्री रुण्यालयाच्या निसर्गरम्य वातावरणात सर्व स्त्रियांनी योग तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली योग आणि प्राणायामाचे प्रात्यक्षिक केले. आयुष कन्सल्टंट डॉ शफात आणि योग तज्ञ डॉ. नरेंद्र भिसे, भोलाने यांनी आयोजनात महत्त्वाची भूमिका निभावली.योगा दिनाचे निमित्त साधून ३१ मे चॅलेंज आणि अहिल्या नगर मॅरेथॉन च्या सर्व रण रागिणींचा क्लब चे टी शर्ट देऊन सन्मान करण्यात आला.उपस्थित सर्व रण रागिणींसाठीआरोग्य विभागाने मोफत ब्लड चेक अप कॅम्पचे आयोजन करण्यात आले. याचा लाभ सर्व रणरागिणी यांनी घेतला.

# संकल्प ढोल प्रतिष्ठानच्या सेवा कार्यावर विद्यार्थ्यांनी संशोधन करावे : प्रा. डॉ. भडके



■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. २४ :

अकोल्यातील गेल्या दहा वर्षांपासून ढोल-ताशा क्षेत्रात कार्यरत असलेल्या संकल्प प्रतिष्ठान या संस्थेच्या सेवाभावी कार्यावर संशोधन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी पुढे यावे, असे आवाहन सीताबाई महाविद्यालयातील संगीत विभागातील प्रा. डॉ. नाना विठ्ठलराव भडके यांनी केले. ते संकल्प प्रतिष्ठानच्या वार्षिक संकल्पपूर्ती कार्यक्रमात बोलत होते.

गणेशोत्सव, सांस्कृतिक कार्यक्रम व इतर उत्सवांमध्ये आपल्या उदारीकरणातून नावलौकिक मिळवलेल्या या पथकाने केवळ कलाविष्कारापुरते मर्यादित न राहता सामाजिक कार्यातही आपला ठसा उमटवला आहे. मिळणाऱ्या मानधनातून दरवर्षी गरजू संस्थांना मदत करण्याची आगळीवेगळी परंपरा या संस्थेने जपली आहे. या सामाजिक बांधिलकीच्या कायाची अभ्यासपूर्वक नोंद घेणे आणि त्यावर शैक्षणिक संशोधन करणे आवश्यक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. या संदर्भात विद्यार्थ्यांना संकल्प प्रतिष्ठानच्या स्थापनेपासून ते आजपर्यंतचा संपूर्ण दस्तऐवज, आर्थिक अहवाल, कार्यक्रमांची माहिती, कलाकारांचे अनुभव व माध्यमांमधील प्रसिद्धीचे कात्रणे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

यावर आधारित संशोधन प्रबंध, केस स्टडी, डॉक्युमेंटरी, किंवा निबंध तयार करून विद्यार्थ्यांनी लोककला, समाजकार्य, नेतृत्व, स्वयंसेवा, पारदर्शकता यासारख्या घटकांचा सखोल अभ्यास करावा, असे आवाहन करण्यात आले. दहा वर्षांपासून कला आणि समाज यांचा समन्वय साधत कार्य करणाऱ्या संकल्प प्रतिष्ठानने आजवर पारदर्शकता आणि सामाजिक भान जपत एक आदर्श संस्थेचे उदाहरण ठेवले आहे. विद्यार्थ्यांना संस्थेवर अभ्यास करण्याची संधी प्रा. डॉ. भडके यांच्याकडून लोककलेतील नेतृत्व विकास,ढोल-ताशा परंपरेतील सामाजिक समर्पण,निधीचा समाजोपयोगः एक आदर्श मॉडेल,पारदर्शक संस्था व्यवस्थापन, युवा कलाकार घडवण्याची प्रक्रिया यासारखे विषय संशोधनासाठी सुचवण्यात आलेत.

# पिंजर-निहिंदा रस्त्याचे काम निकृष्ट

■ महासागर प्रतिनिधी,
बार्शीटाकळी, दि. २४ :



तालुक्यातील पिंजर ते निहिदा हा रस्ता प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंअंतर्गत आहे. या रस्त्याचे काही दिवसांपूर्वी काम करण्यात आले. मात्र रस्त्याचे काम निष्कृष्ट झाल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे. आता या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्यामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. तसेच संपूर्ण मार्गावर अनेक झाडे फांद्या रस्त्यावर आल्याने लोकांना समोरचे वाहन दिसत नाही, त्यामुळे या रस्त्यावर अनेकदा लहान मोठे अपघात घडले आहेत.

पिंजर - निहिदा या मार्गाने एसटी सुरू आहे. अनेक वाहनाची मोठी वर्दळ सुरू असते. परंतु रस्ता प्रवासासाठी योग्य नसल्यामुळे लोकांना नाईलाजाने खड्डेमय रस्त्यावरुन प्रवास करावा लागत आहे. पिंजर- निहदा या रस्त्याचे अंतर पाच किलोमीटर आहे. या मार्गावर बहिरखेड, उमरदरी, निहिदा, लखमापूर आणि सावरखेड आदी महत्त्वाचे गावे आहेत. या गावांमधून दररोज विद्यार्थी पिंजर येथे शिक्षणासाठी जातात. अनेक विद्यार्थ्यांनी क्लासेस लावलेले आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना दररोज खडतर मार्गाने प्रवास करावा लागतो. रस्ता खराब असल्यामुळे खासगी वाहने व एसटी हे हळूहळू खड्डे चुकवत चालतात.

त्यामुळे विद्यार्थी वेळेवर क्लास, शाळेमध्ये पोहोचू शकत नाही, अशी खंत गावातील अनेकांनी व्यक्त केली. हा रस्ता प्रधानमंत्री ग्राम सडक योजनाअंतर्गत येत असून, संबंधित कार्यकारी अभियंता आणि शाखा अभियंता यांनी याकडे तत्काळ लक्ष द्यावे. रस्त्यावर आलेल्या झाडाच्या फांद्या झाडे तोडण्यात याव्यात, अशी मागणी लखमापूर येथील प्रतिष्ठित तथा कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक संतोष सोनटक्के व गावकऱ्यांनी केली आहे.


**Change Of Name**

MY OLD NAME WAS **FAZLURRAHMAN MOIN.** NOW MY NEW NAME IS **FAZLURRAHMAN JAMEELURRAHMAN.**
**ADD :** 302 AALISHAN APARTMENT GANJIPETH NAGPUR 440018

MY OLD NAME WAS **GUFRAN ASED.** NOW MY NEW NAME IS **GUFRAN ASAD.**
PASSPORT NO. **K1743112**
**ADD :** MOMINPURA NAGPUR

I WANT TO CHANGE MY NAME IN MY PASSPORT NO. **N9990218.** MY OLD NAME WAS **NIZAMUDDIN KAMAL.** AND MY NEW NAME GIVEN NAME IS **NIZAMUDDIN** AND SURNAME IS **KAMAL.**
**ADD :** NEAR JAMA MASJID MOMINPURA NAGPUR : 440018

MY OLD NAME WAS **SHABISTA KHATOON.** NOW MY NEW NAME IS **SHABISTAN NIZAMUDDIN KAMAL.**
**ADD :** NEAR JAMA MASJID MOMINPURA NAGPUR 440018

MY OLD NAME WAS **SHEIKH SHELIM SHEIKH NADAR PATHAN.** NOW MY NEW NAME IS **SALIM NADAR SHEIKH.**
**ADD :** SONKHAMB POST - METPANJRA TAH - KATOL NAGPUR - 441302


# धनगर समाज राज्यात २ नंबरवर खोदले

## शेगाव नाका येथे अहिल्या महिला परिषदेचा वर्धापन दिन उत्साहात



■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. २४ :

विदर्भासह जिल्ह्यात धनगर महिलांना पुढे आणण्याचे काम अहिल्या महिला परिषदेने केले आहे. हे काम वाखाणण्याजोगे आहे. अहिल्या महिला परिषदेच्या माध्यमातून अहिल्यादेवींचे कार्य करण्याचे काम केले जात आहे. कुठलेही काम करताना कोणताही स्वार्थ न ठेवता केले, तर ते अतिशय प्रभावशाली ठरते. धनगर समाज हा राज्यात दोन नंबर वर आहे. मात्र ज्या पद्धतीने संघटित व्हायला पाहिजे, तसा संघटित झाला नाही. त्यामुळे समाज संघटित होणे महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन मुंबई भाजप प्रदेश सचिव निहारिका खोदले यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची त्रिशताब्दी जयंती व अहिल्या महिला परिषदेचा १३ वा वर्धापन दिवस शेगाव नाका अभियंता भवन येथे आयोजित केला होता. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून निहारिका खोदले उपस्थित होत्या. कार्यक्रमाला सेवानिवृत्त कृषी अधिकारी राजेंद्र मस्के, शिक्षणाधिकारी शुभम झाडे, ऑर्थोपेडिक हॉस्पिटलचे डॉ. जयप्रकाश बनकर, गोविंद कासट, जयश्री शहाकार, योगिता गोहत्रे, विनिता गादे उपस्थित होत्या. निहारिका खोदले यांनी अहिल्यादेवींचा जीवन प्रवास थोडक्यात सांगितला. तसेच महिलांनी सक्षम व्हायला पाहिजे, असे आवाहन केले. सक्षम महिलेच्या मागे पुरुषाचा नक्की हात असते, हे अहिल्यादेवीचे उदाहरण देऊन त्यांनी सांगितले. महिलांमधील सुप्त गुणांना वाव मिळून त्या एक नवीन इतिहास रचतील, असेही खोदले म्हणाल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रीती गादे यांनी केले, तर आभार नवनिर्वाचित सचिव वर्षा लांबाडे यांनी मानले. प्रास्ताविकात योगिता गोहत्रे यांनी अहिल्या महिला परिषदेचे कार्य व जयश्री शहाकार यांनी एक वर्षात केलेल्या कार्यक्रमाचा लेखाजोखा मांडला. मेघा बोबडे व प्रणिता कोल्हे यांनी अहिल्या स्तवन केले. या वेळी डॉ. जयप्रकाश बनकर व डॉ. अमोल नरोटे यांचा श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमासाठी शोभा काळमेघ, वंदना डागे, सरोज औघड, नीता टेकाडे, वर्षा लांबाडे, कल्पना ढोके, नीता कवाने, सुजाता नवले, रंजना लांडे, प्रणिता कोल्हे, हरदिनी लव्हाळे, डॉ. शिल्पा ढवळे, प्रतिभा उमेकर, संध्या गंधे, रेखा गावंडे, सरला ढवळे आदींनी परिश्रम घेतले. हातात तलवार घेऊन शत्रूंना पराजय करणारी महिला : अध्यक्षीय भाषणात राजेंद्र मस्के यांनी अहिल्या महिला परिषदेला ग्रामीण क्षेत्रातही परिषदेचा कारभार पसरवणे महत्त्वाचे असल्याचे सांगत चूल आणि मूल सांभाळणाऱ्या महिलांना या परिषदेत सहभागी करून घ्यावे. अहिल्यादेवी होळकर केवळ भक्ती करणारी स्त्री नव्हे, तर हातात तलवार घेऊन शत्रूंना पराजय करणारी महिला आहे. त्याचप्रमाणे भक्ती, शक्ती आणि युक्तीने कशा पद्धतीने काम केले जाते. याचेही उदाहरण महिलांना मिळाले आहे.

अहिल्यादेवींचे कार्य हे केवळ शहरातच नाही तर अहिल्या महिला परिषदेच्या माध्यमातून खेड्यापाड्यात पोहोचवण्याचे आवाहन शिक्षणाधिकारी प्रमुख व्याख्याते शुभम झाडे यांनी केले. अहिल्यादेवींचे कार्य केवळ एका समाजासाठी नव्हते. त्यामुळे अहिल्यादेवी जयंतीमध्ये इतर समाजाला बोलावून त्यांच्यापर्यंत अहिल्यादेवींचा इतिहास पोहोचवणे गरजेचे आहे. त्यामुळे सर्व समाजाला त्यातून दिशा व चालना मिळेल. उज्जैनमध्ये सर्व घरोघरी मग तो कोणत्याही समाजाचा असो अहिल्यादेवीचा फोटो आहे व तेथील लोक त्यांना देवी न म्हणता आई म्हणतात. अहिल्या महिला परिषदेचे कार्य हे खूप मोठे असून ते फक्त अमरावती शहरापुरते न ठेवता ते गावोगावी व संपूर्ण राज्यात पोहोचवणे आवश्यक असल्याचेही मत त्यांनी व्यक्त केले.

## नगरपंचायत बिडगाव – तरोडी(खु) पांढुर्णा, ता. कामठी, जि नागपूर

### विक्रीपत्र / आममुखत्यार पत्र / विशेष मुखत्यार पत्र फेरफार बाबत जाहीरनामा

याद्वारे सूचित करण्यात येत की, खालील मालमत्ता धारकांनी/ अर्जदारांनी या कार्यालयात मालमत्ता रेकॉर्डवरून नावात फेरफार करणेकरिता विक्रीपत्रानुसार / दस्ताऐवजानुसार अर्ज सादर केलेला आहे. नगरपंचायत अंतर्गत करण्यात येत असलेल्या खालील फेरफारवर काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाच्या असतील त्यांनी प्रसिद्धी दिनांकापासून ७ दिवसाचे आत आपल्या हरकती मूळ दस्ताऐवाजासह लेखी स्वरुपात नगरपंचायत बिडगाव – तरोडी(खु) पांढुर्णा कार्यालयात सादर कराव्यात. मुदतीनंतर येणारे आक्षेप / अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. यांची नोंद घ्यावी.

| अ. क्रं | एरिया | मालमत्ता क्रं | प्लॉट क्रं. | सोसायटीच नाव व ख.क्रं. | रेकॉर्डवरून खारीज करावयाचे नाव | रेकॉर्डला दाखल करावयाचे नाव | सादर केलेले दस्ताऐवज | क्षेत्रफळ (चौ.फुट) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | तरोडी खुर्द | १२ | १२ | अनिल शंकर लांबट | अनिल शंकर लांबट | विद्या नानाराव काळे | विक्रीपत्र | १८०० |
| २ | तरोडी खुर्द | ६०४९ | ३६ | – | अनिल मारोतराव तालेवार | १)सुभाष गणेश मांडवे<br>२)विश्वास गणेश मांडवे | विक्रीपत्र | १०४९ |
| ३ | तरोडी खुर्द | ८४३५ | ६९ | कुमारेश शंकरराव अवचट | हरीश दशरथजी मोहाडीकर | मनिष भाऊरावजी ठाकरे | विक्रीपत्र | ११०० |
| ४ | तरोडी खुर्द | ११८०९ | २८ | मुरलीधर बिसन ठोंबरे | रामदास केशवराव डोंगरे | राहूल रामदासजीडोंगरे | वारसान फेरफार | ६०० |
| ५ | तरोडी खुर्द | ११०५० | ७२ | साई पार्थ बिल्डर्स तर्फे इतर ५ | मधुमिता मनोहर धाबेकर | सुरज राजहंस वानखेडे | विक्रीपत्र | १५११ |
| ६ | तरोडी खुर्द | १८२६ | २७ | अनिल अजाब कांबे व इतर ५ | मुनेश्वर मुरलीधर पीलारे | चंद्रशेखर यादवजी नाकतोडे | आममुखत्यार पत्र | १५०० |
| ७ | पांढुर्णा | ६७६९ | ३५ | कैलास पुंडलिकराव वानखेडे | मुरलीधर श्रावणजी रंभाड | १)शंकर वल्द मनोहर हिंगणेकर<br>२)अरुण वल्द मनोहर हिंगणेकर | विक्रीपत्र | १०८७ |
| ८ | तरोडी खुर्द | १२०४० | ६५ | रुपेश काशीनाथ सोनकुसरे व इतर ४ | सोपान डोमाजी सार्वे | भारती जितेंद्र हेडाऊ | विक्रीपत्र | १३०० |
| ९ | पांढुर्णा | २४९ | २४९ | अशोक आनंदराव धापोडकर | अशोक आनंदराव धापोडकर | उषा सुरेशराव गिते | विक्रीपत्र | १००५ |
| १० | पांढुर्णा | २८३ | ५ | प्रेमराज तुळशिराम बडोले | संगीता पुरुषोत्तम आकरे | १)राजेंद्र महताबसिंग राहंगडाले<br>२)नरेंद्र गुरुद्याल पटले | विक्रीपत्र | १२७५.५३ |
| ११ | तरोडी खुर्द | १२७०३ | ३९० | राजू मुरलीधर चिंचाळकर व इतर २ | समीर शेख सत्तार शेख | रंजीत शंकरराव शाहु | विक्रीपत्र | ६०० |
| १२ | तरोडी खुर्द | १३२६५ | [illegible] | राजू मुरलीधर चिंचाळकर व इतर २ | मालती अशोकराव श्रीखंडे | रंजना संजय साहू | विक्रीपत्र | १२०० |
| १३ | बिडगाव | ५४०० | ७० | पवनसिंह सरजुसिंह राजपूत | चंद्रशेखर चिंतामनजी हेडाऊ | १)राजकुमार भाऊलाल पारधी<br>२)मनोजकुमार नीलमचंद पटले | विक्रीपत्र | १००० |
| १४ | तरोडी खुर्द | ५०४३ | ३० | रामकृष्ण रुपचंद सारंगपूरे | इन्द्रेश खरकसिंह रहांगडाले | सिल्वेनिया रविंद्र रामटेके | विक्रीपत्र | ६९७.५० |
| १५ | बिडगाव | १०८८८ | ७८ | विजय गंगाधर नरड व इतर १ | संजय विनायकराव नंदनवार | हीमा मंगेश नागपुरे | विक्रीपत्र | १५०० |
| १६ | तरोडी खुर्द | १४१४२ | १४ | निशांत कृष्णराव साखरकर | कमलाताई शंकरराव ठवकर | विवेक रमेश बावनथडे | विक्रीपत्र | १२०० |
| १७ | तरोडी खुर्द | ४४६१ | १८ | विजय गंगाधर नरड व इतर २ | विजय किसनराव येंडे | रिषभ संजय गुप्ता | विक्रीपत्र | १५०० |
| १८ | तरोडी खुर्द | ११९५१ | १७७ | बबनराव नामदेवराव राखुंडे | शिला मोहन बिसेन | सरिता तुळशीदास भोगे | आममुखत्यार पत्र | ६०० |
| १९ | पांढुर्णा | १८४/५ | ८ | तिरुपती बालाजी हाऊसिंग | एकनाथ जानकीराम मौदेकर | माताप्रसाद जवाहरलाल उमरबैश्य | विक्रीपत्र | १५०० |

मुख्याधिकारी
नगरपंचायत बिडगाव – तरोडी(खु) पांढुर्णा

# निरामय

## काय असते मुव्हमेंट डिसऑर्डर?



हालचालींशी संबंधित विकार (मूव्हमेंट डिसऑर्डर) ही सामान्य समस्या आहे, मात्र न्यूनगंडामुळे त्याकडे फारसे लक्ष दिले जात नाही. शिवाय हा विकार जीवघेणा नसल्याने अनेकदा त्याकडे दुर्लक्ष केले जाते. त्याचे प्रमाण वयोगटानुसार बदलते. विशिष्ट हालचाल विकारांचे प्रमाण वयाबरोबर वाढते. काही वेळा अनुवांशिकतेमुळे किंवा मेंदूला दुखापत झाल्याने हा विकार जडू शकतो.

**नवे काही**

**डॉ. संपत केदारे**

**वयोगटानुसार प्रमाण**

'नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसीन' मध्ये प्रकाशित झालेल्या एका अहवालानुसार २०१२ ते २०१८ या कालावधीत देशातील प्रमुख शहरांमध्ये १४ हजार ५६१ नव्या रुग्णांवर 'मूव्हमेंट डिसऑर्डर क्लिनिक'मध्ये उपचार झाले. यात ९ हजार ५७८ पुरुष आणि ४ हजार ९८३ महिलांचा समावेश होता. सामान्यतः ५० ते ५९ वयोगटातील लोकांमध्ये या आजाराचे प्रमाण १८.५५ टक्के तर ८० ते ८९ वयोगटातील लोकांमध्ये ५१.३ टक्क्यापर्यंत प्रमाण आढळते. पुरुषांमध्ये आणि स्त्रियांमध्ये हालचाल विकारांचे प्रमाण समान असते.

'मूव्हमेंट डिसऑर्डर'मुळे शरीरावरील नियंत्रण सुटते. हात पाय थरथरू शकतात आणि बोलण्यात अडचण येऊ शकते. इच्छेनुसार काम करता येत नाही. प्रत्येक प्रकारच्या हालचालींवर याचा परिणाम होऊ शकतो. अनेक कारणांमुळे मूव्हमेंट डिसऑर्डर होऊ शकतो.

## नियंत्रण फॅटी लिव्हरचं



सध्याचं जीवन खूपच धकाधकीचं, धावपळीचं झालं आहे. आहाराच्या पद्धती बदलत चालल्या आहेत. जंक फूड, बाहेरचे तेलकट पदार्थ खाल्ल्याचे परिणाम शरीरावर दिसू लागले आहेत. जीवनशैलीशी संबंधित अनेक विकार डोकं वर काढू लागले आहेत. मधुमेह, उच्च रक्तदाब, उच्च कोलेस्टरॉल, स्थूलपणा हे एकेकाळी पन्नाशीनंतर जडणारे विकार आता तिशीतच जडू लागले आहेत. या विकारांसोबतच 'नॉन अल्कोहोलिक फॅटी लिव्हर डिसिज' (एनएएफएलडी)चं प्रमाण वाढत चाललं आहे.

एनएएफएलडी हा यकृताचा आजार आहे. नावावरून हा खूप दुर्धर आजार वाटत असला तरी प्रत्यक्षात जीवनशैलीत थोडेफार बदल करून या विकारावर नियंत्रण ठेवता येतं. इतकंच नाही तर हा विकार बराही होतो. या व्याधीचं निदान झाल्यानंतर रुग्णाने पोषक आहार घेणं गरजेचं असतं. आहारातल्या पोषक घटकांचा दर्जा वाढवणं, संतुलित आहार घेणं, वजन आणि दैनंदिन हालचालींनुसार आहाराचं प्रमाण ठरवणं या बाबींकडे लक्ष दिल्यास हा विकार नियंत्रणात राहू शकतो. कर्बोदक, प्रथिनं आणि फॅट्स यांचं आहारातलं गुणोत्तर ५:२:१ इतकं असणं गरजेचं असतं. एनएएफएलडीच्या नियंत्रणात आहाराची खूप मोठी भूमिका असते.

**दृष्टीक्षेप**

**कोणते बदल करावेत?**

गुंतागुंतीच्या कर्बोदकांचं प्रमाण वाढवायला हवं. धान्यं, भाज्या तसंच बीन्समध्ये गुंतागुंतीची कर्बोदकं असतात. तसंच ग्लायसेमिक इंडेक्स कमी असणाऱ्या पदार्थांचं सेवन करावं. तसंच दूध, साखरेसारख्या पदार्थांच्या सेवनावर मर्यादा आणायला हवी. या पदार्थांमध्ये साधारण कर्बोदकं असतात. आहारातल्या तेल आणि तुपाच्या प्रमाणाकडे विशेष लक्ष द्यायला हवं. तसंच संपृप्त चरबीयुक्त बटर, मायोनिज असे पदार्थ टाळायला हवेत. डाळी, लो फॅट दुग्धजन्य पदार्थ, अंड्याचा पांढरा भाग तसंच ओमेगा ३ युक्त मासे यांचा समावेश आहारात करायला हवा. आहारातल्या मिठाच्या प्रमाणावरही नियंत्रण ठेवायला हवं. गडद हिरव्या, लाल, नारिंगी आणि पिवळ्या रंगाच्या फळांचा तसंच भाज्यांचा समावेश करणंही गरजेचं आहे. यासोबतच आवळा, हळद, ॲव्हॉकॅडो, जवस, सूर्यफुलाच्या बिया आणि आक्रोड या घटकांचं प्रमाण वाढवता येईल. प्री आणि प्रो बायोटिक पदार्थांचं सेवन वाढवायला हवं. फॅटी लिव्हरमुळे हृदयाशी संबंधित आजार जडू शकतात. त्यामुळे एअरोबिक्स तसंच इतर प्रकारचे व्यायाम करून स्वत:ला तंदुरुस्त ठेवता येईल. किमान ३० मिनिटांचा सौम्य ते तीव्र स्वरुपाचा व्यायाम उपयोगी पडू शकतो. जलद चालणं, पोहणं, सायकल चालवणं हे व्यायाम या रुग्णांना खूप लाभदायी ठरू शकतात.

या पद्धतीने जीवनशैलीतल्या थोड्याफार बदलांमुळे तुम्ही फॅटी लिव्हरमुक्त आयुष्य जगू शकता.

## बाळासाठी तरी धूम्रपान टाळा

हल्ली प्रजननक्षम वयाच्या महिलांमध्ये धूम्रपानाचे प्रमाण वाढत चालले आहे. विशेषतः २५ ते ३५ या वयोगटातील महिलामध्ये ही समस्या आढळते. धूम्रपान प्रजनन क्षमतेवर परिणाम करते, गर्भधारणेच्या गुंतागुंतीची शक्यता वाढवते आणि गर्भाशयात तसेच जन्मानंतर बाळाच्या विकासातदेखील अडचणी निर्माण करते.

**निकोटीन आईच्या दुधात**

गरोदरपणात धूम्रपान केल्याने आई आणि बाळाचे आरोग्य धोक्यात येऊ शकते. सिगारेटमध्ये असलेली निकोटीन, कार्बन मोनोक्साइड आणि टारसारखी विषारी रसायने गर्भाला होणारा ऑक्सिजनचा पुरवठा कमी करतात. यामुळे गर्भाच्या वाढीत अडथळे येऊ शकतात, गर्भपात होऊ शकतो, अकाली जन्म होऊ शकतो किंवा मृत बाळ जन्माला येऊ शकते. यामुळे आईला गर्भनाळेसंबंधी समस्या (जिथे प्लेसेंटा खूप लवकर गर्भाशयातून वेगळे होते) होण्याचा धोकादेखील वाढतो. शिवाय निकोटीन गर्भाशयातील रक्तप्रवाहावरदेखील परिणाम करते. त्यामुळे गर्भाचा विकास मर्यादित होतो. निकोटीन आईच्या दुधात जाऊ शकते. त्यामुळे बाळाची झोप, आहारातील पोषकता आणि दीर्घकालीन न्यूरोडेव्हलपमेंटमध्येही व्यत्यय येऊ शकतो. इतकेच नव्हे तर धूम्रपान करणाऱ्यांना एक्टोपिक गर्भधारणा होण्याची आणि प्रसूती आणि प्रसूतीदरम्यान समस्या येण्याची शक्यता अधिक असते. 'इन व्हिट्रो फर्टिलायझेशन' (आयव्हीएफ) सारख्या प्रजनन उपचार घेणाऱ्या महिलांनी धूम्रपान केल्यास त्यांच्या यशाचे प्रमाण कमी होते.

**जाणून घ्या**

**डॉ. मेघा दळे**



**धूम्रपानाचा बाळावर कसा परिणाम होतो?**

धूम्रपान करणाऱ्या मातांच्या पोटी जन्मलेल्या बाळांचे वजन कमी असण्याची शक्यता जास्त असते. त्यामुळे भविष्यात त्या बाळाला आरोग्याच्या विविध समस्या उद्‌भवू शकतात. अशा बाळाला 'सडन इन्फंट डेथ सिंड्रोम' (एसआयडीएस), श्वसनमार्गातील संसर्ग, दमा आणि वर्तणुकीशी संबंधित समस्यांचा धोकादेखील जास्त असतो. गर्भधारणेदरम्यान धूम्रपान केल्याने बाळाच्या मेंदूच्या विकासावरही परिणाम होऊ शकतो आणि विकासात्मक अडचणींचा धोका वाढतो. गर्भधारणेदरम्यान धूम्रपान केल्याने एपिजेनेटिक बदलांद्वारे बाळाच्या डीएनएमध्येदेखील बदल होतो. त्यामुळे लठ्ठपणा, मधुमेह आणि हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी समस्या यांसारख्या विकारांचा धोका वाढतो.

**बाळाच्या मेंदूच्या विकासावर परिणाम**

गर्भधारणेदरम्यान धूम्रपान केल्यास बाळाला पहिला श्वास घेण्यापूर्वीच हानिकारक विषारी पदार्थांचा सामना करावा लागतो. धूम्रपान बाळाच्या मेंदूच्या विकासावर, फुफ्फुसांच्या कार्यावर आणि दीर्घकालीन आरोग्यावरही परिणाम करू शकते. धूम्रपान सोडणे हे आई आणि बाळ अशा दोघांचेही जीवन सुरक्षित ठेवते. महिलांनी गर्भधारणेदरम्यान निरोगी राहण्याची सवय केली पाहिजे. गर्भवती महिलांनी यशस्वी गर्भधारणा आणि प्रसूतीसाठी डॉक्टरांनी दिलेल्या सल्ल्याचे पालन केले पाहिजे.

## संधीवाताने वात आणलाय?

संधीवात म्हणजे एका किंवा अनेक सांध्यांमध्ये होणाऱ्या वेदना. ही एक चिवट व्याधी असून रुग्णाला मोठ्या कालावधीसाठी तिचा सामना करावा लागतो. अस्वस्थता, सांध्यांचा कडकपणा आणि मर्यादित हालचाली ही या व्याधीची वैशिष्ट्ये आहेत. संधीवात एखाद्याच्या हालचालींवर आणि जीवनाच्या गुणवत्तेवर परिणाम करतो. संधीवाताचे विविध प्रकार आहेत. ऑस्टियोआर्थायटिस हा प्रकार सांध्यांची झीज झाल्यामुळे होतो.

**संधीवात हा एक 'ऑटोइम्युन'** प्रकारातला विकार आहे. हवामानातील बदलांमुळे संधीवाताच्या रुग्णांची लक्षणे वाढतात. अनेकांना उबदार, कोरड्या हवामानापेक्षा थंडीत तसेच पावसाळ्यात जास्त वेदना जाणवू शकतात.

**इकडे लक्ष द्या**

नियमित शारीरिक हालचाली केल्याने लवचिकता वाढते. स्नायू बळकट होतात आणि संधीवाताचा त्रास कमी होऊ शकतो. पोहणे किंवा सायकलिंगसारखे हलके व्यायाम करा आणि व्यायाम करण्यापूर्वी पुरेसे 'वॉर्म अप' करत आहात याची खात्री करा. सांध्यांवर दाब येईल अशा क्रिया करणे टाळा. दररोज स्ट्रेचिंग करायला विसरू नका. कोणतीही फिटनेस दिनचर्या सुरू करण्यापूर्वी तज्ज्ञांचा सल्ला घेणे गरजेचे आहे. बाहेरचे हवामान थंड असताना शक्यतो बाहेर फिरणे टाळा. गुडघ्यांमध्ये संधीवात असल्यास खाली बसणे, मांडी घालून बसणे किंवा पायऱ्या चढणे टाळा.



**व्याधीविकार**

**डॉ. अंजिक्य बोऱ्हाडे**

**हे सोपे उपाय**

स्नायूंमध्ये उबदारपणा राखण्यासाठी आणि स्नायूंमधील कडकपणा टाळण्यासाठी संपूर्ण शरीर झाकले जाईल असे कपडे घाला. खूप थंड वातावरण असल्यास थर्मल कपड्यांचा वापर करा. थंडीच्या दिवसात थंडीपासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी हातमोजे, कान झाकण्यासाठी टोपी आणि पायात मोजे घाला. वेदना कमी करण्यासाठी आणि स्नायूंचा कडकपणा कमी करण्यासाठी शरीर उबदार राखणारे पर्याय निवडा. स्नायूंमधील रक्त प्रवाह सुधारण्यासाठी हीटिंग पॅड, टॉवेल थेरेपी वापरणे किंवा गरम पाण्याने आंघोळ करणे योग्य राहील.

वजनावर नियंत्रण आणि भरपूर पाणी

जास्त वजन सांध्यांवर अतिरिक्त दबाव टाकते. त्यामुळे संधीवाताची लक्षणे वाढण्याची शक्यता असते. वजन नियंत्रित राखल्यास ताणातून काही प्रमाणात आराम मिळतो. अस्वस्थता कमी होते. निरोगी तसेच आनंदी राहू शकता. पुरेसे पाणी प्यायल्याने सांध्यांना पुरेसे वंगण मिळेल आणि सांध्यातील सूज कमी होऊ शकते. सांध्याचे आरोग्य चांगले राखण्यासाठी दररोज किमान १२-१५ ग्लास पाणी प्यावे.

आहाराकडे लक्ष द्या

संधीवात असलेल्यांनी साखर, रिफाइंड आणि प्रक्रिया केलेल्या पदार्थांचे सेवन टाळावे. मासे, जवस, अक्रोड, बेरी आणि अँटिऑक्सिडंट्सयुक्त पालेभाज्या यासारखे ओमेगा-३ फॅटी ॲसिडयुक्त पदार्थ खावेत. तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार व्हिटॅमिन डी सप्लिमेंट्स घ्यावेत.

## कोणतं पेय ठरतं योग्य?

आयुर्वेदाने वात, पित्त आणि कफ असे त्रिदोष सांगितले आहेत. निरोगी रहाण्यासाठी या तीन दोषांचं संतुलन राखणं गरजेचं असतं. आयुर्वेदिक उपचारांमध्ये तज्ज्ञमंडळी तुमचा दोष ओळखून त्यानुसार उपायोजना करतात. दोषानुसार आहार, व्यायाम सुचवले जातात. आपल्या आहाराचा आणि या दोषांचा जवळचा संबंध आहे. आपण विविध प्रकारची पेयं पितो. आयुर्वेदानुसार शरीरातले दोष आणि पेयं यांचा खूप जवळचा संबंध आहे. म्हणूनच कोणती पेयं प्यायला हवीत याबाबतचं हे मार्गदर्शन...

* वात दोषामुळे शरीर कोरडं पडत असल्यामुळे हा दोष असणाऱ्यांनी जास्तीत जास्त द्रव पदार्थांचं सेवन करायला हवं. फळं, भाज्या तसंच इतर द्रवपदार्थांचं सेवन करून तुम्ही पाण्याची गरज भागवू शकता. वात दोष असणारे लोक बारीक असतात. हे लोक उत्साही आणि कल्पकही असतात. त्यांना आरोग्य राखण्यासाठी हर्बल चहा, दूध, फळं आणि भाज्यांचे रस यांचं सेवन करता येईल. ब्लॅक टी, ग्रीन टी, कॉफी, कॅफेनयुक्त पेयं, फसफसणारी पेयं यांचं सेवन मात्र टाळावं.

* पित्त दोषामध्ये मध्यम प्रमाणात पाणी प्यावं लागतं. पित्त दोष असणाऱ्यांना खूप थंडी वाजते. हे लोक मध्यम बांध्याचे असतात. त्यांच्या चेहऱ्यावर मुरुमांचं प्रमाणही अधिक असतं. या लोकांनी नारळाचं पाणी, हिरव्या भाज्यांचे रस, गोड फळांचे रस तसंच जास्वंद, लवेंडर, गुलाब तसंच जास्मिन फ्लेवरचे हर्बल टीही पिता येईल. बीयर, वाईन तसंच आंबट फळांचे सर मात्र टाळावेत.



**आयुर्वेद आणि विकार**

* कफ दोष असणाऱ्यांना पाणी कमी प्रमाणात प्यायलं तरी चांगतं.

## मलेरियाचा हृदयावर आणि रक्तवाहिन्यांवरही परिणाम

मलेरिया केवळ ताप येणारा आजार नसून तो हृदयावर आणि रक्तवाहिन्यांवरही परिणाम करू शकतो. मलेरिया हा एक गंभीर आजार आहे. तो प्रामुख्याने प्लाझमोडियम परजीवींमुळे होतो. तो अनेकदा संक्रमित ॲनोफिलीस डास चावल्यामुळे पसरतो. उष्णकटिबंधीय प्रदेशात मलेरिया मोठ्या प्रमाणात पसरण्याची शक्यता असते. मलेरिया असलेल्यांना तीव्र ताप, घाम येणे, थंडी वाजणे, डोकेदुखी, मळमळ आणि पुरेशी विश्रांती घेतल्यानंतरही खूप थकवा जाणवणे अशी **लक्षणे दिसून येतात.**



**आराग्यचर्चा**

**डॉ. कुंदन गायकवाड**

**मलेरियाची लक्षणे**

मलेरियामुळे गंभीर गुंतागुंत होऊ शकते. उपचार न केल्यास ते घातक ठरू शकते. गंभीर प्रकरणांमध्ये हा संसर्ग शरीरात वेगाने पसरतो आणि यकृत, मेंदू आणि मूत्रपिंडांसारख्या महत्त्वाच्या अवयवांना नुकसान पोहोचवू शकतो. या विशिष्ट संसर्गामुळे जळजळ होऊ शकते. सामान्य रक्ताभिसरणात व्यत्यय येऊ शकतो आणि हृदय आणि रक्तवाहिन्यांवर ताण येऊ शकतो. हृदयरोग, उच्च रक्तदाब किंवा अशक्तपणा असलेल्या व्यक्तींना याबाबत विशेष सावधगिरी बाळगली पाहिजे कारण त्यांना मलेरियामुळे हृदयाशी संबंधित गुंतागुंत होण्याचा धोका अधिक असतो.

**कसा होतो परिणाम?**

हृदयावर आणि रक्तवाहिन्यांवर मलेरियासारख्या आजाराने गंभीर परिणाम होऊ शकतो. यामुळे गंभीर गुंतागुंतदेखील निर्माण होऊ शकते आणि ती रुग्ण बरे झाल्यानंतरही काही काळ टिकून राहू शकते. यामुळे रक्ताच्या गुठळ्या तयार होण्याचा धोका वाढू शकतो.

## कारणं स्नायूदुखीची

अतिताण हे स्नायूंमधल्या वेदनांचं कारण असू शकतं यावर कदाचित आपला विश्वास बसणार नाही. ताणतणावाचा संबंध मानसिक आरोग्याशी जोडला जातो. पण याच ताणामुळे स्नायूंचं दुखणं उद्‌भवू शकतं. स्ट्रेस हार्मोन्समुळे शरीर व्याधींचा मुकाबला करू शकत नाही. तणावाखाली असणाऱ्या माणसांची दमछाक होते. तसंच दाहामुळे त्यांच्या स्नायूंमध्ये वेदना जाणवू शकतात. त्यामुळे खूप ताण आल्यावर अंग दुखू लागतं. पाण्याची कमतरता हे सुद्धा स्नायूंच्या दुखण्याचं महत्त्वाचं कारण म्हणता येईल. पाणी हा शरीराला अत्यंत आवश्यक असणारा घटक आहे. त्यामुळे पाण्याची कमतरता तुमचं आरोग्य बिघडवू शकते. पाण्याच्या कमतरतेमुळे डोकेदुखी, थकवा तसंच इतर समस्या जाणवू शकतात. शरीराला आपलं कार्य सुरू ठेवण्यासाठी विविध पोषक घटकांची आवश्यकता असते. या पोषक घटकांमुळे आपला मेंदू तल्लख होतो. हाडं बळकट होतात आणि शरीर निरोगी रहातं. एखाद्या पोषक घटकाच्या कमतरतेमुळे स्नायूंमध्ये वेदना जाणवू शकतात.



**आरोग्यवेध**

---

**नवसंशोधन**

### अतिझोप ठरते घातक!

पुरेशी झोप घेणं किती गरजेचं आहे हे आपण जाणतो. पण जास्तीची झोपही घातक ठरू शकते. नऊ तासांपेक्षा अधिक झोप घेतल्यास पक्षाघाताचा धोका जवळपास २३ टक्क्यांनी वाढत असल्याचं एका संशोधनातून समोर आलं आहे. सात तास किंवा आठ तासांपेक्षा कमी झोप घेणाऱ्यांच्या तुलनेत नऊ तासांपेक्षा अधिक झोप घेणाऱ्यांना पक्षाघात होण्याची शक्यता अधिक असल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. इतकंच नाही तर दुपारच्या वेळी अधिक झोप घेतल्यानेही त्रास होऊ शकतो. दुपारच्या वेळी ९० मिनिटांपेक्षा अधिक झोप घेणाऱ्यांनाही पक्षाघात होण्याची शक्यता २५ टक्क्यांनी वाढत असल्याचं हे संशोधन सांगतं. 'न्यूरोलॉजी' या जर्नलमध्ये हे संशोधन प्रसिद्ध झालं आहे. त्यामुळे झोप प्रमाणातच घेणं योग्य ठरतं.



**काळजी डोळ्यांची**

### का सुजतात डोळे?

पुरेशी झोप घेतल्यानंतरही अनेकदा आपले डोळे सुजल्यासारखे, थकल्यासारखे दिसतात. यामागे बरीच कारणं असतात. ॲलर्जी किंवा जंतूसंसर्गामुळे डोळे सुजल्यासारखे दिसू शकतात. प्रदूषित कण किंवा कुत्रा-मांजरासारख्या पाळीव प्राण्यांचे केस डोळ्यात गेल्यामुळे ॲलर्जी होऊ शकते आणि यामुळे शांत झोप घेतल्यानंतरही डोळे सुजल्यासारखे दिसतात. पाण्याच्या कमरतेमुळेही डोळे सुजल्यासारखे वाटतात. आपल्या डोळ्यांलगतची त्वचा खूप नाजूक असते आणि पाण्याच्या कमतरतेमुळे ती कोरडी पडून सुजल्यासारखी वाटते.



**जपणूक त्वचेची**




### 'बायोटिन'च्या सेवनाने...

त्वचेचं आरोग्य जपण्यासाठी विविध पोषक घटकांची गरज असते. या पोषक घटकांमुळे त्वचेशी संबंधित समस्या दूर होऊ शकतात. 'बायोटिन' नामक जीवनसत्त्व त्वचेसाठी खूप लाभादायी ठरतं. बायोटिन हा ब जीवनसत्त्व गटातला घटक आहे. बायोटिनला 'ब ७' असंही म्हटलं जातं. पालक, अंडी, मशरूम, बदाम, फ्लॉवर, चीझ, रताळं, शेंगदाणे, आक्रोड आणि दुग्धजन्य पदार्थांमध्ये ब ७ हे जीवनसत्त्व असतं. त्यामुळे यांचा समावेश आहारात करायला हवा.

**आजीबाईचा बटवा**

### आरोग्यदायी जर्दाळू

जर्दाळू अत्यंत पौष्टिक आहे. हिवाळ्यात जर्दाळूचं सेवन करायला हवं. यात तंतूमय पदार्थांचं प्रमाण बरंच जास्त असतं. त्यामुळे वजन कमी करण्यासाठी जर्दाळूचं सेवन करता येईल. यातल्या फायबरमुळे पोट बराच काळपर्यंत भरलेलं रहातं. पण जर्दाळूंचं सेवन प्रमाणातच करायला हवं. जर्दाळूमध्ये लोहही भरपूर प्रमाणात असतं. यामुळे शरीरातली लोहाची कमतरता यामुळे भरून निघते. जर्दाळूतले पोषक घटक त्वचेसाठीही लाभदायी ठरतात. यातल्या 'क' आणि 'ई' या जीवनसत्त्वांमुळे त्वचेला आवश्यक पोषण मिळतं. जर्दाळू डोळ्यांसाठीही लाभदायी आहे. तसंच यामुळे पचनसंस्थेचं कार्यही सुधारतं. तर अशा या जर्दाळूचा समावेश आहारात करायलाच हवा.



# १२ वर्षीय विराजमध्ये विशेष टॅलेंट

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :

तो गाणं गातो, स्टॅण्ड-अप कॉमेडी करतो, कविता करतो, उत्तम वक्ता आहे, अभ्यासातही हुशार आहे. विशेष म्हणजे इतरांना प्रेरणा देण्यासाठी ऑनलाईन सेशन्सही घेतो.

वय फक्त १२ वर्षे. कमालीची जिद्द आणि अफलातून इच्छाशक्तीच्या जोरावर विराजने दिव्यंगत्वावर मात करीत इतरांसाठी आदर्श निर्माण केला. विराजच्या या विशेष टॅलेंटचं केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरींनी कौतुक केले.

विराजने अलीकडेच त्याच्या आई (चैताली) आणि मोठ्या भावासोबत (शंतनू) गडकरी यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. विराजमध्ये असलेल्या अफलातून क्षमता बघून गडकरींनीही आश्चर्य व्यक्त केलं.

वाशीमच्या एका मध्यमवर्गीय कुटुंबात जन्माला आलेल्या विराजच्या वाट्याला जन्मापासूनच संघर्ष आला. त्याचा जन्म झाला तेव्हा त्याला काहीतरी दिव्यंगत्व असेल, अशी शंका आईला आली. पण डॉक्टरांनी त्यावर शिक्कामोर्तब केले नव्हते.

आईनं जिद्द सोडली नाही. त्यांनी दवाखाने पालथे घातले आणि विराजला



गडकरींकडून कौतुक

स्कोलियोसिस आणि हिप डिसलोकेशन असल्याचे निष्पन्न झाले. पाठीचा कणा वाकलेला असल्याने त्याला सरळ उभं राहण्याचा तर प्रश्न उद्भवणार होताच. शिवाय या त्रासामुळे त्याचे दोन्ही पाय समान नाहीत. त्यामुळे चालतानाही त्रास होणारच होता.

वयाच्या दुसऱ्या वर्षापासून तर बाराव्या वर्षापर्यंत त्याच्या वेगवेगळ्या तीन शस्त्रक्रिया झाल्यात. आज तो बेल्टच्या आधाराने सरळ उभा राहू शकतो आणि एका पायातील मोठ्या बुटाच्या आधाराने चालूही शकतो. या प्रवासात त्यांचे फॅमिली फिजिशियन आणि प्रसिद्ध बालरोगतज्ज्ञ डॉ. गिरीश चरडे यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले.

मात्र, विराजचे दिव्यंगत्व ही त्याची कहाणी नाही. तर या दिव्यंगत्वावर मात करून त्याने निर्माण केलेली स्वतःची ओळख विशेष ठरते. कविता वाचन-लेखन, स्टॅण्ड-अप कॉमेडी, वक्तृत्व, हस्तकला, गायन, जलतरण, बुद्धीबळ आदींमध्ये प्राविण्य सिद्ध करून त्याने अनके राष्ट्रीय - आंतरराष्ट्रीय पुरस्कारावर मोहर उमटवली आहे.

रामानुजम मॅथ्स कॉन्टेस्ट, आंतरराष्ट्रीय टॅलेंट सर्च, सायन्स ऑलिम्पियाड यासारख्या प्रतिष्ठीत स्पर्धांमध्ये विराजनं कमावलेलं यश त्याच्यातील टॅलेंट अधोरेखित करणारं ठरलं आहे.

दोन वर्षांपूर्वी विराजने लिहिलेले बियाँड डिसॲबिलिटी हे पुस्तक प्रकाशित झाले. त्यालाही अनेक पुरस्कार मिळाले. नॅशनल चाईल्डलाईन १०९८ बाबत जनजागृती करण्याचा विराजने विडा उचलला आहे. त्यासाठी तो समूपदेशन कार्यक्रम करतो.

सार्वजनिक ठिकाणी, शाळांमध्ये किंवा कुटुंबात देखील कुठल्याही प्रकारचा अन्याय होत असेल तर मुलं स्वतः या चाईल्डलाईनचा वापर करू शकतात, हे तो शाळा-शाळांमध्ये, स्वयंसेवी संस्थांमध्ये जाऊन सांगतो. त्याला चाईल्डलाईनचा ब्रॅण्ड-ॲम्बेसिडर करावे, अशी मागणी त्याच्या आई चैताली यांनी गडकरी यांच्याकडे केली आहे.

विराजचे लवकरच एक कवितेचे पुस्तकही प्रकाशित होणार आहे. त्याच्या एकूणच संघर्षमय प्रवासाचे आई आणि मोठा भाऊ सहप्रवासी आहेत. विराजच्या प्रत्येक पावलावर त्यांची साथ लाभते. अवघ्या बाराव्या वर्षी त्याने केलेली किमया त्याच्या घरी पुरस्कारांनी सजलेल्या कोपऱ्यावरून लक्षात येते. गडकरी यांनी विराजला यश प्राप्त करण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

### निवडणुकीची वाट बघत बसू नका...

# शेतकरी कर्जमाफीसाठी हीच योग्य वेळ

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :



राज्यातील शेतकऱ्यांवर सध्या असलेले खतांचे संकट, आर्थिक अडचणी आणि नैसर्गिक आपत्तींमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवरून माजी गृहमंत्री आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (शरद पवार गट) चे नेते अनिल देशमुख यांनी सरकारवर जोरदार टीका केली आहे.

अनिल देशमुख म्हणाले की, शेतकरी मोठ्या अडचणीत असून, हीच कर्जमाफीसाठी योग्य वेळ आहे. सरकारने निवडणुकीची वाट न पाहता तत्काळ निर्णय घ्यावा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याआधी योग्य वेळी कर्जमाफीचा निर्णय घेऊ असे विधान केले होते, त्यावर देशमुख यांनी ही प्रतिक्रिया दिली.

अनिल देशमुख म्हणाले की, राज्यात पेरण्यांचे काम सुरू असून, शेतकऱ्यांना रासायनिक खत, डीएपी आणि मिश्र खतांचा पुरवठा अपुरा पडत आहे. मागणीच्या तुलनेत फक्त 30 टक्केच डीएपी खत पुरवले जात आहे, अशी माहिती समोर आली आहे. परिणामी, शेतकरी मोठ्या संकटात आहे.

**जाहीरनाम्याची करुण दिली आठवण**

अनिल देशमुख म्हणाले की, देवेंद्र फडणवीस यांची योग्य वेळ ही नक्की कधी येणार? विधानसभा निवडणुकांच्या आधी आपल्या जाहीरनाम्यात आपण वचन दिलेले आहे. शेतकऱ्यांच्या कर्जमाफी संदर्भात आपण जाहीर भाषणे सुद्धा केली आहेत. पण आपले उपमुख्यमंत्री अजित पवार असे आश्वासन दिले नाही असे म्हणतात असे म्हणत शेतकरी कर्जमाफीच्या मुद्यावरुन निशाणा साधला आहे.

खतांच्या दरात वाढ झाल्याने आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना आणखी एक मोठे आव्हान समोर उभे आहे. यामुळे सरकारने तातडीने खताचा पुरवठा सुरळीत करावा, दर नियंत्रणात आणावेत आणि शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबत ठोस निर्णय घ्यावा, असेही ते म्हणाले.

**काही आमदार असमाधानी**

अनिल देशमुख म्हणाले की, शरद पवार यांना सोडणे ही आमची मजबुरी होती. काही ज्येष्ठ नेत्यांनी विपरीत परिस्थितीत निर्णय घेतल्याचे खाजगीत मान्य केले आहे. याच पार्श्वभूमीवर अजित पवार गटातील काही आमदार सत्तेत असूनही समाधानी नाहीत.

भास्कर जाधव आमच्या पक्षातील प्रदेशाध्यक्ष होते. ते शरद पवार यांची साथ सोडायला नको होती असे म्हणतात. शरद पवार यांची साथ ज्यांनी ज्यांनी सोडली, ते जेव्हा आम्हाला एकांतात भेटतात, तेव्हा ते सांगतात की आम्हाला साथ सोडायला लावली परिस्थिती तशी नसती तर आम्ही शरद पवारांची साथ सोडली नसती, अशी प्रतिक्रिया देशमुख यांनी जाधव यांच्या नाराजीविषयी बोलताना दिली.

## जून महिन्यात विक्रमी पाऊस

■ **नाशिक** : यंदाच्या जून महिन्यात नाशिक शहर आणि जिल्ह्यात झालेल्या जोरदार पावसाने गेल्या दहा वर्षांतील सर्व विक्रम मोडीत काढले असून, अवघ्या महिनाभरात तब्बल 439 मिमी पावसाची नोंद झाली आहे.

सलग कोसळणाऱ्या पावसामुळे जिल्ह्यातील धरणांमध्ये जलसाठा झपाट्याने वाढला असून, गंगापूरसह अनेक धरणांतून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. त्यामुळे गोदावरीला आठवडाभरात दुसऱ्यांदा पूर परिस्थिती निर्माण झाल्याचे पाहायला मिळाले. नाशिक शहरातील अनेक ऐतिहासिक मंदिरे आणि घाट पाण्याखाली गेली आहेत.

सध्या नाशिक व त्र्यंबकेश्वर परिसरात पावसाची संततधार सुरू असून, हवामान खात्याने पुढील काही दिवस पावसाचा जोर कायम राहील असा अंदाज आहे.

## प्रणय जनबंधू पहिल्याच प्रयत्नात फ्लाईंग ऑफिसर

■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. २४ :

आय.आय. टी. रुडकी येथून बी. टेक झालेला आणि बंगळुरू येथील खासगी कंपनीत कर्तव्यावर असलेल्या चंद्रपूरचा सुपूत्र प्रणय जितेंद्र जनबंधू याने एअर इंडियात फ्लाइंग ऑफिसर या पदासाठी पात्रता मिळवली आहे. प्रणय फ्लाइंग ऑफिसर झाल्याने त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

प्रणय जनबंधू याने आपल्या अथक परिश्रमाच्या जोरावर भारतीय वायुसेनेत स्थान मिळवले आहे. त्याची फ्लाइंग ऑफिसर या मानाच्या पदासाठी निवड झाली आहे. त्यांच्या रुपाने चंद्रपूरच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

प्रणय जनबंधू हा चंद्रपूर शहरातील पडोली परिसरातील साई रेसिडेन्सी येथील रहिवासी आहे. त्याचे वडील जितेंद्र जनबंधू आणि आई नीता जनबंधू हेही समाजसेवेत सक्रिय आहेत. प्रणय



याचे दहावीपर्यंतचे शिक्षण सेंट मेरी हायस्कूल दुर्गापूर येथे झाले. बारावीचे शिक्षण आयआयटी होम नागपूर येथून पूर्ण केले.

त्यानंतर त्याने आयआयटी रुडकी (उत्तराखंड) येथून मेकॅनिकल इंजिनिअरिंगमध्ये बी.टेकची पदवी प्राप्त केली. बंगळुरू येथील खासगी कंपनीत नोकरी करत असतानाच प्रणयने भारतीय वायुसेनेच्या एएफसीएटी (एअर फोर्स कॉमन ॲडमिशन टेस्ट) या अत्यंत स्पर्धात्मक परीक्षेची तयारी सुरू केली. पहिल्याच प्रयत्नात उल्लेखनीय यश संपादन केले.

एएफसीएटी परीक्षेत त्याने २ एएफएसबी मैसूर या निवड मंडळातून सहभागी होत ऑल इंडिया रँकिंगमध्ये एअर ७९ प्राप्त करत फ्लाइंग ऑफिसर या पदासाठी पात्रता मिळवली.

कोणतेही कोचिंग न घेता, केवळ स्वतःच्या प्रयत्नांच्या आणि चिकाटीच्या जोरावर मिळवलेले हे यश आहे. त्याच्या या यशाची दखल घेत सर्व स्तरातून त्याचे अभिनंदन केले जात आहे.

## प्रसिद्धीच्या भावनेतून राहुल गांधींचे फडणवीसांवर आरोप

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :

कॉंग्रेस नेते राहुल गांधी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विधानसभा मतदारसंघात अवघ्या पाच महिन्यांत तब्बल ८ टक्के मतदार वाढल्याचा आरोप करत भाजपवर निवडणूक प्रक्रिया बिघडवल्याचा ठपका ठेवला.

या आरोपांवर भाजपचे विधान परिषदेचे आमदार प्रसाद लाड यांनी जोरदार प्रत्युत्तर देत कॉंग्रेस आणि राहुल गांधींवर चांगलाच हल्ला चढवला. आरोपांमध्ये राहुल गांधींची वैफल्यग्रस्तता दिसते, अशी टीका प्रसाद लाड यांनी केली आहे.

राहुल गांधी आणि कॉंग्रेस जनतेची दिशाभूल करत आहेत. आरोप करणाऱ्यांना मनोरुग्ण रुग्णालयात नेले पाहिजे, असा टोलाही प्रसाद लाड यांनी राहुल गांधी यांना लगावला आहे.

: मुलखांवेगळी माणसं :

# मानवी शरीराचे अवयव ओळखण्याचा जागतिक विक्रम




लोकमानस

तामिळनाडूतील तंजावर येथील आद्रिका विवेक नावाच्या चिमुकलीने एका असाधारण कामगिरीत ३० सेकंदांच्या कालावधीत मानवी शरीराचे जास्तीत जास्त अवयव ओळखण्याचा विश्वविक्रम केला आहे.

ही उल्लेखनीय कामगिरी २४ ऑगस्ट २०२३ रोजी घडली, जेव्हा २ वर्षे, ४ महिने आणि २७ दिवसांच्या कोवळ्या वयात आद्रिकाने २२ मानवी शरीराचे अवयव ओळखले. या उत्कृष्ट कामगिरीला वर्ल्डवाइड बुक ऑफ रेकॉर्ड्सने मान्यता दिली आहे, ज्यामुळे इतिहासात आद्रिकाचे स्थान मजबूत झाले आहे.

यापूर्वी १ डिसेंबर २०२२ रोजी महाराष्ट्रातील पुणे येथे मानवी शरीराचे बहुतेक अवयव ओळखणारा सर्वात लहान मुलगा विरेनने १ वर्ष ९ महिन्यांच्या वयात १ मिनिट १६ सेकंदात २२ मानवी शरीराचे अवयव ओळखून जागतिक विक्रमांच्या पुस्तकात एक विक्रम नोंदवला आहे. त्यांनी १ वर्ष ९ महिन्यांच्या वयात १ मिनिट १६ सेकंदात २२ मानवी शरीराचे अवयव ओळखले आणि जागतिक रेकॉर्ड बुकमध्ये एक विक्रम नोंदवला.

ज्ञान आणि संज्ञानात्मक क्षमतेचे मंत्रमुग्ध करणारे प्रदर्शन करून आद्रिका विवेकची असाधारण प्रतिभा दाखवण्यात आली. अवघ्या ३० सेकंदात, आद्रिकाने मानवी शरीराच्या विविध अवयवांची सहज ओळख करून दिली, ज्यामुळे प्रेक्षकांना आश्चर्यचकित केले.

तपशीलांकडे पाहण्याच्या उल्लेखनीय नजरेने, तिने डोके, डोळे, नाक, तोंड, कान, हात, पाय, बोटे आणि पायाची बोटे अशा विविध शरीराच्या भागांची अचूक नावे दिली. इतक्या लहान वयात तिच्या असाधारण संज्ञानात्मक विकासातून तिची जन्मजात बुद्धिमत्ता आणि ज्ञानाची तहान दिसून आली.

३० सेकंदांच्या कमी कालावधीत सर्वाधिक मानवी शरीराचे अवयव ओळखून इतिहासात तिचे स्थान मजबूत करून, वर्ल्डवाइड बुक ऑफ रेकॉर्ड्सने आद्रिका विवेकच्या कामगिरीला योग्य मान्यता दिली आहे. हा अविश्वसनीय विक्रम मानवी कामगिरीच्या इतिहासात कायमचा कोरला जाईल. केवळ ३० सेकंदात मानवी शरीराचे जास्तीत जास्त अवयव ओळखण्याचा आद्रिका विवेकने मिळवलेला जागतिक विक्रम हा एक उल्लेखनीय पराक्रम आहे. तिच्या अपवादात्मक संज्ञानात्मक क्षमता आणि ज्ञानाची तहान तिला इतिहासाच्या इतिहासात घेऊन गेली आहे. ही कामगिरी पालक, शिक्षक आणि संपूर्ण समाजाला तरुण मनांच्या क्षमतेचे संगोपन आणि विकास करण्यासाठी प्रेरणा देणारी ठरते.

■ ■ ■

## डिफेंडरचे साहसवीरांना आवाहन

डिफेंडर एका नवीन प्रकारच्या स्पर्धेत उतरण्यासाठी साहसाची अविश्वसनीय भावना असलेल्या व्यक्तींचा शोध घेत आहे. नवीन डिफेंडर ट्रॉफी भूतकाळातील ट्रॉफी आणि चॅलेंज इव्हेंट्सपासून प्रेरित आहे. परंतु प्रशिक्षण आणि स्पर्धेच्या तीन कठीण फेऱ्यांमध्ये स्वतःचा वारसा निर्माण करेल.

केवळ अशक्य गोष्टींना स्वीकारणाऱ्या आणि जागतिक संवर्धनाची आवड असलेल्यांनाच अर्ज करता येणार आहे. डिफेंडर हा दशकांपासून शोधक आणि मोहीम नेत्यांच्या पसंतीच वाहन आहे आणि नवीन जागतिक उपक्रम ५० हून अधिक देशांमध्ये प्रवेशिका आमंत्रित करत आहे.

स्थानिक निवडी या उन्हाळ्यात सुरू होतील, पुढील वसंत ऋतूमध्ये राष्ट्रीय अंतिम फेरीत कोण पोहोचेल हे ठरवले जाईल. २०२६ मध्ये आफ्रिकेत डिफेंडर संवर्धन भागीदार टस्कसह आयोजित जागतिक अंतिम फेरीत कोण पोहोचेल याबद्दल जगभरात उत्सुकता आहे.

विजेत्यांना एका महाकाव्य मोहिमेसाठी एकत्र येण्याची संधी मिळेल जी डिफेंडर ट्रॉफी लोकांवर आणि त्याच्या भेटी असलेल्या ठिकाणी सकारात्मक आणि चिरस्थायी वारसा सोडेल याची खात्री करेल.

एका महाकाव्य मोहिमेला महाकाव्य वाहनाची आवश्यकता असते. नवीन डिफेंडर ११० ट्रॉफी एडिशन हा साहसी खेळ उत्साही लोकांच्या नवीन पिढीसाठी सादर करेल, कारण ही स्पर्धा जागतिक ऑनलाइन प्रेक्षकांद्वारे पाहिली जाईल. या कार्यक्रमाचा उत्साह रस्त्यावर आणत, ट्रॉफी एडिशन दोन खास वारसा-प्रेरित रंगांमध्ये डीप सँडग्लो यलो आणि केसविक ग्रीन विशेषतः निवडलेल्या साहस-तयार स्पेसिफिकेशनसह ऑर्डर करण्यासाठी उपलब्ध आहे.

■ ■ ■



: वाद संवाद :

## काळानुसार एसटी सेवेत परिवर्तन होणे आवश्यक आहे का?

**आनंद मराठे, जेष्ठ नागरिक**

होय बदलत्या काळानुसार महाराष्ट्रातील अगदी खेड्यापाड्यात दुर्गम भागात पोचणाऱ्या एसटी सेवेत बदल हा व्हायलाच हवा. एसटीचे सर्वांगाने अत्याधुनिकरण झाले तरच आर्थिक दृष्टिकोनातून डबघाईला आलेली एसटीची सेवा हि पुढे कायम सुरळीत ठेवता येण शक्य आहे. खाजगी प्रवासी वाहतूक सेवांच्या तुलनेत एसटी चे जुने स्वरूप म्हणजे भंगार आहे यात बदल केल्याशिवाय तरणोपाय नाही.

**जगदीश माळी, एसटी चालक**

एसटीची सेवा हि महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची सर्वात स्वस्त आणि दूरगामी सेवा आहे. मध्यंतरी दिवंगत अभिनेते विक्रम गोखले याना एसटी चे ब्रँड अँबेसेडर बनवून नवे बदल केले गेले. मात्र तरी देखील प्रवाशांची एसटीकडे पाठच आहे. एसटीचे खाजगीकरण केले गेले आणि अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज अशी वाहन जर आणली तर एसटीची सेवा हि वेगाने धावू शकेल असं वाटत. ■

संकलन - संयोजन
सुबोध रणशेवरे
९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# कोट्यवधी रुपयांची वाहने धुळखात




■ कमल नामपल्लीवार, नागपूर, दि. २४ :

सर्व्हेक्षण, खोदकाम आणि विकास कामांसाठी कोट्यवधी रूपये खर्चून साबांवि, जलसंधारण, भूगर्भ आणि इतर विभागांना महागडी वाहने पुरविली जात असली तरी, अशी अनेक वाहने धुळखात पडली आहेत.

नागपूरच्या जुन्या सचिवालय परिसरात अर्थात विभागीय आयुक्त कार्यालयाच्या प्रशस्त परिसरात असेच एक वाहन गेल्या दोन अडीच वर्षापासून पडलेले दिसून येते. आयशर कंपनीचे हे वाहन महाराष्ट्र शासनाच्या मेट्रोलॉजी विभागाचे आहे.



माहितीनुसार, या वाहनाची किंमत 6 ते 7 कोटी रूपये असून, हे वाहन सुमारे अडीच वर्षांपासून तिथे उभे आहे. याचाच अर्थ या वाहनाचा उपयोग होत नाही. पाणी आणि सूर्यप्रकाशापासून वाहनाचे संरक्षण करण्यासाठी, एका चहा विक्रेत्याने वाहनालाच गोणपाट बांधले आहे. त्याखाली लोक चहाचा आस्वाद घेताना दिसतात.

एकीकडे शे-पाचशे रुपयांचे वीजेचे किंवा पाण्याचे बिल भरले नाही तर पुरवठा खंडीत केला जातो. दुसरीकडे, अशी कोट्यवधी रूपयांची वाहने धूळखात पाडून ठेवली जात आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाचीही अशीच अनेक वाहने संबंधित विभागाच्या परिसरात भंगार होवून पडली आहेत.

## ॲड. प्रकाश आंबडेकरांच्या याचिकेवर आज निकाल

नियमबाह्य मतदानाचा आरोप

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :



राज्यातील विधानसभा निवडणुकीत झालेल्या नियमबाह्य मतदानाच्या आरोपांच्या याचिकेवर सुनावणी झाली. वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मतदानाची वेळ संपल्यानंतर 76 लाख लोकांना मतदान केल्याचा आरोप केला होता.

याबाबत त्यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. यावर आता 25 जूनला निकाल जाहीर होणार आहे.

आज मुंबई उच्च न्यायालयाने महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत संध्याकाळी 5 वाजल्यानंतर झालेल्या 76 लाख मतांच्या प्रकरणाची सुनावणी केली. उच्च न्यायालयाने दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतले आणि निकाल आज जाहीर करणार आहे.

## डॉ. मुरहरी केळे यांना मराठीत दुसरी पीएच.डी.

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :

ज्ञानसाधनेची कोणतीही सीमा नसते, हे पुन्हा एकदा सिद्ध करून दाखवले आहे संत साहित्याचे अभ्यासक, ऊर्जा क्षेत्रातील निष्णात आणि शिक्षणप्रेमी डॉ. मुरहरी केळे यांनी.



त्रिपुरा राज्य विद्युत मंडळाचे माजी अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक आणि महाराष्ट्र व मध्यप्रदेशात वीज क्षेत्रात संचालक म्हणून कार्यरत राहिलेल्या डॉ. केळे यांना नुकतीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने, छत्रपती संभाजीनगर येथे मराठी विषयात पीएच.डी. पदवी प्रदान केली आहे. विशेष म्हणजे, 'निवडक मराठी साहित्यातील विजेचे चित्रणः एक अभ्यास' या त्यांच्या आगळ्यावेगळ्या शोधप्रबंधाने मराठी साहित्यविश्वात एक नवे दालन उघडे केले आहे.

महावितरणच्या नागपूर शहर मंडलात 2008 ते 2011 या काळात अधीक्षक अभियंता म्हणून राहिलेल्या डॉ. केळे यांनी आपल्या संशोधनात गेल्या एक हजार वर्षातील निवडक काव्यात्मक, कथनात्मक आणि नाट्यात्मक साहित्याचा सखोल अभ्यास केला आहे.

'वीज' या संकल्पनेचा त्यांनी केवळ भौतिक अर्थाने नव्हे, तर सामाजिक, सांस्कृतिक, आध्यात्मिक, भावनिक आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून वेध घेतला आहे. वैदिक साहित्यापासून संत-पंत-तंत साहित्यापर्यंत, प्राचीन, अवार्चीन, आधुनिक आणि अत्याधुनिक साहित्यात विजेचे चित्रण कसे बदलत गेले, याचा मागोवा घेत त्यांनी अभ्यासपूर्ण निष्कर्ष काढले आहेत. त्यांच्या या हटके आणि मौलिक संशोधन कार्याचे मराठी साहित्य विश्वातून प्रचंड कौतुक होत आहे. या शोधनिबंधाने मराठी अभ्यासकांचे लक्ष एका पूर्णपणे नवीन आणि अनपेक्षित विषयाकडे वेधले आहे.

डॉ. मुरहरी केळे हे शिक्षणाचे आणि ज्ञानाचे भुकेले व्यक्तिमत्व आहे. विविध विद्यापीठांतून त्यांनी अभियांत्रिकी, व्यवस्थापन, कायदा, माहिती आणि तंत्रज्ञान, पत्रकारिता, ऊर्जा अंकेक्षण अशा विविध व्यावसायिक विषयांत तब्बल दहा पदव्या संपादन केल्या आहेत.

एवढ्यावरच न थांबता, त्यांनी नागपूर विद्यापीठातून 'पॉवर डीस्ट्रीब्यूशन फ्रान्चायसी' या विषयावर आपली पहिली पीएच.डी. पदवी मिळवली. तरीही मराठी भाषेवरील प्रेमापोटी त्यांनी मराठीत एम.ए. केले आणि आता दुसरी पीएच.डी. मिळवून आपल्या ज्ञानसाधनेची वेगळी उंची गाठली आहे.

डॉ. केळे यांच्या या दुहेरी यशाबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. तेलंगणाचे राज्यपाल आणि त्रिपुरा राज्याचे माजी उपमुख्यमंत्री जिष्णू देव वर्मा, विद्यापीठाचे कुलगुरू, उपकुलगुरू यांसह विविध साहित्यिक, प्राध्यापक, अभ्यासक, समाजबांधव आणि वीज क्षेत्रातील सहकाऱ्यांकडून त्यांना शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. मराठी साहित्यातील त्यांच्या या अमूल्य आणि अभिनव योगदानाची विशेष दखल घेतली जात आहे.

# महासागर
# नागपूर वृत्तसागर

■ बुधवार, दि. २५, जून २०२५ ■


## लूट प्रकरणात २ आरोपींना अटक

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :

गुन्हे शाखा युनिट 3 च्या पथकाने गोपनिय माहितीच्या आधारावर लकडगंज ठाण्यात नोंद लुटपाट प्रकरणातील दोन आरोपींना अटक केली. हिमांशू नामदेव चिंचुळकर (25) रा. ओमनगर, भरतवाडा रोड आणि फैजान अनवर शेख (24) रा. गंगाजमुना अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. आरोपींनी गंगाजमुना परिसरात चाकूचा धाक दाखवून दोन तरुणांना लुटले होते. फियार्दी रमेश विष्णू देवांगण (34) रा. कावरापेठ हे गत रविवारच्या रात्री 11.30 वाजताच्या सुमारास काम आटोपून मित्र सचिन राठोड याच्यासोबत कारने घरी जात होते. रस्त्यात दोघेही गंगाजमुना परिसरातील बालाजी मंदिरजवळ थांबले.

या दरम्यान दुचाकीस्वार वरील आरोपी तेथे आले. रमेश यांच्यावर गांजा विक्रीचा आरोप लावून पोलिसात तक्रार करण्याची धमकी दिली. त्यानंतर आरोपींनी चाकू काढला. मारण्याची धमकी देऊन रमेशजवळील 4,500 रुपये लुटून फरार झाले. रमेशच्या तक्रारीवरून लकडगंज पोलिसांनी गुन्हा नोंदविला होता.

या गुन्ह्याचा समांतर तपास गुन्हे शाखा युनिट 3 चे पथकही करीत होते. घटनास्थळाजवळील सीसीटीव्ही कॅमऱ्यांची फुटेज तपासली असता आरोपींचा सुगावा लागला. त्यानंतर सापळा रचून दोघांनाही ताब्यात घेतले. चौकशी आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली. पोलिसांनी आरोपींकडून गुन्ह्यात वापरलेली दुचाकी आणि रोख असा एकूण 1 लाख 6 हजार रुपयांचा माल जप्त केला. दोघांनाही पुढील कार्यवाहीसाठी मुद्देमालासह लकडगंज पोलिसांच्या स्वाधिन करण्यात आले.

## महिन्यातील प्रत्येक तिसरा व चौथ्या बुधवारी

### जिल्ह्यातील प्रत्येक गावात समाधान दिवस : जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :

उत्तम प्रशासनाच्या मानकामध्ये गावपातळीवरील तलाठी, ग्रामसेवक यांची कर्तव्य तत्परता ही अत्यंत महत्वाची असते. पाणंद रस्ते, फेरफार, पिककर्ज, संजय गांधी निराधार योजना व इतर निवडक योजना या सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनावर थेट परिणाम करणाऱ्या आहेत. या योजनांची अंमलबजावणी अधिक पारदर्शक व तत्पर झाल्यास नागरिकांच्या तक्रारी येणार नाहीत, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी केले.





जिल्ह्यातील मंडळ अधिकारी, तलाठी यांच्या कार्यशाळेत मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. जिल्हा नियोजन सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यशाळेस अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रविण महिरे, निवासी उपजिल्हाधिकारी अनुप खांडे, जिल्हा परिषद व महसूल विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

शेतकऱ्यांना पिककर्ज वेळेत मिळाले पाहिजे यासाठी शासन दक्ष आहे. ॲग्रीस्टॅक ही योजना पारदर्शकतेसाठी महत्वाची आहे. पाणंद रस्ते याबाबत वर्षोनिवर्ष सुरु असलेले वाद सामोपचाराने तत्काळ मार्गी निघू शकतात. या सर्व योजनांसाठी ग्रामीण भागात शासनाचे दूत म्हणून तलाठी व ग्रामसेवकाकडे पाहिले जाते. ही जबाबदारी अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने आता प्रत्येक महिन्यात तिसरा व चौथा बुधवार जिल्ह्यातील प्रत्येक गावासाठी समाधान दिवस म्हणून राबविण्यात येईल.

या दिवशी प्रत्येक गावांसाठी असलेल्या साजाच्या ठिकाणी तलाठी, ग्रामसेवक व गावपातळीवरील शासकीय कर्मचारी येणाऱ्या प्रत्येक नागरिकांच्या तक्रारीचे समाधान करतील. याचबरोबर जे शक्य होणारी कामे आहेत ती तत्काळ मार्गी लावतील, असे जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी स्पष्ट केले.

शासनातील प्रत्येक व्यक्तीने आपल्या कर्तव्याप्रती गंभीर असलेच पाहिजे. तलाठी ग्रामसेवक यांच्या गावपातळीवर उपस्थितीबाबत लवकरच एक परिपत्रक निर्गमित करण्यात येत असल्याचे ते म्हणाले. प्रधानमंत्री धरती आबा योजना, वनपट्टे यासारख्या आदिवासी विभागाच्या योजनांना अधिक गती देण्याचे त्यांनी सांगितले. या कार्यशाळेत समाधान दिवस, पाणंद रस्ते, अतिक्रमण मुक्त करणे, फेरफार अदालत व जीवंत सातबारा मोहीम, ॲग्रीस्टॅक, पिककर्ज याबाबत उपस्थित तलाठी यांना मार्गदर्शन करण्यात आले. तहसीलदार कल्याणकुमार डहाट, सचिन कुमावत, राजू रणवीर यांनी हे मार्गदर्शन केले.

## ओयो ग्रीन गेस्ट हाऊसवर धाड

### बाप-लेक चालवीत होते कुंटणखाना

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :

गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा पथकाने गोपनिय माहितीच्या आधारावर हुडकेश्वर पोलिस ठाण्यांतर्गत बेसा मार्गावरील ओयो ग्रीन गेस्ट हाऊसवर धाड टाकली. ओयो हॉटेलच्या आड एक गुन्हेगार मुलासोबत मिळून येथे कुंटणखाना चालवत होता. पोलिसांनी दोन पीडित महिलांची सुटका करून आरोपी बाप-लेकाला अटक केली. सचिन टुले (47) आणि प्रज्वल सचिन टुले (22) रा. दत्तधामनगर, बेसा रोड अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, सचिन टुले हा सराईत गुन्हेगार आहे. त्याच्याविरुद्ध खून व जिवे मारण्याच्या प्रयत्नासह गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे. तसेच दारूबंदी कायद्याअन्वयेही 18 गुन्हे दाखल आहेत. गुन्हेगार सुमित चिंतलवार याच्यावर हल्ला केला म्हणून त्याच्यावर 307चा गुन्हा दाखल आहे. गुंड संतोष आंबेकर याचा तो नंबरकारी आहे. मुलगा प्रज्वल टुले याच्याविरुद्धही 324 चा गुन्हा दाखल आहे. दोघेही बापलेक अवैध दारूच्या धंद्यात सक्रीय होते. मात्र 3 वर्षांपूर्वी त्यांनी हुडकेश्वर ठाण्यांतर्गत बेसा रोडवर दत्तधामनगरात ओयो ग्रीन गेस्टहाऊस नावाने हॉटेल सुरू केले. हॉटेलच्या आड आरोपी देह विक्रीचा व्यवसाय करीत होते. त्यासाठी त्यांनी गरीब, गरजू महिला आणि युवतींना आर्थिक प्रलोभन देऊन जाळ्यात अडकवले होते. दरम्यान गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक गजानन गुल्हाने यांना याबाबत माहिती मिळाली. हॉटेलवर धाड टाकण्याची योजना बनविण्यात आली. पंटरच्या माध्यमातून आरोपींशी संपर्क करण्यात आला. 3 हजारांत सौदा पक्का झाला. पंटरकडून इशारा मिळताच दबा धरून बसलेल्या पथकाने धाड मारली. यावेळी एक 50 वर्षांची महिला आणि एक 25 वर्षांची युवती सापडली. दोघांचीही सुटका करून समुपदेशन केंद्रात पाठविण्यात आले. पीडित महिला घटस्फोटित आहे, तर 25 वर्षीय युवती अतिशय गरीब आहे. आरोपींनी त्यांना पोट भरण्यासाठी हा मार्ग पत्करण्यास भाग पाडले.

घटनास्थळी प्रज्वल सापडला. पोलिसांनी प्रज्वलला अटक केली. त्यानंतर त्याचे वडील सचिनलाही अटक करण्यात आली. आरोपींच्या ताब्यातून 40 हजार रुपये किंमतीचे दोन मोबाईल, रोख 2,600 असा एकूण 42 हजार 600 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

आरोपी व पीडित यांची वैद्यकीय तपासणी करून पुढील तपासकामी जप्त मुद्देमालसह हुडकेश्वर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. पोलिसांनी आरोपींविरुद्ध कलम 143(2)(3) भारतीय न्याय संहिता सहकलम 3, 4, 5 पिटा ॲक्ट 1956 अंतर्गत गुन्हा दाखल केला.

## द ऑल इंडिया जेम्स अँड ज्वेलरी डोमेस्टिक कॉन्सिलची बैठक संपन्न

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :

नेक्स्टजेनचे अध्यक्ष राजेश रोकडे,संयोजक सय्यम मेहरा आणि माजी अध्यक्ष नितीन खंडेलवाल यांच्या मार्गदर्शनाखाली, द ऑल इंडिया जेम अँड ज्वेलरी डोमेस्टिक कौन्सिलच्या पुढाकाराने नेक्स्टजेनने २३ जून २०२५ रोजी नागपूरच्या सीपी क्लब येथे विदर्भातील तरुण ज्वेलर्सची एक गोलमेज बैठक आयोजित केली. या कार्यक्रमात नागपूर, अकोला, अमरावती आणि यवतमाळ यासारख्या शहरांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या २५ तरुण ज्वेलर्सनी सहभाग घेतला.



या गोलमेज बैठकीचे प्राथमिक उद्दिष्ट नागपूरमध्ये भारतातील सर्वात मोठे ज्वेलर्स युथ समिट आयोजित करणे, व्यापारात नैतिक व्यवसाय पद्धतींचा पूर्णपणे समावेश करणे, विकसित होत असलेले व्यवसाय परिदृश्य समजून घेणे आणि पारंपारिक पद्धतींना आधुनिक पद्धतींशी जुळवून घेणे, दागिन्यांच्या उत्पादनात अंतर्दृष्टी मिळविण्यासाठी औद्योगिक भेटींचे नियोजन करणे आणि आंतरराष्ट्रीय बी२बी दागिने प्रदर्शनांमध्ये तरुण भारतीय ज्वेलर्सचे प्रतिनिधित्व सक्षम करणे हे होते. या बैठकीत या विषयांवर सखोल चर्चा झाली, ज्यामध्ये सर्व उपस्थितांनी सक्रिय सहभाग घेतला आणि त्यांचे दृष्टिकोन शेअर केले आणि नवीन कल्पना सादर केल्या.

राऊंड टेबलमधील सहभागींमध्ये पारस रोकडे, हर्षल खंडेलवाल, वत्सल बांगरे, अंशुल हारदे, मोहित शेठ, विराज शेठ, अविश वस्तानी, हार्दिक पारेख, अक्षय अलीमचंदानी, हर्षल दरोडकर, यश लोंडे, श्रेयश वाजे, जल्पेश कातकोरीया, अय्यश कातकोरिया, व्ही.आणि प्रतीक सोनी. या व्यतिरिक्त, दक्षता समितीच्या संदर्भात जीजेसी ने मिळवलेल्या मोठ्या यशावरही बैठकीत प्रकाश टाकण्यात आला.

## निवडणुकीपूर्वी स्मार्ट मीटर लावणार नसल्याची घोषणा

## आता सर्वत्र याच मीटरची सक्ती

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :



विधानसभा निवडणुकीपूर्वी तत्कालीन ऊजामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सामान्य ग्राहकांकडे स्मार्ट मीटर लावणार नसल्याचे घोषित केले होते. परंतु, आता मार्च-२०२६ पर्यंत हे मीटर सर्व प्रकारच्या वीज ग्राहकांकडे लागतील, असे खुद्द महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी एका कार्यक्रमात सांगितले.

महावितरणने काही वर्षांपूर्वी राज्यात सर्वत्र स्मार्ट प्रीपेड मीटर लावण्याची घोषणा केली होती. त्यासाठीचे कंत्राटही अदानी व इतर खासगी कंपन्यांना दिले होते. परंतु, या निर्णयाला कडाडून विरोध झाला. वाढता विरोध बघता तत्कालीन ऊजामंत्री फडणवीस यांनी हे मीटर सामान्य ग्राहकांकडे लागणार नाहीत, असे विधानसभेत घोषित केले. तेच फडणवीस आता स्वतः मुख्यमंत्री असून त्यांच्याच काळात स्मार्ट मीटर लावण्याचा वेग वाढवण्यात आला आहे.

महावितरणच्या नुकत्याच मुंबईत झालेल्या वर्धापन दिन कार्यक्रमात कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनीच देशात स्मार्ट मीटर बसवण्याची सर्वाधिक गती महाराष्ट्राची असून रोज ४५ हजारांच्या जवळपास मीटर लावले जात असल्याचे सांगितले व सोबतच मार्च २०२६ पर्यंत सर्व ग्राहकांकडे मीटर लावण्याचे लक्ष्य असून सर्वांनी त्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहनही केले. राज्यात स्मार्ट प्रीपेड मीटरला पहिल्या दिवशीपासूनच विद्युत क्षेत्रातील विविध संघटना आणि ग्राहक संघटनांनी कडाडून विरोध केला आहे. आताही अधून-मधून या मीटर विरोधात राज्यातील विविध भागात आंदोलन होतांना दिसतात. या आंदोलनाच्या दबावताच विधानसभा निवडणुकीपूर्वी सत्ताधारी महायुती सरकारने हे मीटर घरगुती व सामान्य ग्राहकांकडे लावणार नसल्याची घोषणा केली होती. विधानसभा निवडणुकीपूर्वी देवेंद्र फडणवीस यांनी नागरिकांकडे स्मार्ट प्रीपेड मीटर लावणार नसल्याचे घोषित केले. परंतु निवडणुकीनंतर मुख्यमंत्री झाल्यावर कार्पोरेट कंपन्यांच्या फायद्यासाठी त्यांनी मीटर लावण्याचा सपाटा सुरू केला.

## सरकारी रेशनचा काळाबाजार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :

यशोधरानगर पोलिसांनी गोपनिय माहितीच्या आधारावर सरकारी रेशनचा काळाबाजार करणाऱ्या एका व्यक्तीच्या अड्ड्यावर धाड टाकली. झडतीदरम्यान त्याच्याकडून 10 लाख रुपये किंमतीचे धान्य जप्त केले. या प्रकरणी पोलिसांनी समशुद्दिन अंसारीविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.

संघर्षनगर परिसरात राहणाऱ्या समशुद्दिन याने त्याच्या घरी टिनाच्या शेडखाली मोठ्या प्रमाणात रेशनचे धान्य साठवून ठेवले असून ते तो अधिक किंमतीत बाजारात विक्री करीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. यशोधरानगर पोलिसांनी याबाबत अन्न पुरवठा अधिकारी शिल्पा गणपत दरेकर यांना माहिती दिली. अन्न पुरवठा विभागाचे पथक आणि पंचासह पोलिसांनी समशुद्दिनच्या गोदामावर धाड टाकली. झडतीदरम्यान तेथे 6 पोती गहू आणि 546 पोती तांदूळ मिळाले.

धान्याच्या खरेदी-विक्रीशी संबंधित कोणताही पुरावा किंवा पावती त्याच्याकडे नव्हती. चौकशीत समशुद्दिनने सांगितले की, तो घरो-घरी जाऊन सरकारी रेशन खरेदी करतो. नागरिक रेशन कार्डद्वारे महिन्याचे धान्य तर खरेदी करतात, मात्र नंतर काळाबाजार करणाऱ्यांना त्याची विक्री करतात. पोलिसांनी समशुद्दिनविरुद्ध जीवनावश्यक वस्तू अधिनियमांतर्गत गुन्हा नोंदविला आहे.

## गुंड रमेश देशमुख तडीपार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :

परिमंडळ क्र. 4 च्या पोलिस उपायुक्त रश्मिता राव यांनी इमामवाडा परिसरातील चर्चित गुंड रमेश सूर्यभान देशमुख (59) रा. सिरसपेठ, तेलीपुरा याला तडीपार केले आहे. रमेश हा सराईत गुन्हेगार असून त्याच्याविरुद्ध इमामवाडा पोलिस ठाण्यात मारहाणीसह विविध गंभीर गुन्हे नोंद आहेत. प्रतिबंधक कारवाई नंतरही तो गुन्हेगारी वृत्ती सोडायला तयार नव्हता. परिसरातील नागरिकांमध्ये त्याची दहशत निर्माण होत असल्याचे पाहून इमामवाडा पोलिसांनी त्याचा गुन्हेगारी रेकॉर्ड गोळा केला. उपायुक्त राव यांच्याकडे रेकॉर्डसह तडीपारीचा प्रस्तावही पाठवण्यात आला. रेकॉर्ड तपासून राव यांनी रमेशला दोन वर्षांसाठी नागपूर जिल्ह्यातून तडीपार केले. रमेशला वर्धा येथे राहणाऱ्या त्याच्या नातेवाईकाकडे सोडण्यात आले.

## भररस्त्यात तरुणीचा विनयभंग

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :

एका तरुणाने भररस्त्यात तरुणीशी गैरवर्तन करीत विनयभंग केला. इतकेच नाहीतर तिला मारहाण करून जिवे मारण्याची धमकी सुद्धा दिली. ही घटना लकडगंज पोलिस ठाण्यांतर्गत घडली. या प्रकरणी पोलिसांनी 26 वर्षीय पीडितेच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदवत आरोपी तरुणाला अटक केली आहे.

जितेंद्र उर्फ विक्की रमाशंकर चौधरी (30) असे अटकेतील तरुणाचे नाव आहे.

कामानिमित्त पीडितेची ओळख विक्कीशी झाली होती. ओळखीचे रुपांतर मैत्रीत झाले. विक्की पीडितेवर संशय घेऊ लागला. यावरून दोघांमध्ये वाद होत होते.

शेवटी कंटाळून पीडितेने त्याच्यापासून दुरावा करीत बोलचाल बंदी केली. यामुळे विक्की चिडला होता. सायंकाळी 7 वाजताच्या सुमारास पीडिता घरी जात होती. विक्कीने दुचाकीवरून तिचा पाठलाग केला. भररस्त्यात तिचा रस्ता अडवून बोलण्याचा प्रयत्न केला. पीडितेने त्याच्याकडे दुर्लक्ष केले आणि पुढे निघाली. यामुळे तो चांगलाच संतापला. तो पीडितेला नको ते बोलू लागला.

इतकेच नाहीतर त्याने पीडितेच्या कानशिलातही लगावली. त्याच्यापासून दुरावा केल्यास जिवे मारण्याची धमकी दिली. पीडितेने कुटुंबीयांना घटनेची माहिती दिली.

त्यानंतर लकडगंज पोलिसात विक्कीविरुद्ध तक्रार दाखल करण्यात आली. पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हा नोंदवून विक्कीला अटक केली.

## ईव्हीएमच्या माध्यमातून निवडणूक आयोगाने विश्वास गमावला : प्रफुल गुडदे पाटील

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :

महाराष्ट्र विधानसभा निवडणूकित मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दक्षिण पश्चिम मतदार संघाच्या मतदार यादीतील घोळाबद्दल प्रफुल्ल गुडधे (पाटील) यांनी पत्रकार परिषदेत आयोजन करण्यात आले होते.



त्यावेळी त्यांनी बोलतांना सांगितले की मतदार नोंदणीसाठी एकाच मोबाईल नंबर वरून ५० व्यक्तीचे कशी काय झाली. ज्या पद्धतीची आकडेवारी आणण्यामध्ये जो विलंब लावला आणि त्यामध्ये तफावत नाही आणि कुठलेही संशयास्पद नाही तर ती माहिती त्यांना उपलब्ध करून देण्यासाठी अडचण काय आहे.

४ डिसेंबरला अर्ज केला त्याचं उत्तर १५ एप्रिलला येते ते उत्तर देतात की आपला मॅटर न्यायप्रविष्ठ असल्यामुळे आम्हालाही माहिती उपलब्ध करून देता येत नाही. ३ जानेवारीपर्यंत ईलेक्शन कमिशन कुठलंही पत्राला उत्तर दिले नाही. त्यांची माहिती पुरवत नाही आणि डायरेक्ट १५ एप्रिलला उत्तर दिले तो पर्यंत राज्याच्या निवडणुकीच्या संदर्भामध्ये विविध मतप्रवाह येऊन राहिले आरोप प्रत्यारोप सुरू झाले होते. आणि एकंदरीत ही निवडणूक प्रक्रिया संशयास्पद आहे. माहिती उपलब्ध करून देऊ शकत नाही. त्यावेळेस मुख्यमंत्री ट्वीट करून सांगतात की पश्चिम नागपूर आणि उत्तर नागपूर मध्ये सुद्धा एवढ्याच प्रमाणामध्ये मतदानाची वाढ झाली.

मात्र तिच्या कॉंग्रेसचे उमेदवार विजयी झाले पण आम्ही जे प्रश्न विचारून राहिलो त्या प्रश्नाचे मात्र वाढवून आहे आमचा प्रश्न नाही इलेक्शन कमिशनला उत्तर द्यावे इलेक्शन कमिशनला मागतो उत्तर कोण देऊन राहिले आमचा प्रश्न दक्षिण पश्चिम विधानसभा मतदारसंघ नागपूर आणि उत्तर नागपूर आणि उत्तर नागपूरच्या मोठे षडयंत्र आपल्या विरोधात सुद्धा वाचल्यानंतरही आपण लोकशाही मूल्यांकना वर विश्वास ठेवत कॉंग्रेसच्या उमेदवारांना विजयी केलं.

दक्षिण पश्चिमचा उत्तर उत्तर नागपूरचं काहीतरी वेगळेपण करण्यासाठी जनतेच्या मनामध्ये तो विश्वास असला पाहिजे की आम्ही ईव्हीएम च्या माध्यमातून तो विश्वास निवडणूक आयोगाला गमावलेला आहे .विश्वास राहिले नाही की हे लोकशाही संरक्षित राहील हा विश्वासात जनतेच्या मनामध्ये नाही. अशी माहिती कॉंग्रेसचे प्रफुल गुंडदे पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली. त्यावेळी उपस्थित कॉंग्रेसचे पक्षाचे अतुल लोंढे उपस्थित होते.

## महावितरण कर्मचाऱ्याला मारहाण

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :

वीज बिलाची वसुली करण्यासाठी गेलेल्या महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्याला मारहाण केल्याप्रकरणी न्यायालयाने दोन भावंडांना दोषी ठरवून 15 हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. मोहम्मद जाकीर मोहम्मद हुसेन (44) आणि मोहम्मद इकबाल मोहम्मद हुसेन (47) रा. आशिर्वादनगर अशी दोषींची नावे आहेत. सक्करदरा पोलिसांनी 31 मार्च 2021 रोजी महावितरणचे लाईनमन विलास खेमराज निनावे (36) यांच्या तक्रारीवरून हुसेन भावंडांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला होता.

घटनेच्या दिवशी विलास व त्यांचे सहकारी थकित बिलाची वसुली करण्यासाठी आशिर्वादनगर परिसरात गेले होते. हुसेन बंधूंचेही बिल थकित होते. कारवाईला विरोध करीत हुसेन बंधूंनी विलास यांना शिविगाळ करून धमकावले. त्यांना मारहाण करीत पळवून लावले. विलास यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी शासकीय कामात अडथळा निर्माण करण्यासह विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला. तत्कालीन पोउपनि के.डी.पवार यांनी प्रकरणाचा तपास करून न्यायालयात आरोपपत्र दाखल केले.

सरकारी वकील मुकुंद कमलाकर आरोप सिद्ध करण्यात यशस्वी झाले. न्यायालयाने हुसेन बंधूंना शासकीय कामात अडथळा निर्माण केल्यासाठी दोषी ठरवून 15 हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. दंड भरला नाहीतर एक महिना कारावास भोगावा लागेल. पैरवी अधिकारी म्हणून पोहवा सुरेंद्र रौराळे यांनी अभियोजन पक्षाला सहकार्य केले.

## नियमित देखभाल व दुरुस्तीसाठी काही भागात आज वीज नाही

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :

शहरातील विविध भागांत आवश्यक देखभाल व दुरुस्ती आणि उच्चदाब वीजवाहिनीचे भूमिगत केबल जोडणी आणि रोहित्र उभारणीच्या कामासाठी बुधवार, २५ जून रोजी काही तासांसाठी वीजपुरवठा खंडित ठेवण्यात येणार आहे. नागरिकांना होणाऱ्या गैरसोयीबद्दल महावितरणने दिलगिरी व्यक्त केली असून, या काळात सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

नियमित देखभाल व दुरुस्तीच्या कामांमुळे कॉंग्रेसनगर विभागात सकाळी ८ ते ११ या वेळेत ११ केव्ही वायरलेस वीजवाहिनीवरील छत्रपती नगर परिसर, हनुमान मंदिर (वर्धा रोड), प्रगती कॉलनी, साहस क्रिकेट क्लब, अनुसया कॉम्प्लेक्स. सकाळी १० ते १२ या वेळेत ११ केव्ही इटर्निटी मॉल वीजवाहिनीवरील इटर्निटी मॉल, एनआयटी कॉम्प्लेक्स, महाराजबाग १ आणि २. सकाळी ८.३० ते ११.३० या वेळेत ११ केव्ही सुभाषनगर वीजवाहिनीवरील सुभाष नगर, शास्त्री लेआउट, हिंगणा रोड, नाईक लेआउट, नेल्को सोसायटी, विवेका हॉस्पिटल, कामगार कॉलनी, तुकडोजी नगर, पटेल लेआउट. सकाळी ८ ते ११ या वेळेत ११ केव्ही प्रसादनगर वीजवाहिनीवरील आनंद नगर, जयताळा बाजार चौक, राही सभागृह, प्रसादनगर, यशोदा नगर, टाकळी सिम, जलतरण सोसायटी, रेणुका सोसायटी. सकाळी ८ ते ११ या वेळेत ११ केव्ही कचोरे पाटील वीजवाहिनीवरील राजाराम नगर, चिखले लेआउट, खापरी नाका, ग्रीन लॉन, अण्णाभाऊ साठे नगर, राय एम्पलोरियल, पायनियर. सकाळी ८.३० ते ११.३० या वेळेत ११ केव्ही भवन्स वीजवाहिनीवरील सेक्टर ३४ व ३५.सकाळी ८.३० ते ११.३० या वेळेतः ११ केव्ही समाज मंदिर वीजवाहिनीवरील सेक्टर ३६ व ३७. सकाळी ८.३० ते ११.३० या वेळेत ११ केव्ही लंडन स्ट्रीट वीजवाहिनीवरील देवीप्रभा परिसर. सकाळी ८.३० ते ११.३० या वेळेत ११ केव्ही नवनिर्माण २ वीजवाहिनीवरील संभाजी चौक, पडोळे चौक, राधे मंगलम, नवनिर्माण समाज, आधुनिक समाज, चौधरी अपार्टमेंट. सकाळी ८.३० ते ११.३० या वेळेत ११ केव्ही खामला वीजवाहिनीवरील सिंधी कॉलनी, नेल्को सोसायटी, शांतिनिकेतन, प्रताप नगर, शिव नगर. सकाळी ८.३० ते ११.३० या वेळेत ११ केव्ही तेलंगखेडी वीजवाहिनीवरील तेलंगखेडी, मरारटोली, रामनगरचा काही भाग, अमरावती रोडचा काही भाग, रामनगर ते रविनगर रस्ता, राममंदिराच्या आजूबाजूचा परिसर या भागातील वीजपुरवठा गंद राहील

महाल विभागात सकाळी ९ ते दुपारी १ या वेळेत ११ केव्ही शेषनगर वाहिनीवरील शेष नगर, शक्ती माता नगर, डायमंड नगर, खरबी चौक.सकाळी ९ ते दुपारी १: या वेळेत ११ केव्ही बिग बाजार वाहिनीवरील गरोबा मैदान, छापु नगर, जगजीवन रामनगर, आंबेडकर गार्डन, बाबुळबन, सीए रोड. सकाळी ९ ते दुपारी १ या वेळेत ११ केव्ही इंडस्ट्रीयल वीजवाहिनीवरील देशपांडे लेआउट, डे टू डॅ, त्रिमूर्ती नगर, प्रजापती नगर, शैलेश नगर, कोहिनूर लॉन. सकाळी ९ ते दुपारी १ या वेळेत ११ केव्ही शारदा चौक वीजवाहिनीवरील जुना सुभेदार, शारदा चौक, ज्वार नगर, रघुजी नगर, चक्रधर नगर, अयोध्या नगर.सकाळी ८ ते १२ या वेळेत ११ केव्ही हुडकेश्वर अर्बन या वीजवाहिनीवरील हुडकेश्वर रोड, हुडकेश्वर, म्हाळगी नगर, सेनापती नगर, संजय गांधी नगर, बांते नगर, सन्मान नगर, भोळे नगर, अन्नपूर्णा नगर, वैष्णोदेवी नगर, कॉर्पोरेशन कॉलनी. सकाळी ८ ते दुपारी १२.३० या वेळेत ११ केव्ही ग्रेट नाग रोड वीजवाहिनीवरील करबला, आशीर्वाद टॉकीज, बैद्यनाथ चौक ते अशोक चौक, रजत संकुल २, चांदणी रोशनी. सकाळी ८ ते ११ या वेळेत सुभाष रोड वीजवाहिनीवरील गणेशपेठ, गांधी सागर तलाव परिसर, टिळक पुतळा परिसर, गाडीखाना परिसरात उच्चदाब वीजवाहिनीचे भूमिगत केबल जोडणी आणि रोहित्र उभारणीच्या कामासाठी विज पुरवठा बंद राहील.

गांधीबाग विभागात सकाळी ८ ते ११ या वेळेत ११ केव्ही एपीएमसी वीजवाहिनीवरील एपीएमसी औद्योगिक परिसर, भारत नगर या भागातील वीजपुरवठा बंद राहील.

# नागपूर समाज कल्याण विभागाची कार्यशाळा

■ महासागर प्रतिनिधी
नागपुर, दि. २४ :

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग नागपूर यांचे अध्यक्षतेखाली नागपूर विभागाअंतर्गत येणाऱ्या नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील सर्व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जि.प., जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन डॉ. बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेंशन सेंटर नागपूर




येथे करण्यात आले होते. कार्यशाळेत कार्यालयातील सर्व शाखेसंबंधीच्या कामकाजाविषयक मार्गदर्शन करण्यात आले. अर्चना सोलंकी, प्राध्यापिका वनामती नागपूर यांनी उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना वेतन पडताळणी विषयक सर्व मुद्द्यांवर योग्य अशी माहिती दिली, त्याचप्रमाणे डॉ. सिद्धार्थ गायकवाड, प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग नागपूर, डॉ. देवसूदन धारगावे, उपायुक्त तथा सदस्य, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती भंडारा, डॉ. मंगेश वानखडे, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, नागपूर, यांनी देखील कर्मचाऱ्यांनी कार्यालयातील कामकाज योग्य वेळेत कसे करता येईल व आपले कामकाज अचूक कसे पार पाडता येईल याविषयी मार्गदर्शन केले. सदर कार्यशाळेत सहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे, समाज कल्याण नागपूर, विनोद मोहतुरे, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण चंद्रपूर, आशा कवाडे, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण भंडारा, डॉ. सचिन मडावी, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण गडचिरोली, अंजली चिवंडे, संशोधन अधिकारी, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती भंडारा, अंकुश केदार, सहाय्यक आयुक्त, जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परीषद नागपूर तसेच नागपूर समाज कल्याण विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यशाळेचे प्रास्ताविक विनोद मोहतुरे, सहाय्यक आयुक्त, जिल्हा समाज कल्याण अधिकारी जि.प. नागपूर व जयश्री धवराळ, जनसंपर्क अधिकारी यांनी तर आभार आशा कवाडे, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण भंडारा यांनी केले.

# फेटरीत शिक्षण परिषद संपन्न

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २४ :

नागपूर तालुक्यातील फेटरी केंद्राच्या वतीने सावित्रीबाई फुले विद्यालयात नव्या शैक्षणिक सत्रातील शिक्षण परिषदेचे आयोजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी केंद्रप्रमुख पौर्णिमा येरपुलवार होत्या तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून माहूरझरी विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रकाश वसु , प्रमुख पाहूणे म्हणून फेटरी विद्यालयाचे मुख्याध्यापक दिलीप चरपे, सावित्रीबाई फुले विद्यालयाच्या मुख्याध्यापिका शोभा बाणाईत उपस्थित होते.

या शिक्षण परिषदेत शाळा पूर्वतयारी व प्रवेशोत्सव या विषयावर प्रकाश वसु यांनी मार्गदर्शन केले. तर दिलीप चरपे यांनी ५ मार्च २०२५ च्या शासन परिपत्रकानुसार कृती कार्यक्रमाचा आढावा घेत उपस्थित



शिक्षकांना आलेल्या अडचणी व उपाययोजना यावर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्ष पौर्णिमा येरपुलवार यांनी गुणवत्तापूर्ण शिक्षण व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देण्याचे आवाहन केले. आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून उपस्थित सर्व शिक्षकांनी सामूहिक योगा सत्रात सहभाग घेतला.

कार्यक्रमाचे संचालन शिक्षक राजेंद्र घोंगे यांनी , तर आभार स्वाती रडके यांनी मानले. परिषदेस फेटरी केंद्रातील सर्व मुख्याध्यापक व शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी अलका पाटील, सुषमा सावरकर, ऋतुजा माळोदे, सोनाली भड, साधना तिजारे, शशिकला धुर्वे, शुभांगी गोरे, संजय बानाईत, डी.सी. बानाईत, बेबी फुले, कांता लसूंते, रंजना वाघाडे यांनी सहकार्य केले.

# अतुल पाटील हत्याकांड प्रकरण फास्टट्रेक कोर्टात चालवण्याची मागणी

## मारेकराविरुद्ध कठोर कारवाई करुन परिवारांना न्याय द्या

■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. २४ :

खापरखेडा पोलीस स्टेशन अंतर्गत पिपळा डाकबंगला शिवारात शुक्रवार (दि.२०) जुन रोजी रात्री २:३० वाजता च्या दरम्यान ग्रामपंचायत सदस्य अतुल पाटील याची निर्घृण करण्यात आली होती. या घटनेने समाजात संतापाची लाट उसळल्याने श्री संताजी अखिल तेली समाज संघटन कन्हान शहर संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी कन्हान पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांचा मार्फत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देऊन अतुल पाटील हत्याकांड प्रकरण फास्टट्रेक कोर्टात चालवुन मारेकरा विरुद्ध कठोर कारवाई करुन परिवारांना न्याय देण्याची मागणी केली आहे.

तेली समाजाचा ३१ वर्षांचा युवक पिपळा डाकबंगला ग्रामपंचायत सदस्य अतुल पाटील यांची निर्घृण हत्या करण्यात आली. धारदार शस्त्राने २५ ते ३७ घाव मारुन धारदार चाकुचा तुकडा त्याच्या शरीरात असतांना सुद्धा त्याला क्रुरपणे मारण्यात आले. मानवतेला कलंकित



करणार असं कृत्य ज्या अपरांध्यानी केले अश्या मारेकरा विरुद्ध कठोर कारवाई करुन प्रकरण फास्टट्रेक कोर्टात चालवुन परिवारांना न्याय द्यावे.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या गुन्ह्याची तपासाची सुत्रे आपल्या हाती घेऊन गुन्ह्यातला मास्टरमाईंड विरुद्ध लवकरात लवकर कारवाई करून न्याय मिळवून द्यावा. ज्यामुळे अपराधी वृत्तीच्या लोकांवरती पोलीस प्रशासनाचा व सरकारचा वचक निर्माण होईल. अशी मागणी श्री संताजी अखिल तेली समाज संघटन कन्हान शहर च्या पदाधिकार्यांनी कन्हान पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांचा मार्फत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देऊन केली आहे .

यावेळी श्री संताजी अखिल तेली समाज संघटन नागपूर जिल्हा संर्पक प्रमुख सुर्यभान चकोले, कन्हान शहर अध्यक्ष सुनिल सरोदे, कार्याध्यक्ष ऋषभ बावनकर, उत्तमराव वाघमारे, जयंत कुंभलकर, विनोद किरपान, निर्णय कुंभलकर, भगवान लांजेवार, अमित मेघरे, विनोद आष्टणकर आदी उपस्थित होते.

# डब्ल्यूसीएलमध्ये पेन्शन अदालत आयोजित केली जाणार




■ महासागर प्रतिनिधी, नागपुर, दि. २४ :

वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेडच्या विविध क्षेत्रातील प्रलंबित कोळसा खाण भविष्य निर्वाह निधी आणि पेन्शन दाव्यांचे जलद पेमेंट/निपटारा करण्यासाठी कोळसा खाण भविष्य निर्वाह निधी कार्यालय, वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड आणि कामगार संघटनेच्या प्रतिनिधींनी एक अनोखा उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमांतर्गत जून-जुलै २०२५ मध्ये डब्ल्यूसीएलच्या विविध भागात "पेन्शन अदालत" आयोजित केली जाईल. या पेन्शन न्यायालयात डब्ल्यूसीएल, सीएमपीएफ कार्यालय आणि कामगार संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित राहतील. या त्रिपक्षीय बैठकीत सीएमपीएफ आणि पेन्शनचे प्रलंबित प्रकरणे निकाली काढली जातील. डब्ल्यूसीएलचे निवृत्त कर्मचारी पेन्शन न्यायालयात उपस्थित राहून त्यांची बाजू मांडू शकतात.

सीएमपीएफ कार्यालय धनवडने घेतलेल्या "प्रार्थना" या उपक्रमाच्या समन्वयाने हे पेन्शन न्यायालय आयोजित केले जात आहे. "प्रार्थना" या उपक्रमांतर्गत, कोळसा खाण भविष्य निर्वाह निधी दाव्यांच्या देयकासाठी त्वरित कार्यवाही केली जाईल आणि निवृत्त कर्मचाऱ्यांना विषयाशी संबंधित संपूर्ण माहिती मिळू शकेल. या उपक्रमामुळे दाव्यांचे निवारण निर्धारित वेळेत होईल.

# अवकाळी पावसाचा महावितरणला ९ कोटींचा फटका

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :

मे आणि जून महिन्यांत नागपूर जिल्ह्याला झोडपून काढणाऱ्या अवकाळी पावसाने महावितरणला तब्बल 9 कोटी 6 लाखांचा जबर फटका दिला आहे. वादळी वाऱ्यांसह आलेल्या पावसाने जिल्ह्याची वीज वितरण यंत्रणा अक्षरशः कोलमडून पडली होती. जागोजागी उन्मळून पडलेली झाडे, तुटलेल्या तारा आणि वाकलेले खांब, सखल भागात साचलेले पाणी यामुळे जनजीवन विस्कळीत झाले होते. मात्र, या कठीण परिस्थितीतही महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी अहोरात्र कष्ट करत वीजपुरवठा पूर्ववत करण्यात मोलाची कामगिरी बजावली आहे.

अवकाळी पावसामुळे नागपूर जिल्ह्यातील वीज वितरण यंत्रणेचे मोठे नुकसान झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आतापर्यंत ५६२ उच्चदाब आणि २,३४४ लघुदाब विद्युत खांबांचे नुकसान झाले आहे. याशिवाय, ३८.३३ किलोमीटर उच्चदाब उपरी वीज वाहिन्या आणि २०५.०१ किलोमीटर लांबीच्या लघुदाब वीज वाहिन्यांचेही मोठे नुकसान झाले आहे. जिल्ह्यातील ४ वितरण पेट्या आणि ९ वितरण पॉईंट्स कोसळले असून, १८५ वितरण रोहित्रांना (ट्रान्सफॉर्मर) हानी पोहोचली आहे. तसेच, ५ ठिकाणी सिंगल फेज वीज मीटर आणि २ उपकेंद्रांतील उपकरणांचेही नुकसान झाले आहे. एकूण १५० मीटर उच्चदाब आणि ८०



मीटर लघुदाब वाहिन्यांचेही प्रचंड नुकसान झाले असून, यामुळे महावितरणला अंदाजे ९ कोटी ६ लाखांवरचा आर्थिक फटका बसला आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे जिल्ह्याच्या अनेक भागांमध्ये वीजपुरवठा खंडित झाला होता. यामुळे केवळ सामान्य नागरिकच नव्हे, तर महावितरणच्या कर्मचाऱ्यांनाही मोठ्या मनस्तापाला सामोरे जावे लागले. कोसळलेली वितरण यंत्रणा पूर्ववत करण्यासाठी कर्मचाऱ्यांनी अहोरात्र परिश्रम घेतले. अंधारात अडकलेल्या गावांमध्ये आणि शहरांमध्ये वीज पोहोचवण्यासाठी त्यांनी पावसात आणि वादळातही न थांबता काम केले. त्यांच्या या अथक प्रयत्नांमुळेच अनेक ठिकाणी वीजपुरवठा सुरळीत करणे शक्य झाले. जिल्ह्यात झालेल्या या अवकाळी पावसाचा सर्वाधिक फटका मौदा विभागाला बसला आहे. या विभागात वीज यंत्रणेचे मोठे नुकसान झाले असून, दुरुस्ती कामांसाठी महावितरणला अतिरिक्त मनुष्यबळ आणि संसाधने लावावी लागली.

# सुशील झिंग्यावर लावला एमपीडीए

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :

पोलिस आयुक्त रवींद्रकुमार सिंगल यांनी शहरातील कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी पुन्हा एका सराईत गुंडावर एमपीडीए लावून त्याला तुरुंगात स्थानबद्ध केले. सुशील उर्फ झिंग्या विजय कांबळे (25) रा. सिद्धार्थ चौक, आंबेडकरनगर असे स्थानबद्ध करण्यात आलेल्या गुंडाचे नाव आहे.

झिंग्या अनेक वर्षांपासून गुन्हेगारीत सक्रीय आहे. त्याच्याविरुद्ध ठाण्यात मारहाण, चोरी, आर्म्स ॲक्ट, अंमली पदार्थांची विक्री आणि लोकांना जिवे मारण्याची धमकी देण्यासह गंभीर गुन्हे नोंद आहेत. त्याची लगाम कसण्यासाठी 2019 आणि 2024 मध्ये पोलिसांनी त्याच्यावर प्रतिबंधक कारवाईही केली होती. मात्र ही कारवाई प्रभावहिन ठरल्याने त्याला 2 वर्षांसाठी तडीपार करण्यात आले. त्यानंतरही झिंग्या गुन्हेगारीत सक्रीय होता. परिसरात त्याची दहशत निर्माण होताना पाहून वाडीचे ठाणेदार राजेश तटकरे यांनी गुन्हे शाखेच्या एमपीडीए सेलच्या माध्यमातून पोलिस आयुक्तांकडे प्रस्ताव पाठवला. पोलिस आयुक्तांनी या प्रस्तावाला मान्यता देत झिंग्याला एक वर्षासाठी छत्रपती संभाजीनगर मध्यवर्ती कारागृहात स्थानबद्ध करण्याचे आदेश दिले.

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या ४६ प्रकरणांची नोंद

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :

नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाद्वारे सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, 79 मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई केली जात आहे. (ता.24) मंगळवारी रोजी शोध पथकाने 46 प्रकरणांची नोंद करून 32,900/- रुपयाचा दंड वसूल केला. सार्वजनिक ठिकाणी, रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी थुंकणे (रु. 200/- दंड) या अंतर्गत 1 प्रकरणांची नोंद करून 200/- रुपयांची वसुली करण्यात आली.

हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. 400/- दंड) या अंतर्गत 26 प्रकरणांची नोंद करून 10,400/- रुपयांची वसुली करण्यात आली. व्यक्तीने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. 100/- दंड) या अंतर्गत 6 प्रकरणांची नोंद करून 600/- रुपयांची वसुली करण्यात आली. दुकानदाराने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. 400/- दंड) या अंतर्गत 8 प्रकरणांची नोंद करून 3,200/- रुपयांची वसुली करण्यात आली. वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत 8 प्रकरणांची नोंद करून 7,500/- रुपयांची वसुली करण्यात आली.

वर्कशॉप, गॅरेज व इतर दुरुस्तीचे व्यवसायिकांने रस्ता, फूटपाथ, मोकळी जागा, अशा ठिकाणी टाकणे या अंतर्गत 1 प्रकरणांची नोंद करून 1,000/- रुपयांची वसुली करण्यात आली.

# स्व. सदाशिवराव किंमतकर न.प. प्राथ. शाळेत प्रवेशोत्सव

■ महासागर प्रतिनिधी,
रामटेक, दि. २४ :

दि. २३ जून ला स्व. सदाशिवराव किंमतकर नगर परीषद प्राथमिक शाळेत सत्र २०२५ - २६ करीता प्रवेशोत्सवाचा कार्यक्रम घेण्यात आला.

बँड पथकाच्या माध्यमातून प्रभातफेरी काढण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प देवून स्माइली लावून, औक्षण करून मुलांना प्रवेशित करण्यात आले.

स्व. किंमतकर शाळेत सेल्फी पॉईंट तयार करण्यात आलेला होता. त्यामध्ये मुलांना सेल्फि घेण्याची घाई झालेली दिसून आली.

शाळेत आल्याचा एक वेगळाच



उत्साह दिसून येत होता. शेवटी आलुभात, गोड शिरा हा आहार शालेय पोषण आहार अंतर्गत शिजवून विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. प्रवेशोत्सवाच्या कार्यक्रमाला शाळेतील पालक, शाळा व्यवस्थापन समितीतील सदस्य उपस्थित होते. प्रवेशोत्सवाच्या यशस्वितेसाठी मुख्याध्यापिका अर्चना दिडशे, शिक्षक प्रशांत हुड, शोभा बोंडे, स्नेहा दिवटे, शिला देशमूख, मनिषा तुपट यांनी परिश्रम घेतले.

# प्रगती विद्यालयात शाळेचा पहिला दिवस साजरा




■ महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. २४ :

मानव सेवा प्रतिष्ठान संस्थेद्वारा संचालित प्रगती विद्यालय, शकुंतलाबाई देशमुख प्राथमिक विद्यालय, डॉक्टर दिलीप देशमुख उच्च माध्यमिक विद्यालय यांच्या सयुंक्त सहकार्याने शाळेचा पहिला दिवस विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ घेऊन साजरा करण्यात आला.

यावेळी संस्थेचे सचिव अतुल देशमुख, शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र घुलक्षे, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक जयंत गोतमारे , प्रमुख पाहूणे म्हणून माजी पं.स. उपसभापती रुपेश झाडे, डॉ. स्वप्निल टेंभेकर उपस्थित होते. सर्वप्रथम विद्यार्थ्यांवर पुष्पवृष्टी करून स्वागत करण्यात आले तसेच विद्यार्थ्यांना शालेय पाठ्यपुस्तके, वेलकम ग्रीटिंग कार्ड, पुष्प देण्यात आले. सोबतच सेल्फी विथ टीचर हा उपक्रम राबवण्यात आला. तसेच जनजागृती पर परिसरातून रॅली काढण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन अर्चना ढोले यांनी केले. आयोजनासाठी शिक्षक धनराज पारधी, गोहणे, पंजाब आडे, मंगेश ठाकरे, तुषार नाईक, बाते, अनिल पठाडे, प्रा.सतीश शरणागत, नागपुरे, पूरके, गायकवाड, नीलम हिरणवार, सारिका बाळबुधे, सुचिता कुहिटे, निशा राहंगडाले, वैष्णवी देशमुख, शिपाई अरुण मेश्राम, प्रदीप मडावी आदींनी सहकार्य केले.

# धापेवाड्यात राजकीय मतभेद विसरुन एकवटले ग्रा.पं.सदस्य



■ महासागर प्रतिनिधी,
कळमेश्वर, दि. २४ :

विदर्भाचे पंढरपूर म्हणून ओळख असलेल्या श्री क्षेत्र धापेवाडाच्या सर्वांगीण विकासासाठी ग्रामपंचायत स्तरावर एक महत्त्वपूर्ण आणि कौतुकास्पद निर्णय घेण्यात आला. स्थानिक ग्रामपंचायत सदस्यांवर असलेल्या तक्रारी दोन्ही गटांच्या सदस्यांनी एकमेकांच्या सहमतीने मागे घेतल्याने गावातील राजकीय व सामाजिक वातावरण पुन्हा सौहार्दपूर्ण झाले आहे. ग्रामविकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या या निर्णयासाठी सर्वांनी राजकीय मतभेद विसरून एकवटण्याचा आदर्श घातला आहे.

या सर्व प्रक्रियेमध्ये ग्रा.पं. धापेवाडा सरपंच मंगला राजेश शेटे, उपसरपंच मंगेश माले तसेच सदस्य चिंतामन रोहनकर, प्रवीण घायवट, अक्षय वानखेडे, प्रेमचंद इरपाची, रामचंद इरपाची, सविता भरबत, प्रीति बिंड, संगीता दुरुगवार, हर्षा झीलपे, नाजिया शेख, दिव्या वानखेडे, विशाखा इरपाची, सोनू बरवड़, शोभा कुंभरे यांनी समवेत निर्णय घेतला. या मतभेदाच्या निराकरणासाठी आणि समेटासाठी डॉ. मनोहर काळे ,रवि पवार, गोविंद शेटे, सुरेंद्र लोखंडे, सरफराज शेख, संजय बिंड, शहीद शेख, देवेंद्र मानकर, राजेश शेटे, संदीप भरबत, सुधीर बिंड, अविनाश पाटील, महेंद्र खाडसे यांच्यासह अनेक सहकाऱ्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. या समविचारी प्रयत्नामुळे गावाच्या विकासासाठीचा मार्ग मोकळा झाला असून गावकऱ्यांत समाधानाचे व सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे. उपस्थित सर्वांचे अभिनंदन करण्यात आले.

# दोन दिवसीय प्रशिक्षण शिबीराचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :

भारत सरकारच्या सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाच्या राष्ट्रीय सांख्यिकीय कार्यालय (क्षेत्र संचालन विभाग), प्रादेशिक कार्यालय, नागपूर यांच्यातर्फे दोन दिवसीय प्रादेशिक प्रशिक्षण शिबिराचे आयोजन दिनांक 23 जून 2025 रोजी करण्यात आले. हे शिबिर राष्ट्रीय सांख्यिकीय कार्यालय (क्षेत्र संचालन विभाग), केंद्रीय सरकार संकुल, ए-ब्लॉक, तिसरा मजला, सेमिनरी हिल्स, नागपूर येथे घेण्यात आले.

या कार्यक्रमाचे उद्घाटन श्रीनिवास उप्पला, उप-महानिदेशक, आंचलिक कार्यालय, नागपूर यांनी केले. या सर्वेक्षणाचा उद्देश असा आहे की, स्वतःच्या वापरासाठी (स्व-अकाऊंट) बांधकाम करणाऱ्या कुटुंबांकडून तसेच बांधकाम करणाऱ्या नोंदणीकृत नसलेल्या आस्थापनांकडून (अनिगमित आस्थापनांपासून) बांधकामा संदर्भातील माहिती गोळा करणे.



रंगा श्रीनिवासुलु, संचालक व नियंत्रण अधिकारी, राष्ट्रीय सांख्यिकीय कार्यालय (क्षे. सं. वि.), प्रादेशिक कार्यालय, नागपूर यांनी उद्घाटन भाषणात उपस्थित मान्यवरांचे व प्रशिक्षणार्थ्यांचे स्वागत केले. आपल्या भाषणात त्यांनी या सर्वेक्षणाचे महत्त्व विषद केले.

त्यांनी सांगितले की, या सर्वेक्षणाचे महत्त्व (सकल मूल्यवर्धन) आणि (सकल देशांतर्गत उत्पन्न) मोजण्यासाठी फार महत्त्वाचे आहे. त्यांनी प्रसारमाध्यमांना आवाहन केले की, अशा सर्वेक्षणांची जनतेमध्ये जनजागृती व्हावी म्हणून व्यापक प्रसिद्धी द्यावी, जेणेकरून योग्य व विश्वसनीय आकडेवारी संकलित करता येईल. श्रीनिवास उप्पला, उप-महानिदेशक, आंचलिक कार्यालय, नागपूर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, अनिगमित क्षेत्रातील आस्थापनांमध्ये व कुटुंबांमध्ये होणाऱ्या बांधकाम क्रियाकलापांचे आकडे अत्यंत महत्त्वाचे आहेत, कारण या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात आस्थापनांचा आणि कुटुंबांचा समावेश असतो आणि त्यांच्या सहकार्याची गरज आहे. हे सर्वेक्षण पायलट स्वरूपात राबवले जाईल आणि त्याद्वारे माहिती संकलित केली जाईल. त्यांनी सांगितले की, असमाविष्ट क्षेत्रातील उद्योजकांवरील (अरवरए) वार्षिक सर्वेक्षणाच्या आकडेवारीचे भारतीय अर्थव्यवस्थेत मोठे महत्त्व आहे. तसेच त्यांनी सांगितले की, आस्थापनांमध्ये व कुटुंबांमध्ये कार्यरत बांधकाम कामगारांचे योगदान दर्शविणे हे या सर्वेक्षणाचे मुख्य उद्दिष्ट आहे. त्यांनी स्पष्ट केले की, सर्वेक्षणाची गुणवत्ता खूप महत्त्वाची आहे आणि सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी प्रशिक्षण काळात संपूर्ण लक्ष केंद्रित करावे, जेणेकरून क्षेत्रीय कार्य करताना गुणवत्तापूर्ण माहिती संकलित होईल आणि त्याचे सकारात्मक परिणाम सर्वेक्षणाच्या शेवटी दिसून येतील.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्रीनिवास उप्पला, उप-महानिदेशक, आंचलिक कार्यालय, नागपूर होते आणि आयोजक रंगा श्रीनिवासुलु, संचालक व नियंत्रण अधिकारी, रा.सा.का. (क्षे.सं.वि.), प्रादेशिक कार्यालय, नागपूर होते. या वेळी व्यासपीठावर एल.एम. जाडेजा, संचालक, आंचलिक कार्यालय, नागपूर; निर्णय प्रताप सिंग, उप-संचालक, आंचलिक कार्यालय; ए.जी. वागडे, सहाय्यक संचालक, आंचलिक कार्यालय; व सुनील वैरागडे, सहाय्यक संचालक, प्रादेशिक कार्यालय हे देखील उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुशील मोहन, वरिष्ठ सांख्यिकी अधिकारी, राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय (क्षेत्र संचालन विभाग), प्रादेशिक कार्यालय, नागपूर यांनी केले व आभार प्रदर्शन दीपक साहू, वरिष्ठ सांख्यिकी अधिकारी, राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय (क्षेत्र संचालन विभाग), प्रादेशिक कार्यालय, नागपूर यांनी केले.

## जाहीर नोटीस

श्रीमती संगीता गुरु अहिकर (सा. शिक्षिका), श्रीमती संजिवनी गणेशराव वाटाणे (सा. शिक्षिका) संत वियोगी महाराज हिंदी प्राथमिक शाळा, भरतवाडा, नागपूर आपणास जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की संस्थेच्या सचिवांनी आपणास आपण शाळेत दिलेल्या पत्त्यावर स्पीड पोस्टद्वारा दि. ०१/०७/२०२४ पासून कोणती पूर्व सूचना न देता सतत गैरहजर असल्याबाबत नोटीस पाठविला परंतु दोन्ही वेळेस त्या नोटीस पोस्टाने परत आले.

आपणास जाहीर नोटीस द्वारे सूचित करण्यात येते की, आपण आपले म्हणणे नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसाच्या आत शाळेच्या कार्यालयात ठोस पुरावासह लेखी प्रत्यक्ष उपस्थित राहून सादर करावे.

अन्यथा आपले काहीही म्हणणे नाही असे समजून आपणास नोकरीतून कामे करण्यात येईल. त्यानंतर आपले काहीही एकूण घेतले जाणार नाही याची आपण नोंद घ्यावी.

अध्यक्ष /सचिव
ए. जे .जे बहुउद्देशीय संस्था, अमरावती

# डब्लूसीएलमध्ये ११४ ठिकाणी आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :




आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त, डब्लूसीएलने ११४ ठिकाणी योगाभ्यास करून योगाभ्यास साजरा केला. या कार्यक्रमात एकूण ७०७० कामगार, कंत्राटी कामगार आणि कामगारांवर अवलंबून असलेल्यांनी भाग घेतला. डब्लूसीएलच्या या भव्य प्रयत्नाचा उद्देश सामान्य जनतेमध्ये, प्रामुख्याने महाराष्ट्र आणि मध्य प्रदेश राज्यातील त्यांच्या कार्यक्षेत्रात, योगाबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि त्यांना निरोगी जीवनशैली स्वीकारण्यास प्रेरित करणे हा होता. योग दिनाच्या स्थळांमध्ये सर्व क्षेत्रे तसेच रामटेक मंदिर (वारसा स्थळ), भारताचे केंद्र - नागपूर झिरो माईल, सावनेर इको पार्क, पाठाखेडा येथील वैज्ञानिकदृष्ट्या बंद खाण पीके-२, विविध ग्रामपंचायती, शाळा, रुग्णालये, सामुदायिक इमारती, खाणकाम कार्यालये इत्यादींचा समावेश होता.

उमरेड परिसरातील छत्रपती शिवाजी स्टेडियम येथे आंतरराष्ट्रीय योग दिनाचा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून डब्ल्यू चे सीएम डी जे.पी. द्विवेदी उपस्थित होते. त्यांनी स्टेडियममध्ये ८०० हून अधिक सहभागींसोबत योगाभ्यास केला. योगाभ्यास सत्रानंतर, जनजागृतीसाठी डब्लू सी एल च्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर योगाभ्यासाचे व्हिडिओ अपलोड करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा त्यांनी सत्कार केला. त्यानंतर त्यांनी उपस्थित सहभागींना संबोधित केले.

आपल्या भाषणात, सीएम डी जे.पी. द्विवेदी यांनी योगाचे महत्त्व अधोरेखित केले आणि लोकांना त्यांच्या दैनंदिन दिनचर्येत ते अंगीकारण्यास प्रेरित केले. ते म्हणाले की निरोगी मन निरोगी शरीरात राहते. आपल्या भाषणात शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर भर देत, देशाच्या हितासाठी योगदान देण्यासाठी निरोगी राहणे आवश्यक आहे असे ते म्हणाले. योगाद्वारे आरोग्य राखताना उत्कृष्ट कोळसा खाणकामाचे समीकरण आणि याद्वारे देशाच्या विकास प्रवासात डब्लू सी एल चे योगदान स्पष्ट केले. त्यांनी सर्वांना आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

रामटेकचे खासदार श्याम कुमार बर्वे आणि उमरेडचे आमदार संजय मेश्राम यांनी कार्यक्रमात विशेष पाहुणे म्हणून भाषण केले आणि योगाच्या वापराबद्दल सविस्तरपणे सांगितले. उमरेडचे माजी आमदार राजू पारवे, संचालक तांत्रिक (संचालन) ए.के. सिंह, संचालक (वित्त) बिक्रम घोष, संचालक तांत्रिक (नियोजन आणि प्रकल्प) आनंदजी प्रसाद, संचालक (मानव संसाधन) डॉ. हेमंत शरद पांडे आणि मुख्य दक्षता अधिकारी अजय मधुकर म्हेत्रे हे या कार्यक्रमात विशेष उपस्थित होते.डब्लू सी एल सुकाणू समिती आणि कल्याण मंडळाचे सदस्य, झंकार महिला मंडळाच्या अध्यक्षा, उपाध्यक्ष आणि सदस्य, युनियन प्रतिनिधी, मुख्यालय आणि प्रदेशांचे महाव्यवस्थापक आणि विभाग प्रमुख कार्यक्रमात उपस्थित होते.

गेल्या काही महिन्यांत डब्लू सी एल मध्ये कोळसा कामगार आणि त्यांच्या अवलंबितांमध्ये योगाबद्दल जागरूकता वाढवण्याच्या उद्देशाने अनेक महत्त्वाचे उपक्रम हाती घेण्यात आले आहेत हे ज्ञात आहे. यामध्ये जागरूकता रॅली, बूट कॅम्प, विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांसाठी घोषवाक्य, प्रश्नमंजुषा आणि चित्रकला स्पर्धा, योग प्रशिक्षण, बॅनर आणि पोस्टर प्रदर्शन, पत्रके वितरण, योगाशी संबंधित विषयांवरील सत्रे, सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचा योग्य वापर, कर्मचाऱ्यांकडून त्यांच्या दैनंदिन दिनचर्येत योगाचा समावेश करण्याची शपथ घेणे इत्यादींचा समावेश आहे.

# ३.७० लाखांच्या मालावर हात साफ

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :

कुटुंब बाहेरगावी गेल्याची संधी साधून अज्ञात आरोपीने घरफोडी करीत 3 लाख 70 हजार रुपये किंमतीच्या मालावर हातसाफ केला. ही घटना यशोधरानगर पोलिस ठाण्यांतर्गत घडली. या प्रकरणी पोलिसांनी सुनील हरीशचंद्र गुप्ता (65) रा. विश्वभारती लेआऊट, मांजराच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

सुनील मुळचे उत्तरप्रदेशातील प्रयागराज येथील रहिवाशी आहेत. गत 10 जून रोजी सुनील घराला कुलूप लावून कुटुंबासह प्रयागराज येथे गेले होते. या दरम्यान अज्ञात आरोपीने मुख्य दाराचे कुलूप आणि कडीकोंडा तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. कपाटात ठेवलेले रोख 5 हजार, सोन्याचे दागिने आणि लॅपटॉप असा एकूण 3.70 लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरून नेला. शनिवारी रात्री गुप्त कुटुंब घरी परतले असता चोरी झाल्याचे समजले. घटनेची तक्रार पोलिसात करण्यात आली. पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# पर्यावरण प्रेमींनी सायकलने पार केले ६ दिवसात ७५० किमी अंतर

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. २४ :



दि. १४ जुन ला रामटेक च्या गांधी चौक येथुन पंढरपुरसाठी निघालेले पर्यावरण प्रेमी सायकलस्वार दि. २३ जुन सोमवार ला दुपारी २ वाजता दरम्यान रामटेक ला परतले. यावेळी शहरातील गांधी चौक येथे त्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.

पर्यावरण प्रेमी सायकलस्वार आषाढी निमित्त पंढरपूर वारीसाठी निघाले होते.यात संस्कृत विद्यापीठाचे सेवानिवृत्त प्राध्यापक कुलसचिव रामचंद्र जोशी, समर्थ शिक्षण मंडळाचे सचिव तथा सृष्टी सौंदर्य बहुउद्देशीय संस्था चे अध्यक्ष ऋषिकेश किंमतकर, किट्सचे प्रा. लक्ष्मीकांत तिबुडे,सारंग पंडे,राजेश बाकडे आणि १३ वर्षीय अभंग किंमतकर यांचा समावेश होता. निघतेवेळी त्यांना राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी पुष्पगुच्छ देवुन सायकलस्वारांचा प्रवास सुरू झाला. यावेळी त्यांनी ६ दिवसात ७५० किलोमिटरचा प्रवास करून पंढरपुर गाठले. सायकलवारीचे आयोजन टायगर ग्रुप ऑफ ॲडव्हेंचर नागपूर, क्रिडा भारती यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूर ते पंढरपूर सायकलस्वारी उपक्रमाचे चे आयोजन करण्यात आले होते.

हि यात्रा दि. १५ जुन रोजी नागपूर वरुन निघाली. यात नागपूरमधील ८० सायकलस्वार आणि राज्यातील ९० संघटनांचे ३००० हून अधिक सायकलस्वार या यात्रेत सहभागी झाले होते. रामटेकच्या सृष्टी सौंदर्य बहुउद्देशीय संस्थेचे ६ सदस्य या यात्रेत सहभागी झाले होते.या सर्वांनी साडेसातशे कि.मी. अंतर पार केले व सोमवार २३ जुन ला ते रामटेक येथे परत आले.

यावेळी गांधी चौक येथे या सायकलस्वारांचे माजी नगरसेवक सुमीत कोठारी,राजेश किंमतकर, चुन्नीलाल चौरशिया, डॉ.बापु सेलोकर, गजु बिसने, बिकेंद्र महाजन, पत्रकार अनिल वाघमारे, राजु कापसे, अमोल खडोतकर, नामदेव राठोड, वेदप्रकाश मोकरदम, रवि मथुरे, अमोल गाढवे, उमेश हटवार, महाजन, दत्तात्रय पंडे यांचेसह रामटेक वासीयांनी जल्लोषात स्वागत करीत कौतुक केले.

# सोनेगाव निपाणी येथे प्रवेशोत्सव संपन्न



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २४ :

सोनेगाव ( निपाणी ) जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत नवागत विद्यार्थ्यांचा स्वागताचा सोहळा तसेच प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. सर्वप्रथम विद्यार्थ्यांची प्रभात फेरी काढण्यात आली त्यानंतर विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन त्यांना शाळेत आणण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांना फुगे, पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. यानंतर विद्येचे दैवत माता सरस्वती तसेच सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करुन माल्यार्पण करण्यात आले. विद्यार्थ्यांना पाहुण्याच्या हस्ते शाळेचा गणवेश, बूट मोजे ,पुस्तके इत्यादींचे वितरण करण्यात आले एक अविस्मरणीय क्षण म्हणून त्यांच्या पावलांचे ठसे पहिले पाऊल या उपक्रमांतर्गत कागदावर घेण्यात आले. यावेळी सरपंच तेजस्विनी धुर्वे, ग्रामपंचायत सदस्य मनीषा भिवणकर, शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष ज्योती कुडे,शिवानी गुरव, प्रिती भिवनकर, नेहा घटी, पंचायत समिती साधन व्यक्ती स्मिता पोटदुखे, मुख्याध्यापिका नीलिमा कामथे, विषय शिक्षक दीपचंद पेंडकांडे, शिक्षिका सुजाता भानसे, हर्षा कट्यारमल व पदवीधर शिक्षिका विनया धात्रक, सुनंदा वाघाडे,सुरेखा धोटे व सर्व शिक्षक तसेच पहिल्या वर्गाचे माता पालक उपस्थित होते.

# कुटुंब व्यवस्था मजबूत होण्यासाठी समूपदेशन आवश्यक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :

दाम्पत्य जीवनात काही वाद असतील आणि ते विकोपाला गेली असतील. कुणाला एकटे पडल्यासारखे वाटत असेल किंवा आता सोबत राहणे शक्य नाही. अशा नाजूक वेळी भरोसा सेलने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. कुटुंब व्यवस्था मजबूत करण्यासाठी आणि दाम्पत्य जीवनात पुन्हा आनंद फुलविण्यासाठी भरोसा सेलने समूपदेशन केले. त्यांनी 8 वर्षांत 7 हजार तुटलेली मने जुळविली, अशी माहिती पोलिस आयुक्त रवींद्रकुमार सिंगल यांनी दिली.

भरोसा सेलच्या नवीन कार्यालयाच्या इमारतीचे उद्घाटनन पोलिस आयुक्तांच्या हस्ते झाले. त्याप्रसंगी ते बोलत होते. भरोसा सेल संदर्भात अधिक माहिती देताना सिंगल म्हणाले, 2017 ला भरोसा सेल सुरू झाले. या आठ वर्षात 17 हजार 700 प्रकरण हाताळली. म्हणजे तेवढ्या दाम्पत्यांचे समूपदेशन केले. त्यापैकी 7 हजार दाम्पत्यांची तुटलेली मने जुळवून त्यांच्या जीवनात पुन्हा आनंद फुलविला. त्यामुळेच भरोसा सेलवर नागरिकांचा विश्वास कायम आहे. भरोसा सेलमध्ये येणारे पुरूष असो किंवा महिला त्यांचे म्हणणे ऐकून घेतले जाते. त्यांच्या दाम्पत्य जीवनात आनंद फुलविण्याच्या दृष्टीने समूपदेशन केले जाते. टोकाचा निर्णय घेण्यापूर्वी म्हणजे न्यायालयात जाण्यापूर्वीच भरोसा सेलमध्ये निपटारा केला जातो. लोकांना न्याय मिळावा हाच आमचा हेतू आहे. लोक समाधानी आहेत. केवळ समूपदेशनाची कामे नव्हे तर ज्येष्ठ नागरिकांसाठी सुद्धा भरोसा सेल महत्त्वाचे ठरले आहे, याकडेही पोलिस आयुक्तांनी लक्ष वेधले. या प्रसंगी सहपोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, अपर पोलिस आयुक्त वसंत परदेसी, शिवाजी राठोड, उपायुक्त राहुल माकणिकर, श्वेता खेडकर, शशिकांत सातव, अश्वीनी पाटील, एसीपी माधुरी बावीस्कर, अभिजित पाटील, नरेंद्र हिवरे यांच्यासह भरोसा सेलच्या प्रमुख पोलिस निरीक्षक सीमा सुर्वे आणि त्यांची टीम, पोलिस अधिकारी उपस्थित होते.

## ७० वर्षानंतर उमरेडच्या मलक नगर झोपडपट्टीतील रहिवाशांना मिळाला न्याय

# राजु पारवे व प्यारे खान यांच्या प्रयत्नाला यश

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :



नागपूर जिल्ह्यातील उमरेड तालुक्यातील मलक नगर परिसरात गेली अनेक वर्षे वास्तव्यास असलेल्या १२१ अल्पसंख्यांक कुटुंबांसह एकूण २८३ गरीब कुटुंबांना अखेर मोठा दिलासा मिळाला आहे. वक्फ मालकीच्या जमिनीवर लीजच्या माध्यमातून आता या कुटुंबांना कायदेशीर हक्क बहाल करण्यात येणार आहे. हा ऐतिहासिक निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचे मा. अध्यक्ष (मंत्री दर्जा) प्यारे खान आणि भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष राजू पारवे यांच्या संयुक्त प्रयत्नातून घेण्यात आला आहे.

रविवार २२ जून रोजी प्यारे खान यांनी मलक नगर परिसराला भेट देऊन स्थानिक नागरिकांशी संवाद साधला. यावेळी भाजपा प्रदेश उपाध्यक्ष व माजी आमदार राजू पारवे, तसेच मेहदीबाग ट्रस्टचे प्रतिनिधी नूर मलक, सैफुद्दीन मलक इत्यादी उपस्थित होते.

या बैठकीत जमिनीला लीजवर देण्याच्या प्रस्तावावर सहमती नोंदवण्यात आली असून, आता मुंबईत होणाऱ्या अल्पसंख्याक आयोग, महसूल विभाग आणि वक्फ बोर्डाच्या संयुक्त बैठकीत याला अधिकृत मंजुरी मिळणार आहे.

मलक नगर झोपडपट्टी सुमारे १२० एकर परिसरात पसरलेली आहे. या भागाचा मालकी हक्क मेहदीबाग ट्रस्टकडे आहे, ज्याने ही जमीन वक्फसाठी दान केली होती. मात्र, गेली अनेक दशके येथे २८३ कुटुंबे बिनपरवाना राहात आहेत. यामध्ये १०९ नवबौद्ध, ११ मुस्लिम, १ ख्रिश्चन आणि इतर समाजातील नागरिकांचा समावेश आहे. वेळोवेळी अतिक्रमण हटावाच्या नोटीसा देण्यात येत होत्या. त्यामुळे स्थानिक नागरिकांनी माजी आमदार राजू पारवे यांच्याकडे कायमस्वरूपी स्वामित्वाची मागणी केली होती. त्यांनी हा विषय वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे उपस्थित केला आणि अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांना हस्तक्षेप करण्याची विनंती केली.

या जमिनीवर मोठ्या प्रमाणावर अल्पसंख्याक समुदाय स्थायिक असल्यामुळे श्री खान यांनी मेहदीबाग ट्रस्टच्या प्रतिनिधींशी चर्चा करून लीज स्वरूपात जमीन देण्याचा निर्णय घेतला. या निर्णयानंतर उमरेड विधानसभेचे माजी आमदार राजू पारवे म्हणाले, मी अनेक वेळा अधिकाऱ्यांकडे निवेदन दिले, पण काहीही निष्पन्न झाले नाही. मात्र, जेव्हा मी हा विषय प्यारे खान यांच्यासमोर मांडला, तेव्हा त्यांनी लगेच सकारात्मक निर्णय घेतला आणि अवघ्या ३० दिवसांत ही प्रक्रिया पूर्ण केली. ७० वर्षांपासून प्रलंबित असलेला न्याय आता मिळत आहे. अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांनी सांगितले, माझ्याकडे २८३ कुटुंबांचा सामूहिक अर्ज आला होता. यामध्ये अल्पसंख्याक समुदायाचे प्रमाण अधिक होते आणि आर्थिकदृष्ट्या ते अत्यंत दुर्बल होते. त्यामुळे मी या प्रकरणात स्वतः हस्तक्षेप करत सर्व संबंधित पक्षांशी चर्चा करून तोडगा काढला. आता सर्व कुटुंबांना लीजच्या माध्यमातून कायदेशीर हक्क मिळणार आहे.

सुमारे १२० एकर क्षेत्रफळावर वसलेली ही वसाहत अनेक वर्षांपासून अनिश्चिततेच्या छायेत होती. आता लीजचा अधिकार मिळाल्यामुळे या कुटुंबांना स्थायिकता, कायदेशीर संरक्षण आणि सामाजिक सुरक्षितता लाभणार आहे.

# जातीगत जनगणनेत गर्वाने आपली जात सांगा : कैलाश केवदे

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २४ :



15 जुन 2025 रोजी आमदार निवास नागपुर येथे निषाद पार्टीची सभा महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष कैलाश केवदे यांच्या अध्यक्षतेत जातीगत जनगणना व आगामी निवडणूक विषयावर चर्चा हेतु आयोजित केली होती. सभेत प्रकाशजी लोणारे, चंद्रकांत लोणारे, मनोज बावणे, मोहनलाल बाथो, विदर्भ अध्यक्षा महिला मोर्चा कोमलताई बावणे, शारदा भारसागडे, मनिष बाथो, सुतेश बारबते, प्रमोद बावणे, देवानंद आमझरे, अनिल गौर, ओम गौर, आशा निषाद इत्यादींनी आपले मत व्यक्त केले. या सर्व मता नंतर निर्णय घेण्यात आले की मच्छीमार समाज जसे की भोई, केवट, कहार, ढिवर, निषाद अशी भटक्या जमाती मधील ३७ जातींनी जनगणनाच्या वेळेस निसंकोच आपली जात सांगितली पाहिजे.

तसेच स्पष्ट रुपाने सांगावे की भटक्या जमाती व या वर्गात येणारी सर्व जात मच्छीमार आहे. म्हणून संपूर्ण भारतात मच्छीमार समाजाची जनसंख्या किती याची योग्य नोंद होणार. भारतात सर्वप्रथम वर्ष १९३१ मध्ये जातीगत जनगणना झाली होती.

तेव्हा ओबीसी वगार्ची जनसंख्या ही 52 टक्के होती परंतु त्यावेळेस ओबीसी समाज जागृत नसल्यामुळे रिकॉर्डमध्ये ओबीसी वगार्ची जनसंख्या 27 टक्के नोंदविण्यात आली. यामुळे ओबीसी वगार्ला 27 टक्के आरक्षण देण्यात आले परंतु आताचा 52 टक्के ओबीसी समाज जेवढी संख्या तेवढे अधिकार मांगत आहे जे संध्यातरी संभव दिसत नाही. हे सर्व ओबिसी समाज जागृत नसल्यामुळे घडले आहे. परंतु १९३१ च्या नंतर या शासनात जातीगत जनगणना होत आहे. म्हणून मच्छीमार समाजाने सर्व बाबी लक्षात ठेवून लाज न करता निसंकोच पणे आपली जात जी शाळेच्या लिविंग व कास्ट सर्टिफिकेट मध्ये लिहीली आहे तीच जात जातीगत जनगणनाच्या वेळेस सांगावी. भटक्या जमाती 'ब' वर्गात येणारी सर्व जाती ने लक्षात ठेवावे की आम्ही मच्छीमार आहोत, हे जात सांगितल्या नंतर नोंदवून घ्यावे. जेणे करुन संपूर्ण भारतात आपल्या समाजाची योग्य जनसंख्या मोजण्यात येणार.

**निषाद पार्टीची सभा संपन्न**

तसेच १५ जुन २०२५ रोजी फादर्स डे असल्यामुळे निषाद पार्टीने समाजाच्या सक्रिय कर्तृत्वान वडीलांचा सत्कार केला. ज्यामध्ये खुशालचंद नायक, गेंदलाल गौर, किशोर बावणे, गोपाल ताराचंद गौर, श्रीकृष्ण भारसागडे इत्यादींचा सत्कार केला तसेच निषाद पार्टी चे गाडीवर लावणाऱ्या स्टिकरचे अनावरण करण्यात आले.

सभेचा संपूर्ण नियोजन व सूत्र संचालन विदर्भ अध्यक्ष राहुल गौरने केले. सभा यशस्वी करण्या करिता यजविंदर गौर, सीमा गौर, ममता गौर, सुमित्रा वऱ्हाडे, नर्मदा कुरवाडे, आयुष गौर यांनी अथक परिश्रम केले.

## विजेच्या धक्क्याने मृत्यू

**नागपूर :** वाळायला घातलेले कपडे काढत असताना विजेच्या तारांना स्पर्श झाल्याने एका व्यक्तीला विजेचा जबर धक्का बसला. गंभीररित्या होरपळून उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. ही घटना पारडी पोलिस ठाण्यांतर्गत घडली. अमोल भगवान बगमारे (40) रा. अंबेनगर, भांडेवाडी असे मृताचे नाव आहे. शनिवारी रात्री 12.20 वाजताच्या सुमारास अमोल छतावर वाळायला घातलेले कपडे काढण्यासाठी गेले होते. या दरम्यान विद्युत वाहिनीच्या संपर्कात आल्याने त्यांना विजेचा जबर धक्का बसला. ते बेशुद्ध होऊन खाली कोसळले. बराच वेळपासून अमोल खाली न उतरल्याने कुटुंबीयांनी छतावर जाऊन पाहिले असता ते बेशुद्धावस्थेत आढळले. तत्काळ त्यांना उपचारार्थ मेडिकल रुग्णालयात नेण्यात आले. या प्रकरणी मिळालेल्या सूचनेवरून पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करीत तपास सुरू केला आहे.

# नवीन शैक्षणिक वर्षाचा प्रारंभ

## शाळा प्रवेशोत्सवाने रंगला परिसर

■ महासागर प्रतिनिधी, भिवापूर, दि. २४ :




अड्याळ - जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, अड्याळ येथे शाळेच्या पहिल्या दिवशी शाळा प्रवेश उत्सव कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेत पहिल्या वर्गात प्रवेशित विद्यार्थी यांचे घरी जाऊन त्यांना पुषगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन करण्यात आले. व त्यांना गाडीला फुले व बॅनर ने सजवून त्यात बसवून शाळेत आणण्यात आले नंतर त्यांचे शाळेच्या प्रवेश द्वारावर त्यांच्या आगमनाने सर्व विद्यार्थ्यांनी टाळ्या वाजवून आनंदोत्सव व त्यांचे कुंकुम तिलक करून त्यांचेवर फुलांचा वर्षाव करण्यात आला. त्यानंतर शाळेतील त्यांचे पहिला पाऊल कागदावर ठसे घेऊन पुढे जतन करण्यासाठी ठेवण्यात आले.

शाळेतील पहिल्या दिवशी फुगे व फुलांनी शाळा सजवून मान्यवरांच्या हस्ते नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचं चाकलेट व पुष्प देऊन गोड कौतक करण्यात आले, यावेळी शाळा व्यवस्थापन समिती सदस्य गण,पालक वर्ग उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष सन्मा जोत्सनाताई पेंदे प्रमुख अतिथी म्हणून सन्मा, आरतीताई खानकुरे, सन्मा शीतल ताई तलमले, शिला ताई देशमुख तसेच दशरथ पेंदे, व इतर मान्यवर तसेच शाळेचे मुख्याध्यापक विलास चचाने, तसेच शिक्षक वृंद अनिल राठोड, रवींद्र पाटील, संगीता ढोक उपस्थित होते.

प्रवेशोत्सव जिप प्राथमिक शाळा तातोली येथे संपन्न ग्राम पंचायत सरपंच विजय चौधरी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष विठ्ठल माथने मुख्याध्यापक राजेश शेटे, पालक विद्यार्थी यांच्या उपस्थित विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले.

# आशा वर्कर व गटप्रवर्तक यांना थकीत असलेले केंद्राचे मानधन त्वरित द्या

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :



आशा व गटप्रवर्तक कर्मचारी युनियन (सीआयटीयु) तर्फे नियोजन भवन येथे जनसंवाद कार्यक्रमा दरम्यान पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा घेराव करून निवेदन सादर केले. मोठ्या संख्येमध्ये गेलेल्या आशा वर्कर यांच्या सोबत चर्चा करताना पालकमंत्र्यांनी राज्याचे आरोग्य मंत्री डॉ. आबिटकर यांना फोन लावून येत्या गुरुवारी तात्काळ स्वतःच्या दालनात मीटिंग लावून आशा वर्कर यांचे प्रश्न सोडवणे या सूचना दिल्या.

सूचना देताना डॉक्टर आबिटकर यांच्याबरोबर चर्चा करतांना कोण स्पीकर मोड मध्ये टाकून राज्याच्या उपाध्यक्ष व नागपूर जिल्ह्याच्या महासचिव प्रीती मेश्राम यांच्यासोबत फोनवर चर्चे दरम्यान अडचणी समजून सांगितल्या.

आशा वर्कर यांच्या गंभीर अडचणी प्रीती मेश्राम यांनी आरोग्य मंत्र्यांना समजून सांगितल्या. आशा वर्कर व गटप्रवर्तक यांचेवर केंद्र व राज्य सरकारने निर्माण केलेले संकट आशा वर्कर व गटप्रवर्तक यांना जानेवारी २०२५ पासून केंद्राचे कोणतेही मानधन मिळालेले नसुन राज्य किंवा जिल्हा प्रशासन सकारात्मक उत्तर द्यायला तयार नाही. राज्य शासनाचे सुद्धा मानधन मार्च २०२५ पासून थकीत असून त्यावर सुद्धा राज्य शासन तोडगा काढायला तयार नाही.

**पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना निवेदन**

अशा परिस्थितीमध्ये आशा वर्कर वर विविध प्रकारचे सर्वे ऑनलाइन करून देण्याच्या दबाव व परिवारावर आलेली उपासमारीची पाळी त्यामध्ये त्या संकटात सापडलेल्या आहेत. वरिष्ठ अधिकारी किंवा कर्मचारी आशा वर्कर व गटप्रवर्तक यांचेवर कामाचा ताण देत असून त्या विविध रोगाने ग्रस्त झालेले आहेत. आशा वर्कर वर ऑनलाइन कामाची सक्ती न करता ऑनलाइन कामाकरता डाटा ऑपरेटरची नेमणूक करण्यात यावी. दर सहा महिन्याने त्यांची आरोग्य तपासणी होणे गरजेचे असून दर महिन्याच्या एक तारखेला केंद्र व राज्याचे मानधन त्यांच्या खात्यामध्ये जमा होणे गरजेचे आहे.

१३ जुन २०२५ रोजी आरोग्य सेवा व आयुक्त अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांच्यातर्फे परिपत्रक क्रमांक राआअ /आशा /आशा अद्यावत मा. सु. /२७१०९-३१४ काढण्यात आले वरील परिपत्रकात आशा स्वयंसेविका ही शासकीय कर्मचारी किंवा कंत्राटी कर्मचारी नसून ही स्वयंसेविका म्हणून कार्यरत आहे असे वरील पत्रात नमूद केलेले आहे. विधवा, घटस्फोटित किंवा आर्थिक दृष्ट्या दुर्बल असलेल्या विवाहित महिलांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्याच्या दृष्टिकोनातून नेमणूक करण्यात आली. परंतु नेमणूक करताना अधिक शिक्षणाला महत्त्व देण्यात येत आहे त्यामुळे गरजू महिलांना लाभांपासून वंचित राहावे लागते.

राज्य शासनाने कंत्राटी कर्मचाऱ्यांचे समायोजन करताना गटप्रवर्तक यांना समायोजनातून डावलण्यात आले आहे. त्यांना तात्काळ समायोजित करण्यात यावे, आशा योजना तात्पुरत्या स्वरूपाची असल्यामुळे त्या योजनेला स्थायी योजना म्हणून घोषित करण्यात यावी, जे एस वाय अंतर्गत आशा वर्कर यांच्यावर लादण्यात आलेली एपीएल / बीपीएल ची अट रद्द करून सरसकट मोबदला देण्यात यावा.

# हुडकेश्वर (खुर्द) जि.प. शाळा व अंगणवाडीत व शेवग्याचे रोपण उपक्रम



■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. २४ :

नागपूर तालुक्यातील हुडकेश्वर (खुर्द), किरणापूर, धामणा जि.प. शाळा व अंगणवाडीतील मुलांना सरपंच मीना कमलाकर शेंडे यांच्या संकल्पनेतून व सौजन्याने शिक्षणविषयक साहित्य, पुस्तके, पाट्या व खाऊ वाटप करण्यात आले. प्रत्येक शाळा व अंगणवाडीत अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या मार्गदर्शनाने शेवग्याचे झाड मुलांच्या आईंच्या नावाने लावण्यात आले. हा उपक्रम पर्यावरण संवर्धनासोबत आईच्या नांवाचा सन्मान करणारा ठरला. कार्यक्रमाला सरपंच मीना कमलाकर शेंडे, उपसरपंच शुभम हटवार, ग्रा.पं.सदस्य मंगला भगत, अर्चना बुरबुरे, शारदा कास्टे, ग्राम पंचायत अधिकारी चंद्रकांत सोनेवाने, माजी सरपंच कमलाकर शेंडे, ग्रामपंचायत कर्मचारी, शिक्षकवृंद, अंगणवाडी सेविका व मदतनीस उपस्थित होते.

# उत्तर नागपुरात आणखी एक अग्निशमन केंद्र नागरिकांच्या सेवेत

## पाचपावली अग्निशमन केंद्र अत्याधुनिक सोयी सुविधांनी परिपूर्ण

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :

नागपूर शहराचा भौगोलिकरित्या विकास झाल्याने लोकसंख्येत वाढ झाली आहे. याच बरोबर शहरात गगनचुंबी इमारती, शॉपींग मॉल, स्मॉल स्केल इंडस्ट्रीज, हॉस्पीटल, गदीचें बाजारपेठ, शैक्षणिक संस्था, शासकीय इमारती, स्लम वस्ती, इत्यादी अस्तिवात आल्याने दुर्घटनांचे प्रमाण देखील वाढले आहेत. अशा परिस्थितीत समर्थपणे कार्य करून नागरिकांना तत्पर अग्निशमन सेवा उपलब्ध करून देण्याकरिता अग्निशमन व आपात्कालीन सेवा विभागाचे बळकटीकरण आवश्यक आहे.




नागपूर शहरात २२ अग्निशमन केंद्र प्रस्तावित असून, या केंद्रांच्या मास्टर प्लॉनला तयार करण्यात आला आहे. त्यानुसार नागपूर महानगरपालिकेच्या अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभागाच्यावतीने पाचपावली येथे नवनिर्मित व अत्याधुनिक सोयी सुविधांनी परिपूर्ण अग्निशमन केंद्र नागरिकांच्या सेवेत सज्ज झाले आहे. या केंद्रामुळे उत्तर नागपुरातील अग्निशमन सेवाला आणखी बळ मिळणार आहे. नुकतेच या केंद्राचे लोकार्पण राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्याचे महसूल मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते करण्यात आले.

पाचपावली अग्निशमन केंद्र तयार झाल्याने बुध्दनगर, बारसेनगर, लष्करीबाग, वैशालीनगर, बाळाभाऊ पेठ, नवा नकाशा, ठक्करग्राम, कांजी हाऊस, यादवनगर, टेका नाका, टिमकी, मेंहदी बाग कॉलोनी, किदवाई ग्राउंड, बांग्लादेश नाईक तलाव, कडबी चौक, मेकोसाबाग, मोमीनपुरा, धोबीनगर इ. परिसरातील राहणाऱ्या नागरिकांना थेट अग्निशमन सेवेचा लाभ मिळणार आहे.

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी आणि अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत, अतिरिक्त वैष्णवी बी. यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्य अग्निशमन अधिकारी तुषार बाराहाते यांच्या नेतृत्वाखाली या अग्निशमन केंद्राचा कायापालट करण्यात आला आहे. मनपा निधीतून पाचपावली अग्निशमन केंद्र तयार करण्यात आले आहे. नागपूर शहराचा झपाट्याने विस्तार होत असताना अग्निशमन सेवांचा देखील विस्तार करण्यात येत आहे. याअंतर्गत पाचपावली अग्निशमन केंद्र व कार्यालय तसेच कर्मचारी वसाहतीचे बांधकाम करण्यात आले आहे.

वर्ष 2011 मध्ये पाचपावली येथील इमारत मोडकळीस आली होती. त्यामुळे हे केंद्र तूर्तास सुगतनगर येथे हलविण्यात आले होते. तेव्हापासून उत्तर नागपुरातील विविध भागात सुगतनगर केंद्रातून अग्निशमन विभागाची सेवा पुरविली जात होती. परंतु, शहराचा वाढता विस्तार लक्षात घेता मनपाला नवीन अग्निशमन केंद्राची गरज वाटू लागली. त्यानुसार पाचपावलीत अग्शिनम केंद्र तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला. या पाचपावली अग्निशमन केंद्र आणि वसाहतीचे भूमीपूजन 5 ऑगस्ट 2023 रोजी करण्यात आले होते. गेल्या दीड वर्षात केंद्राचे झपाट्याने काम पूर्ण झाले आहे. इमारतीमध्ये अग्निशमन उप अग्निशमन अधिकाऱ्यांचे कार्यालय, महिला कक्ष, पुरुष कक्ष, नियंत्रण कक्ष, भांडार कक्ष तयार करण्यात आले आहे. दोन्ही विंगमध्ये अधिकारी-कर्मचाऱ्यासाठी लिफ्टची सुविधा देण्यात आली आहे. त्याचबरोबर अग्निशमन केंद्रात एकाच ठिकाणी दोन फायर टेंडर गाड्या आणि दोन मीनी वॉटर टेंडर गाड्या उभ्या राहू शकतात अशी माहिती पाचपावली अग्निशमन केंद्र अधिकारी सुनील डोकरे यांनी माहिती दिली. अग्निशमन केंद्राचे लोकार्पण होताच अग्निशमन केंद्रात अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी आपली सुविधा देण्यास सुरुवात देखील केली आहे.

### अधिकारी कर्मचाऱ्यांकरिता ३५ गाळे

केंद्राचा बिल्डींग एरिया 3078.09 चौ.मी., प्लॉट एरिया 1708.94 चौ.मी. व इमारतीची उंची 19.7 मीटर एवढी आहे. अग्निशमन केंद्र हे जी+५ माजलीची आहे. असून ठिकाणी दोन विंग तयार करण्यात आल्या आहेत. दोन्ही इमारतीत 2बीएचके अशी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. अधिकाऱ्यांसाठी 2 आणि कर्मचांऱ्याकरिता ३३ असे एकूण ३५ गाळे तयार करण्यात आले आहे. गाळ्यात राहणाऱ्या अधिकारी-कर्मचारी यांच्या करिता सुसज्ज अंडरगाऊंड पार्किंग, 25 हजार लिटर क्षमतेच्या पाण्याच्या तीन मोठ्या टाक्या तयार करण्यात आल्या आहेत.

# शिक्षण संस्था चालक अंजिकरला अटक

* दिलीप धोटे कारागृहात, आणखी रडारवर
* एसआयटीने जप्त केले बँक स्टेटमेंट
* शालार्थ आयडी घोटाळा प्रकरण

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :

बहुचर्चित शालार्थ आयडी घोटाळ्याप्रकरणी आणखी एका शिक्षण संस्था चालकाला अटक करण्यात आली. ओंकार भाउराव अंजिकर (46) रा. बाळाभाउ पेठ, कमाल चौक असे अटकेतील संस्थाचालकाचे नाव आहे. बोगस आयडी प्रकरणी आर्थिक देवाण-घेवाण झाल्याचा त्याच्यावर आरोप आहे. सोमवारी सायंकाळी घरूनच त्याला अटक करण्यात आली. एसआयटीचे प्रमुख पोलिस उपायुक्त राहुल मदने यांच्या मार्गदर्शनात कारवाई करण्यात आल्याची सुत्रांची माहिती आहे.

एसीपी सुनीता मेश्राम यांच्याकडून एसआयटीची जबाबदारी काढून घेतल्यानंतर प्रथमच संस्थाचालकाला अटक करण्यात आली. अंजिकर यांची शांती निकेतन शिक्षण संस्था आहे. याअंतर्गत गुलशननगरात जय हिंद विद्यालय उच्च प्राथमिक शाळा आहे. बोगस आयडी तयार करून 18 शिक्षकांची नियुक्ती करण्यात आल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. यासाठी आर्थिक देवाण-घेवाण झाल्याचा आरोपावरून अंजिकरला अटक करण्यात आली. मंगळवारी त्याला न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. तत्पूर्वी एसआयटीने विठ्ठल रुक्मिणी बहुउद्देशीय उच्च प्राथमिक शाळेचा संस्थाचालक (मोहपा) दिलीप धोटे (60) याला अटक केली होती. अटकेनंतर त्याची तब्येत बिघडल्याने मेयो रुग्णालयात भरती करण्यात आले. शनिवारी रुग्णालयातून सुटी झाल्यानंतर न्यायालयाच्या आदेशाने त्याची कारागृहात रवानगी करण्यात आली आहे. या प्रकरणाचा एसआयटीने सखोल तपास केला असून धोटे याने आर्थिक व्यवहार केल्याचे बँक स्टेटमेंट आणि इतर महत्त्वपूर्ण कागदपत्र पोलिसांनी जप्त केले आहे. शालार्थ आयडी घोटाळ्याप्रकरणी नव्या एसआयटीने कंबर कसली असून शिक्षण संस्थांचे अध्यक्ष आणि सचिव त्यांच्या रडारवर आहेत.

### दोन शिक्षण संस्थाचालक कारागृहात

सदर पोलिसांनी राजश्री शिक्षण संस्था आणि भंडारा येथील नवोदय शिक्षण संस्थाचालक चरण नारायण चेटुके (63) रा. गोंदिया याला अटक केली होती. तसेच केवळराम शिक्षण संस्था, अजुर्नी मोरगावचा राजू मेश्राम आणि त्यानंतर एसआयटीने विठ्ठल रुक्मिणी बहुउद्देशीय उच्च प्राथमिक शाळेचा संस्थाचालक (मोहपा) दिलीप धोटे (60) याला अटक केली होती.

# अल्पवयीन विद्यार्थ्यास जातीवाचक शिवीगाळ करून मारहाण

■ महासागर प्रतिनिधी, काटोल, दि. २४ :

रेल्वे स्टेशन परिसरातील पंचशील नगर येथे वास्तव्यास असलेला तन्मय रवींद्र मेश्राम वय (१६) हा आपल्या मित्रांसोबत बुद्धविहाराचे आवारात असलेल्या कडुलिंबाच्या झाडाला बांधलेल्या झुल्याजवळ खेळत होता. तिथे आरोपीचा मुलगा छोटू लाडसे हा झुल्या जवळ येऊन, झुला घेऊ लागला.

तन्मय आणि छोटू हे दोघेही मित्र असल्याने तन्मयने छोटूला मला झुला झुलू दे हे म्हटल्यावर तो ऐकत नसल्याने तन्मयने झुला आपल्याकडे ओढला. त्यामुळे छोटू हा खाली पडला. यावरून तन्मय आणि छोटू या दोघा मित्रात वाद झाला. त्यांच्यात मारामारी झाली. त्याचवेळी छोटूचे वडील अजय लाडसे हे छोटूला घ्यायला तेथे आले असता छोटूने तन्मय ने मारले असे सांगितल्यास अजय लाडसे याने कशाचाही विचार न करता किंवा मुला मुलांचे आपसातील यांनी तन्मयला अमानुष मारहाण केली व तन्मयच्या जातीवरून शिवीगाळ केली व तू माज्या मुलाला हात कसा काय लावला म्हणून लाथा बुक्क्यांनी छातीवर, पोटावर, व तन्मयच्या मूत्रपिंडावर मारहाण केली. तन्मय कसा बसा पळत घराकडे जात असताना अजय लाडसे यांनी त्याला विटांचे तुकडे मारून फेकले.

फिर्यादी तन्मयच्या तक्रारीवरून काटोल पोलिसांनी त्याची तक्रार अदखल पात्र म्हणून दाखल करून घेतली. तन्मयला काटोलच्या ग्रामीण रुग्णालयात मेडिकल साठी नेले असता डॉक्टरांनी वेळ झाल्याचे कारण सांगून त्याचे मेडिकल सुद्धा केले नाही. ही घटना शहरात वाऱ्यासारखी पसरली. घटनेची माहिती होतात वंचित बहुजन युवा आघाडीचे जिल्हा सचिव विवेक गायकवाड यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह तन्मय चे घर गाठून वस्तुस्थिती जाणून घेतली.

### आरोपी राष्ट्रवादीचा कांग्रेसचा पदाधीकारी

आरोपी अजय लाडसे हा राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (श. प) गटाचा पदधीकारी असून तो राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांचा निकटवर्तीय आहे.

नुकत्याच झालेल्या काटोल तालुका खरेदी विक्री संघाचा उपसभापती म्हणून बिनविरोध विजय झाला आहे. फिर्यादीच्या तक्रारीवरून काटोल पोलिसांनी आरोपी अजय लाडसे यांचे विरुद्ध भारतीय न्याय संहिता २३ अन्वये कलम २९६,११५(१) १२५, अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा १९८९ भादवि कलम ३(१) आर ३(१) एस अन्वये गुन्हा दाखल केला आहे. घटनेचा पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी बापू रोहम हे करीत आहेत.

# पगारासाठी जाळले मालकाचे २ ट्रक

## अग्निशमन विभागाने विझवली आग, आरोपी चालक गजाआड

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :

मालक पगार देण्यास टाळाटाळ करीत असल्यामुळे संतापलेल्या चालकाने पेट्रोल ओतून त्याचे दोन ट्रक पेटवून दिले. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन विभागाचे पथक दोन बंबांसह घटनास्थळी पोहोचले आणि आगीवर नियंत्रण मिळविण्यात आले. मात्र तोपर्यंत दोन्ही ट्रकचे कॅबिन पूर्णतः जळून खाक झाले होते. या प्रकरणी इमामवाडा पोलिसांनी मालक सिदप्पा इरय्या सोरलोट (37) रा. घाट रोडच्या तक्रारीवरून आरोपी चालकाविरुद्ध गुन्हा नोंदवून त्याला अटक केली. आकाश टेकाम (30) रा. बेलतरोडी असे अटकेतील चालकाचे नाव आहे.

सिदप्पाकडे एमएच-49/एटी-1845 आणि एमएच-49/0526 क्रमांकाचे दोन ट्रक आहेत. आकाश त्याच्याकडे चालक म्हणून कामाला होता. काही महिन्यांपूर्वी आकाशच्या निष्काळजीपणामुळे ट्रकला अपघात झाला होता. यात सिदप्पाचे 40 हजार रुपयांचे नुकसान झाले होते. गत काही दिवसांपासून आकाश मालक सिदप्पाला पगाराचे 6 हजार रुपये मागत होता.

मात्र सिदप्पा अपघातात झालेल्या नुकसानीचे कारण पुढे करून त्याला शांत करीत होता. तसेच त्याला नुकसान भरपाईची मागणी करीत होता. सोमवारी आकाशने सिदप्पाला त्याच्या पगारातून 2 हजार रुपये मागितले. सिदप्पाने पैसे देण्यास नकार दिला. यामुळे आकाश नाराज झाला. तो थेट दारूच्या गुत्थ्यावर पोहोचला आणि दारू ढोसली. त्याच बॉटलमध्ये पेट्रोल भरून ग्रेटनाग रोडवरील सिदप्पाच्या कार्यालयाजवळ आला. संधी मिळताच त्याने कार्यालयाबाहेर रस्त्यालगत उभ्या दोन्ही ट्रकच्या कॅबिनमध्ये पेट्रोल ओतून आग लावली आणि फरार झाला. सिदप्पाने त्याला पळून जात असताना पाहिले. या घटनेने परिसरात खळबळ मिळाली. पाहता-पाहता लोकांची गर्दी जमली. ट्रकमध्ये आगीची माहिती तत्काळ पोलिस आणि अग्निशमन विभागाला देण्यात आली. इमामवाडा पोलिस तात्काळ घटनास्थळी पोहोचले. माहिती मिळताच गंजीपेठ आणि कॉटन मार्केट अग्निशमन केंद्रातून दोन बंब घटनास्थळी दाखल झाले. जवानांनी पाण्याचा मारा करून काही वेळातच आगीवर नियंत्रण मिळवले. मात्र तोपर्यंत दोन्ही ट्रकचे कॅबिन पूर्णतः जळाले होते. पोलिसांनी प्राथमिक तपासानंतर आकाशला अटक केली.

### १० दिवसांपूर्वीच काढले होते कामावरून

ट्रक मालक सिदप्पाने सांगितले की, आकाश हा व्यसनाच्या आहारी गेला होता. त्याला अनेकदा समजवण्याचा प्रयत्न केला, मात्र त्याच्यात सुधारणा होत नव्हती. शेवटी कंटाळून 10 दिवसांपूर्वी त्याला नोकरीवरून काढले. त्याने दुसऱ्या ठिकाणी कामही सुरू केले होते. त्यामुळे त्याला फोनही केला नाही. त्याचे काही पैसे थकित होते. पैशांसाठी तो फोन करीत होता. मात्र जेव्हाही तो फोन करायचा नशेत असायचा. त्यामुळे जेव्हा शुद्धीवर राहशील तेव्हा हिशेब करण्यासाठी येण्यास सांगितले होते. मात्र त्याने त्यांचे दोन्ही ट्रक पेटवले.

# 3.७3 लाखांचा गुटखा-तंबाखू जप्त

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :

यशोधरानगर पोलिसांनी गोपनिय माहितीच्या आधारावर प्रतिबंधित गुटखा- तंबाखूची विक्री करणाऱ्या व्यावसायिकाच्या घरावर धाड टाकली. झडतीदरम्यान पोलिसांनी 3.73 लाख रुपये किंमतीचे प्रतिबंधित साहित्य आणि माल विक्रीतून गोळा झालेली 6 लाखांची रोकडही जप्त केली. या प्रकरणी आरोपी व्यवसायी राजू उर्फ भोले छोटेलाल चौरसिया (25) रा. किनखेडे लेआऊटविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

राजू हा त्याच्या घरून शहरातील पानठेले आणि छोट्या दुकानदारांना प्रतिबंधित पान मसाला, गुटखा आणि तंबाखूचा पुरवठा करीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी त्याच्या घरावर धाड टाकली. झडतीदरम्यान विविध कंपनीचा प्रतिबंधित पान मसाला आणि तंबाखूची पोती दिसली. तसेच प्रतिबंधित वस्तूच्या विक्रीतून मिळालेली 6 लाखांची रोकडही मिळाली. पोलिसांनी मालासह रोकडही जप्त केली.

राजू किती मोठ्या प्रमाणावर हा अवैध व्यवसाय करीत होता, याचा अंदाज त्याच्या घरी मिळालेल्या नोटा मोजण्याच्या मशीनवर लावता येऊ शकतो. पोलिसांनी त्याच्याविरुद्ध बीएनएसच्या विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला आहे. ही कारवाई पोनि रमेश खुणे, पोउपनि सदाशिव कणसे, पोहवा गणेश गुप्ता, किशोर देवांगण, रितेश दुधे, रोहित रामटेके, अमोल भेंडेकर, नीतेश मिश्रा, नारायण कोहचाडे आणि प्रविण बावणकर यांनी केली.

# बाजीप्रभू चौक सौंदर्यीकरणाचा लोकार्पण सोहळा संपन्न



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :

ग्रीन फाउंडेशन नागपूर, डॉ. ददे हॉस्पिटल, बटुकभाई ज्वेलर्स व नागपूर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने बाजीप्रभू चौक सौंदर्यीकरण्याच्या लोकार्पण समारोहाचे आयोजन करण्यात आले. या सौंदर्यकरणाचे लोकार्पण माजी आमदार गिरीश व्यास व खादी ग्रामोद्योगाचे माजी सदस्य जयप्रकाश गुप्ता यांच्या हस्ते करण्यात आले.

ग्रीन फाउंडेशन नागपूर ही संकल्पना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची असून ही संस्था वृक्षारोपण सौंदर्यीकरण व प्रदूषण नियंत्रण करण्याकरिता कार्यरत आहे. बाजीप्रभू चौक सौंदर्यीकरण ही संकल्पना ग्रीन फाउंडेशन नागपूरची आहे. तसेच ददे हॉस्पिटल व बटूकभाई ज्वेलर्सनी या संपूर्ण प्रकल्पाला प्रायोजित केले आहे. याप्रसंगी विनायक ददे, बटुक भाई ज्वेलर्सचे किशोर सेठ, रचना सिंग, प्रेमलता तिवारी, मुकेश मेहाडिया, हेमंत शर्मा, नरेंद्र क्षिरसागर, सुरज ताजने, अनिरुद्ध पालकर, शिवानी दाणी इत्यादी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन व प्रस्ताविक संस्थेचे सचिव अ‍ॅड. निशांत गांधी यांनी केले तर आभार प्रदर्शन संस्थेचे सदस्य कॅप्टन डॉ. लक्ष्मीकांत कलंत्री यांनी केले.

# सरन्यायाधीश भूषण गवई यांचा सत्कार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :



सरन्यायाधीश हिदायतुल्ला, न्या.शरद बोबडे आणि न्या. भूषण गवई या न्यायमूर्तींनी सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश पद भूषविले, आम्हाला त्यांचा अभिमान आहे. सरन्यायाधीश झाल्यानंतर भूषण गवई यांचे प्रथमच उपराजधानीत आगमन होत आहे. यानिमित्त हायकोर्ट बार असोसिएशच्यावतीने (एचसीबीए) शनिवारी (28 जून) सायंकाळी 6.30 वाजता रेशीमबागेतील सुरेश भट सभागृहात सरन्यायाधीश भूषण गवई यांचा सत्कार करण्यात येणार आहे, अशी माहिती एचसीबीएचे अध्यक्ष अ‍ॅड. अतूल पांडे यांनी सोमवारी हायकोटार्तील एचसीबीए कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या सत्कार कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश उदय ललीत तर अध्यक्षस्थानी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती दीपांकर दत्ता राहतील. याशिवाय अतिथी म्हणून सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती प्रसन्ना वराळे, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अतूल चांदूरकर, मुंबई हायकोर्टाचे प्रमुख न्यायमूर्ती आलोक आराध्ये, मुंबई हायकोर्टाच्या नागपूर खंडपीठाचे प्रमुख प्रशासकीय न्यायमूर्ती नितीन सांबरे, न्यायमूर्ती अनिल किलोर, सॉलीसिटर जनरल ऑफ इंडिया तुषार मेहता, राज्य शासनाचे अ‍ॅडोव्होकेट जनरल डॉ. बीरेंद्र सराफ उपस्थित राहतील.

तसेच शनिवारी, सायंकाळी 4.30 वाजता सिव्हील लाईन्स येथील हायकोर्ट परिसरात एचसीबीएर्ते दोनशे वकिलांच्या बसण्याची व्यवस्था असलेल्या हायकोटार्तील दुसऱ्या माळ्यावरील रूम नं. दोनचे उद्घाटन सरन्यायाधीश गवई यांच्या हस्ते होईल, अशी माहिती अ‍ॅड. पांडे यांनी दिली. पत्रकार परिषदेला एचसीबीएचे सचिव अ‍ॅड. अमोल जलतारे, अ‍ॅड. शरद भट्टड, अ‍ॅड. माधव लाखे, अ‍ॅड. प्रियंका अरबट यांची उपस्थिती होती.

# दक्षिण नागपूर शिवसेना (शिंदे) पक्षातर्फे कार रॅलीचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :



शिवसेना दक्षिण नागपूर द्वारे अंमली पदार्थ विरोधी जनजागृतीसाठी कार रॅलीचे आयोजन पूर्व विदर्भ संघटक किरण पांडव यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच दक्षिण नागपूर अध्यक्ष विशाल कोरके यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले होते.

कार रॅली द्वारे प्रत्येक गाडीवर नशा विरोधी तसेच ड्रग्स, गर्दा दारू सिगरेट विरोधी बॅनर लावून नशेचे दुष्परिणाम दर्शवणारे विविद संदेश देण्यात आले. कार रॅली दक्षिण नागपूरच्या प्रभाग २९ न्यू म्हाळगी नगर येथून सुरुवात झाली असून हुडकेश्वर पोलीस स्टेशन, मानेवाडा चौक, तुकडोजी महाराज चौक, क्रीडा चौक, रेशीमबाग चौक, सक्करदरा पोलीस स्टेशन, ते शारदा चौक येथे समापन करण्यात आले. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने महिला व पुरुष पदाधिकारी उपस्थित होते. शहर प्रमुख समीर शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत शहर संघटिका नीलिमा शास्त्री यांनी रिबीन कापून रॅलीची सुरुवात केली.

या रॅलीला प्रामुख्याने शहर संघटिका नीलिमा शास्त्री, धम्मा सोनटक्के, उज्वला उंमरे, राजेश रेवतकर, राहुल पांडे, रुपेश ठाकरे, प्रवीण कोहाड यांचे सहकार्य लाभले. यशस्वेसाठी राजेश भोसले, शैलेश काशीकर, विनोद चकोर, किशोर रंदई, राम गार्गे, वर्षा येरजवार, मनीषा गजापुरे, उज्ज्वला शंभरकर, लक्ष्मी माथुरकर, मंदा कोतपिल्लेवार कमलाकर सावरकर, पंकज ढोबळे आदी उपस्थित होते.

# पं. हृदयनाथ मंगेशकरांच्या अजरामर संगीत रचनांनी रसिक सुखावले

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :

पंडित हृदयनाथ मंगेशकर यांची विविध रंगांनी नटलेली गाणी ऐकताना शब्द, सुरावटीच्या वर्षावाने रसिक श्रोते मंत्रमुग्ध झाले. त्यांच्या मधुर संगीताने सजलेली गाणी गायक कलाकारांनी सादर करून रसिकांची मने जिंकली.

सप्तकतर्फे ज्येष्ठ संगीतकार, गायक पंडित हृदयनाथ मंगेशकर यांच्या अजरामर संगीत रचनांचा कार्यक्रम ह्यत्या फुलांच्या गंधकोषी शनिवारी कवी कुलगुरू कलिदास सभागृहात आयोजित करण्यात आला. प्रमुख अतिथी प्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर आणि राजेश लाखेकर यांनी गायक- वादकांचा सत्कार करण्यात आला.




कार्यक्रमाची सुरुवात मंजिरी वैद्य-अय्यर यांनी गगन सदन या प्रार्थनेने केली. यानंतर त्यांनी गेले द्यायचे राहुनी, वारा गाई गाणे, सुन्या सुन्या मैफलीत माझ्या, भय इथले संपत नाही ही एकल गाणी, तर अजित परब यांच्यासोबत चिंब पावसानं, काजळ राती, रात्रीस खेळ चाले आदी गाणी सादर केली. अजित परब यांनी पंडित हृदयनाथ मंगेशकर यांचे दयाघना, लाजून हासणे अन्, आमही ठाकर, सुरमयी शाम आदी गाणी सादर केली. मनीषा निश्चल यांनी असा बेभान हा वारा हे कोळी गीत, मी रात टाकली, यारा सिली सिली ही एकल तर युगलमध्ये संधीकाली आशा, माझे राणी माझे मोगा आदी गाणी उत्कृष्ठ सादर केली.

कार्यक्रमाचा समारोप अजित परब यांनी त्या फुलांच्या गंधकोषी या अजरामर गीताने केली. सुप्रसिद्ध निवेदिका वृषाली देशपांडे यांनी संचालन करताना प्रत्येक गाण्याची पार्श्वभूमी आपल्या रसाळ वाणीने सांगून उपस्थित रसिकांच्या मनाचा ठाव घेतला. प्रास्ताविक डॉ. उदय गुप्ते यांनी केले.

कि-बोर्डवर संगीत नियोजक महेंद्र ढोले, व्हायोलिनवर अमर शेंडे, बासरी अरविंद उपाध्ये, गिटारवर गौरव टांकसाळे, तबल्यावर अशोक टोकलवार, ढोलक अनिकेत दहिकर, ऑक्टोपॅड मनोहर वातुलकर, तालवाद्य विक्रम जोशी या वाद्यवृंदाने गायक कलाकारांना छान साथ दिली. कार्यक्रमाला निवृत्त न्यायमूर्ती विकास सिरपूरकर, सप्तकचे विलास मानेकर, श्रीकांत देशपांडे, उदय पाटणकर, प्रमोद कळमकर, नितीन सहस्त्रबुद्धे आदींसह सप्तकचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ५.१३ लाखांच्या मालावर डल्ला

**नागपूर** : कुटुंब पहिल्या माळ्यावर झोपले असल्याची संधी साधत अज्ञात आरोपीने घरफोडी करून रोकड आणि दागिन्यांसह एकूण 5 लाख 13 हजार रुपये किंमतीच्या मालावर डल्ला मारला. ही घटना हिंगणा पोलिस ठाण्यांतर्गत घडली.

पोलिसांनी सुनील ओमप्रकाश द्वावेदी (41) रा. संदेश सिटी, जामठाच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. शुक्रवारी रात्री 11.30 वाजताच्या सुमारास सुनील घराच्या तळ माळ्याचे दार बंद करून पहिल्या माळ्यावर झोपायला गेले होते. तळ माळ्यावर असलेल्या बेडरूमच्या कपाटातून रोख 1.25 लाख, घड्याळ आणि सोन्याचे दागिने असा एकूण 5.13 लाख रुपये किंमतीचा माल चोरून नेला.

# शहरातील २२७ नाल्याची स्वच्छता पूर्ण

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :

पावसाळ्यात शहरातील सखल भागांमध्ये पाणी साचू नये, यासाठी नागपूर महानगरपालिका प्रशासनाने कंबर कसली आहे. याच अनुषंगाने मंगळवारी (ता.२४) मनपाच्या अतिरिक्त आयुक्त (शहर) वसुमना पंत यांनी धरमपेठ झोनमधील विकासनगर नाला आणि लक्ष्मीनगर झोनमधील नालेसफाईच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी केली. या पाहणी दौऱ्यादरम्यान अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत यांनी संबंधित अधिकाऱ्यांना पावसाळ्यात वस्त्यांमध्ये पाणी साचू नये यासाठी योग्य त्या उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. विशेषतः मागील वर्षी ज्या परिसरांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते, त्या ठिकाणांची पंत यांनी स्वतः पाहणी केली. तेथील पाण्याचा निचरा होण्यास अडथळा निर्माण करणाऱ्या बाबी त्वरित दूर करण्याचे निर्देश पंत यांनी दिले. नागपूर शहरात एकूण २२७ नाले असून, त्यांची स्वच्छता पूर्ण करण्यात आल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

नालेसफाईच्या कामाची गुणवत्ता आणि कार्यक्षमता सुनिश्चित करण्यावर प्रशासनाचा भर असल्याचे यातून दिसून आहे. या पाहणी दौऱ्याप्रसंगी घनकचरा व्यवस्थापन उपायुक्त राजेश भगत, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, झोनल अधिकारी टेंभेकर यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.